# माणूस

शनिवार । २७ ऑगस्ट १९७७ । ७५ पैसे

पं. नेहरूंचे तैलचित्र काढण्याचा पहिला मान सतीश गुजराल यांचेकडे जातो. १९५६–५७ मध्ये पं. नेहरूंनी त्यांना यासाठी आवश्यक तो वेळ देऊ केला होता. या वेळी गुजराल यांनी पं. नेहरूंबरोबर त्यांच्या कन्येचेही एक तैलचित्र तयार केले. गुजराल यांना अशी शका वाटत होती, की पं. नेहरू आपल्या कन्येचे-इंदिरेचे-चित्र आपल्या घरात तीन मूर्तींमध्ये लावणार नाहीत. कारण अनेकांनी गुजराल यांना चित्र पूर्ण झाल्यावर सांगितले होते की,

' इंदिरेचा चेहरा चित्रात फार क्रूर, ( Ruthless ) दिसतो आहे '.

गुजराल यांनी हे अभिप्राय नेहरूंना सांगितले व आपली शंकाही बोलून दाखविली. नेहरूंची प्रतिक्रिया काय व्हावी ?

ते म्हणाले : ' अरे, कलाकाराचे काम सत्य प्रकट होऊ देणे हे आहे; ते लपविणे हे नव्हे. तू जे केलेस ते बरोबरच आहे '.

## अशी ही व्यक्ती राजकारणप्रवेशाच्या उंबरठ्यावर आज पुन्हा एकदा उभी आहे.

- ☐ या प्रवेशाचे जवळचे व दूरगामी परिणाम कोणते ?
- ☐ हा प्रवेश योग्य की अयोग्य ?
- ☐ काँग्रेस या प्रवेशामुळे वाचणार की तिचा सर्वनाश होणार ?
- ☐ जनतेमध्ये अजूनही इंदिराजींविषयी सुप्त आकर्षण का आहे ?
- ☐ या आकर्षणावरही मात करील असे नेतृत्व व कर्तृत्व जनतापक्ष, जे. पीं. चे संपूर्ण क्रांतिआंदोलन यातून निष्पन्न होणार आहे का ?
- ☐ इंदिरा गांधींचे आगमन म्हणजे संघ-जनसंघाचा निःपातच. या निःपाताविरुद्धची उपाययोजना कोणती ?

अनेक प्रश्नचिन्हे इंदिरा गांधींच्या पुनःप्रवेशामुळे आता निर्माण होत आहेत.

या विषयाची चर्चा करणारा अंक

## माणूस : रायबरेली विशेषांक

प्रसिद्धी : लवकरच. सप्टेंबरमध्ये.

तपशील पुढील अंकी.

## साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक तेरावा**

**२७ ऑगस्ट १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**

सपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरदरे
□
वार्षिक वर्गणी .
**चाळीस रुपये**
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□


# एकाधिकार कापूसखरेदी योजनेत शेतकऱ्यांचे कल्याणच आहे

माहितगार

जनतापक्षाने शेतीव्यवसायाला प्राधान्य देण्याचे धोरण जाहीर केले आहे हे प्राधान्य कोणत्या स्वरूपात देणार हे मात्र अद्याप तपशीलवार जाहीर करण्यात आलेले नाही अदाजपत्रकामध्ये खताच्या किमती-मध्ये थोडी सूट दिली होती; परतु खताच्या किमतीमध्ये थोडी सवलत देण्याने शेती-व्यवसायाला प्राधान्य देण्याचे धोरण सिद्ध होईल का? सरकार शेतमालाला किमती ठरवून देण्याच्याबाबतीत कोणते धोरण स्वीकारणार आहे? उद्योगधद्यामध्ये येणारा उत्पादनखर्च विचारात घेऊन तयार मालाच्या किमती निश्चित केल्या जातात! शेतमालाच्या बाबतीत केंद्रसरकार हे धोरण स्वीकारणार आहे का? उत्पादनखर्च जमेस धरून शेतमालाच्या किमती ठरविण्याबाबत सरकारने आपले धोरण जाहीर केलेले नाही. त्याचप्रमाणे एखादा व्यवसाय आजारी असला तरी त्याला बँकामार्फत अर्थपुरवठा केला जातो व कारखान्याला आजारपणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो आजारी कारखान्याना अर्थपुरवठा करताना जी दृष्टी स्वीकारली जाते त्या स्वरूपाची दृष्टी शेतीच्या बाबतीत केंद्र-सरकार स्वीकारणार आहे का? या धोर-णाचा स्वीकार करावयाचा नाही आणि मग शेतीव्यवसायाला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारणार म्हणजे काय करणार? असे अनेक प्रश्न शेतीव्यवसायासबधात उपस्थित केले जात आहेत.

उत्पादकाला शेती परवडणारी कराव-याची असेल तर त्याच्या मालाच्या किमती आणि आलेला उत्पादनखर्च याची सागड घालणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे दलाला-पासून उत्पादकाची सुटका करणे हाही भाग शेतीला प्राधान्य देणारा आहे शेतमालाचे भाव पाहून त्याची खरेदी करावयाची आणि साठे करून अवाच्या सवा नफे मिळवून ते विकायचे. यामुळे उत्पादक नाडला जातो. जनतापक्षाचे केंद्रातील सरकार शेतकऱ्याचे हे शोषण कसे थाबवणार आहे? सत्तेवर येऊन आता कोठे चार महिने होत आहेत, हे ठेवणीतील उत्तर फार काळ उपयोगी पडावयाचे नाही! लफड्याच्या चौकशा जरूर करा. अशा चौकशाच्या निष्कर्षावर नवे सरकार कारवाई करील ही भीतीही हवी; परतु या चौकशांमुळे जनतेचे प्रश्न सुटणार नाहीत जीवनावश्यक वस्तूच्या किमती वाढत आहेत. त्याला परिणामकारक आळा घालण्याचे उपाय योजले जात नाहीत. वस्तूच्या किमती वाढत आहेत त्याचा फायदा शेतकरी उत्पादक याच्या पदरात पडत नाही. हा पैसा व्यापारी उद्योगपती याच्याकडे जमा होत असून त्यामुळे बाजाराचे *नियत्रण व्यापाऱ्याच्या हातातच* केंद्रित होत चालले आहे. उत्पादक व ग्राहक याचा प्रत्यक्ष सबध कोठेच येत नाही. म्हणून वाढत्या किमतीने माल खरेदी झाला तरी तो पैसा उत्पादकाकडे जात नाही

### दोन भावांमधील रुंदावत जाणारी दरी

ग्राहक व उत्पादक या दोघाची कोंडी करणाऱ्या दलालाचे उच्चाटन केंद्रसरकार कसे करणार आहे? मधले दलाल काढण्याचे प्रयत्न करणारी योजना केंद्र का आखीत नाही? किंवा त्यासबधीचे धोरण जाहीर का करीत नाही? शेतीमध्ये माणूस केव्हा गुतून राहील? त्याला जेव्हा ती किफायत-शीर पडेल तेव्हाच माणूस शेतीमध्ये राहील. शेतकरी कुटुबातील दोन भाऊ घेतले व त्यातील एक शहरात बँकेमध्ये अथवा इतर सस्थेमध्ये चपराशाचे काम करू लागला तर त्याला दरमहा ५०० रुपये पगार मिळतो. ६-७ तासांचे त्याचे काम निश्चित झालेले असते. रजा, वर्षाला पगारात वाढ, भविष्यनिर्वाहनिधी आदी सोयी उपलब्ध

असतात. मात्र शेती करणारा त्याचा भाऊ या सर्व फायद्यापासून वंचित असतो. त्याला त्याच्या उत्पन्नाची खात्री नसते. रजा, भविष्यनिर्वाहनिधीची तरतूद ही तर त्याच्या कल्पनेच्याही बाहेरची असते. आपल्या भावाची ही परिस्थिती पाहून शेतीवर असणारा माणूस शेतीत राहण्यापेक्षा शहरात चपराशाची नोकरी अधिक सुखाची मानतो. या परिस्थितीमुळे शेतकरी शेतातून उठत चालला आहे शेतीला प्राधान्य द्यावयाचे तर शेती परवडणारी केली पाहिजे एकरी उत्पन्न वाढवूनच त्याला शेती किफायतशीर करता येईल व एकरी उत्पादन वाढवावयाचे म्हटले तर शेतकऱ्याला लागणारी साधन-साहित्य परवडले पाहिजे. खते, कीटकनाशके आदी वस्तूंच्या किमती येणाऱ्या उत्पादनखर्चावर निश्चित केल्या जाणार व शेतकऱ्याने तयार केलेल्या मालाला हे तत्त्व लागू केले नाही तर त्याची शेती किफायतशीर होणार नाही शेतकऱ्यालाच शेती परवडत नाही; मग तो ज्याच्या मदतीने शेती करतो त्या शेतमजुराला किमान वेतन तो कसा देऊ शकणार? वेतनाभावी किंवा कमी वेतनापायी शेतमजूरही शेतीवर काम करण्यापेक्षा अन्य मजुरी करू लागतो त्यामळे शेतकऱ्याचे प्रथम शेतीत पुनर्वसन केले पाहिजे

केंद्रसरकार स्वत: उत्पादकाला नाडणाऱ्या दलालाचे उच्चाटन करीत नाही; परंतु राज्यांनी ज्या क्षेत्रात दलालाचे उच्चाटन करून उत्पादकाला बरे भाव देणारी योजना आखली ती अंमलात आणण्यासाठी आर्थिक मदतही करीत नाही. आर्थिक मदतीचे सोडा; पण त्याकरता कर्ज देण्यासही पुढे येत नाही. जनतासरकारची दलालीपद्धतीबाबतही भूमिका स्पष्ट होत नाही. महाराष्ट्र सरकारची कापूसखरेदी-योजना ही केंद्राच्या पुरोगामित्वाची कसोटी पाहणारी योजना आहे उत्पादकाचे शोषण थांबविण्यासाठी दलालाची मक्तेदारी संपुष्टात आणली पाहिजे. केंद्राची त्याला तयारी नाही. महाराष्ट्राने व्यापारी, दलाल, अडते यांच्या मगरमिठीतून उत्पादकाला वाचविण्याकरिता कापूसएकाधिकार खरेदी योजना सुरू केली होती. या योजनेची सुरुवात कशी झाली व ही योजना सुरू झाल्यानंतर उत्पादकांना कसा फायदा झाला हे पाहिले पाहिजे. चार पाच वर्षांपूर्वी कापसाचा व्यापार मुक्त होता तेव्हा व्यापाऱ्यांनी भाव पाडण्याची नेहमीची नीती अवलंबिली. त्या वेळी कापसाचे भाव इतके खाली गेले की, त्या भावात कापूस पिकविणे शेतकऱ्याला परवडणे शक्य नव्हते १५० ते १७५ रुपये क्विंटल एवढा भाव झाला होता सरकारने त्या वेळी २२५ ते २५० रुपये ही हमी किंमत देऊन कापसाची खरेदी सुरू केली होती त्या वेळेपर्यंत एकाधिकार खरेदीचा कायदा झाला नव्हता. हमी किंमतीमुळे शेतकऱ्यांना जीवदान मिळाले व त्यांनी सरकारला हमी किंमतीला कापूस विकला. त्यानंतर सरकारने एकाधिकाराचा कायदा केला कापसाचे हमी भाव सरकारने जाहीर केले व कापूस खरेदी केली हमी किंमतीचे भाव व्यापारी देत असलेल्या दरापेक्षा अधिक होते

कापसाची विक्री केल्यानंतर जादा जमणारी रक्कम उत्पादकाला बोनस म्हणून दिली जात होती त्यामुळे शेतकऱ्याला वेगवेगळ्या जातीच्या कापसासाठी ३५० पासून ४५० रुपयांपर्यंतचा भाव क्विंटलला पडला होता कापसाच्या बाजारातील दलाल-पद्धतीचे उच्चाटन केले व सरकारने खरेदी विक्रीचा व्यवहार केला यामुळेच कापूस-उत्पादकाचे शोषण थांबले गेले महाराष्ट्रात कापसाचा पाचशे कोटी रुपयांचा व्यवहार होतो. एवढा मोठा बाजार आपल्या हातातून गेला म्हणून व्यापारी-दलाल दुखावणे स्वाभाविक होते त्यांनी या योजनेविरुद्ध आघाडी उघडली आणि केंद्रसरकारवर दबाव आणण्याचे धोरण स्वीकारले त्या वेळी केंद्रात काँग्रेसचेच सरकार होते हे सरकारही आजच्या सरकारप्रमाणे निश्चित अशा एका विचारसरणीचे नव्हते त्या सरकारातही व्यापाऱ्यांची दलाली नको म्हणणारे होते. त्याचप्रमाणे मुक्त अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा करणारेही होते. त्यामुळे केंद्रातील काँग्रेस सरकारवर व्यापारी–दलाल दबाव आणीत राहिले व योजनेला अडचणी येत गेल्या; परंतु काँग्रेसच्या केंद्रसरकारने ८५ कोटी रुपये या योजनेसाठी दोन वर्षे दिले. नंतर ४० कोटी रुपये अन्य मार्गांनी उपलब्ध केले व ही योजना चालू राहिली. योजना सुरू झाल्यानंतर काही व्यवहार्य अडचणी अथवा दोष दिसून आले. ते दूर करण्याचा प्रयत्न होत राहिला होता.

## मोरारजी प्रतिकूल

सहा वर्षांच्या अनुभवाप्रमाणे एखाद्या राज्यात कापूस खरेदी योजना यशस्वीपणे राबविता येते, मात्र त्यासाठी काही दिवस पैसा उभा करावा लागेल हे स्पष्ट झाले. या योजनेकरिता केंद्राकडून पैसा मिळाला पाहिजे असे म्हटले जाते तेव्हा केंद्राने राज्याला कर्ज द्यावे हा त्यांचा अर्थ आहे. केंद्रात जनतापक्षाचे सरकार आल्यानंतर त्याने एकाधिकार कापूस खरेदी योजनेत सरकारची मक्तेदारी आहे, या एकाच कारणामुळे योजनेला मदत करावयाची नाही अशी भूमिका स्वीकारली या धोरणामुळे उत्पादकाचे हित धोक्यात आले असून दलाल व व्यापारी यांना उखळ पांढरे करण्याची संधी निर्माण केली जात आहे.

योजनेमध्ये सरकारची मक्तेदारी येते म्हणून ही योजना राहावी असे केंद्राला वाटत नाही. पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी तर या योजनेची चर्चासुद्धा थांबवली आहे. 'कापूसखरेदीयोजनेबाबत माझ्या मनाची कवाडे मी बंद केली आहेत ती आता बंदच राहतील' असे मोरारजी देसाई म्हणतात! मोरारजीभाई व त्यांच्या जनतापक्षाला या योजनेत सरकारची मक्तेदारी दिसते सरकारच्या मक्तेदारीमुळे उत्पादकाचे शोषण थांबत आहे तर बिघडले कोठे? सरकारची मक्तेदारी नको म्हणणारे जनतासरकार व्यापारी व दलाल यांच्या 'मक्तेदारी'च्या तोंडात उत्पादकाला टाकीत आहे! गरिबी हटवणे, शेती किफायतशीर होईल असे पाहणे, कामगाराचे हित साधणे या गोष्टी भांडवलदार, उद्योगपती, व्यापारी यांच्या हिताच्या योजना राबवून करता येणार नाहीत. कापसाच्या व्यवहारात व्यापारी उतरले तर त्यांच्या स्वत:च्या हिताची मक्तेदारी या व्यवहारात येणार व उत्पादक शोषले जाणार आहेत जनतापक्षामध्ये सामील झालेल्या घटकपक्षांनी आपल्या वाट्याला किती मंत्रिपदे येतील याचा हिशोब करून दबावाचे राजकारण खेळण्याऐवजी शेतकऱ्याचे शोषण थांबविणाऱ्या योजनांना आर्थिक मदत करण्याकरता केंद्र-सरकारवर दबाव आणला पाहिजे! बदललेला जनसंघ व शोषणमुक्तीचा ध्यास घेतलेला पूर्वीचा समाजवादी पक्ष यांनी उत्पादकाच्या हितासाठी असलेली योजना चालू ठेवावी याकरिता आग्रह धरावा! त्यासाठी त्यांची तयारी आहे काय? □

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## □ नवीन राष्ट्रपति आणि राष्ट्रपतिभवनं

नवीन राष्ट्रपति येणार म्हटले की राष्ट्रपतिभवनामधील अकराशे कर्मचारी काहीसे अस्वस्थ होतात. कारण नव्याने येणारे राष्ट्रपति राष्ट्रप्रमुखाच्या या शाही निवासाला सुरुंग लावतील असे त्याना पूर्वानुभवावरून वाटत असते १९५२ साली डॉ राजेंद्रप्रसाद यानी छोटया निवासस्थानाची मागणी केली त्या वेळी राष्ट्रपतिभवनाचे ४५० कर्मचारी होते जवाहरलालजींनी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले आणि या निवासाची शान वाढविली आता शाही निवासाची शान वाढवायची म्हणजे कर्मचारी वाढणारच. डॉ राधाकृष्णन यानीही छोटया निवासस्थानाचा पुकारा ..आणि सारी कारकीर्द राष्ट्रपतिभवनामध्ये शाही इतमामात पार पाडली नवीन राष्ट्रपति सजीव रेड्डी यानी स्वातंत्र्यदिनी जे भाषण केले त्यामध्ये छोटया निवासस्थानाची मागणी केली इतकेच नव्हे तर आपण केवळ तीन हजार रुपये करपात्र पगार घेणार असल्याची घोषणा त्यानी. केली आणि राष्ट्रपतिभवन पुन्हा हादरले

नवीन राष्ट्रपतीची छोटया निवासाची मागणी मान्य झाली तरी त्याचे छोटे निवासस्थानही पुरेसे मोठे असावे लागणारच आहे आता राष्ट्रपतिभवनाच्या खालोखाल मोठे निवासस्थान दिल्लीमध्ये शोधायचे तर पहिल्या पतप्रधानांच्या निवासस्थानामध्ये–म्हणजेच 'तीन मूर्ती' या सध्या जवाहरलालजींचे स्मारक असलेल्या वास्तूमध्ये-राष्ट्रपतीची सोय करावी लागेल. अर्थात राष्ट्रपतींची निवासबदलाची इच्छा कितीही प्रामाणिक असली तरी राष्ट्रपतिभवनामधील अकराशे कर्मचाऱ्याचा ताफा त्याच्या निर्णयाला सुरुंग लावल्याखेरीज राहणार नाही. जनतापक्षामधील अनेक मान्यवरानाही राष्ट्रपतीचे निवासस्थान बदलण्याची कल्पना मान्य नाही.

### ऐतिहासिक महत्त्वाची शाही वास्तू

राष्ट्रपतिभवन ही ऐतिहासिक महत्त्व असलेली वास्तू आहे. तीनशेतीस एकर जमीन व्यापणारी ही शाही वास्तू ब्रिटिश साम्राज्यावर ज्या वेळी सूर्य मावळत नव्हता अशा जमान्यात उभी करण्यात आली. राष्ट्रपतिभवनाची प्रत्यक्ष इमारत सुमारे सहा एकर जागेवर पसरली आहे. सुमारे ५ हजार कामगारांनी १८ वर्षे काम करून ही ३४० खोल्या व हॉल असलेली वास्तू उभारली आहे. विविध भागाना जोडणाऱ्या लॉबीजची संख्याच ३५ च्या घरात असून २२७ कॉलम्सवर ही प्रचंड वास्तू डौलात उभी आहे. राष्ट्रपतिभवन उभे राहिले त्या वेळी ब्रिटिश साम्राज्यवर सूर्य मावळत नव्हता हे खरे असले तरी ही वस्तुस्थिती दीर्घकाळ टिकू शकली नाही. केवळ सतरा वर्षांतच गोऱ्या साहेबाला येथून बाडबिस्तरा गुडाळावा लागला आणि स्वतंत्र भारताच्या राष्ट्रप्रमुखाने राष्ट्रपतिभवनामध्ये प्रवेश केला. आज राष्ट्रपतिभवनाच्या हजेरीपत्रकावर ११०० कर्मचाऱ्यांची नावे आहेत त्यापैकी भवनाच्या देखभालीमध्ये गुतलेल्या कर्मचाऱ्यांची सख्या ७५० आहे इमारती व बगिचे यांची देखभाल करण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यांवर असते. त्याखेरीज सार्वजनिक बांधकामखात्याचे १५० कर्मचारी राष्ट्रपतिभवनात आहेत 'काम थोडा आराम जादा' अशीच त्यापैकी बहुतेकांची अवस्था असल्याने–राष्ट्रपतीच्या पर्यायी निवासाचा प्रश्न निघाला की या मडळींचा पोटशूळ उठतो वरील कर्मचाऱ्याखेरीज सरक्षणाची जबाबदारी सांभाळणारी शभर मडळी असून राष्ट्रपतीच्या शरीरसंरक्षक यत्रणेमध्ये शभर मडळी गुतलेली आहेत अन्य कोणापेक्षाही या साऱ्या कर्मचाऱ्याना राष्ट्रपतींनी राष्ट्रपतिभवनातच राहावे असे मनापासून वाटते त्यापैकी एका कर्मचाऱ्यानेच स्टेट्समनच्या प्रतिनिधीजवळ असे बोलून दाखविले की राष्ट्रपतींनी छोटया निवासस्थानाची मागणी केली की आम्ही सगळेच अस्वस्थ होतो समजा, राष्ट्रपतीची ही कल्पना आकारास आली नाही तरीही आमच्या मनात कालवाकालव होत असतेच. कारण प्रत्येक नवीन राष्ट्रपति आपल्याबरोबरच आपली माणसेही भवनात घेऊन येतो. त्याची सोय लावता यावी म्हणून अनेक मंडळीच्या बदल्या होतात. त्यामुळे आम्हा कर्मचाऱ्याच्या दृष्टीने हा नवीन राष्ट्रपतीच्या आगमनाचा काळ मोठाच नाजूक असतो राष्ट्रपतिभवनाच्या खर्चासाठी ७० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली असते. या वार्षिक खर्चामध्येच इमारतीच्या देखभालीच्या खर्चाचा समावेश असतो. राष्ट्रपतिभवनामध्ये एकूण १५ गाडया असून त्यापैकी पाच विदेशी आहेत. या गाडयाच्या वापरावर आणि तदुरुस्तीवर बरीच मोठी रक्कम खर्ची पडते समजा राष्ट्रपतींनी छोटया निवासस्थानामध्ये राहवयास जायचा आपला निर्णय अमलात आणला तर भवनाच्या हजार कर्मचाऱ्याना तरी हरी हरी म्हणत घरी बसून राहण्याची वेळ येईल. राष्ट्रपतीचे निवासस्थान एवढाच काही राष्ट्रपतिभवनाचा उपयोग नाही तर अनेक मान्यवर परदेशी पाहुण्याची याच निवासस्थानामध्ये उत्तम सोय लावता येते. भवनामध्ये साठ उत्कृष्ट 'निवासी सूटस्' असून तेथे अनेक मातब्बर परदेशी पाहुणे राहून गेले आहेत. राष्ट्रपतिभवन असे या वास्तूचे नाव असले तरी स्वत. राष्ट्रपति आणि त्याचे कुटुंबीय याचे निवासासाठी ३४० खोल्या व हॉल्स पैकी -केवळ दहा खोल्या वापरण्यात येतात. म्हणजेच या भवनाबाहेर त्याना छोटया निवासस्थानामध्ये जायचे असेल तरीही प्रत्यक्षामध्ये मात्र त्याना स्वत चे वापरासाठी जास्त मोठी जागाच स्वीकारावी लागणार आहे राष्ट्रपतिभवनामधील आणखी एक हुकमी कार्यक्रम म्हणजे सरकारी खाने. राष्ट्रपतीमार्फत अथवा शासनामार्फत हे खाने दिले जातात. कधी कोणा परदेशी पाहुण्याच्या

सन्मानार्थ तर कधी काही राष्ट्रीय समारंभाच्या निमित्ताने या खान्याचे आयोजन करण्यात येते आणि राष्ट्रपतिभवनामध्ये त्याची उत्तम सोय होऊ शकते., आता राष्ट्रपतींसाठी नवीन निवास शोधायचा असेल तर या नवीन निवासस्थानामध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बरीच मोठी रक्कम खर्ची टाकावी लागेल आणि त्यातून पुन्हा विद्यमान राष्ट्रपति एन. संजीव रेड्डी याच्या नंतर येणाऱ्या राष्ट्रपतींना ते निवासस्थान पसत पडले नाही तर त्यातून राष्ट्रपतींच्या कायम निवासस्थानाचा प्रश्न निर्माण होईल. पतप्रधानाच्या निवासस्थानाच्या बाबतीत नेमके हेच झाले. कै. लालबहाद्दूर शास्त्रीजी जर सरळ 'तीन मूर्ती' या जवाहरलाल-जींच्या निवासस्थानामध्ये राहायला गेले असते तर हा प्रश्न निर्माण झाला नसता. आता मोरारजीभाईंनी योग्य ती दुरुस्ती केली असून १ सफदरजगरोड, या माजी पतप्रधानाच्या निवासस्थानामध्ये आपला मुक्काम हलविला आहे. आता मोरारजीभाईंच्या नंतर येणारे पत-प्रधान आपोआपच या जागेची निवड करतील.

समजा क्षणभर असे गृहीत धरले की राष्ट्रपतींनी आपले निवास-स्थान बदलले तर राष्ट्रपतिभवनाचा उपयोग कसा करणार? मागे कै. गांधीजींनी एकदा असे सुचविले होते की-या वास्तूमध्ये गरिबां-साठी हॉस्पिटल काढावे. आता जनतापक्षाचे काही नेते म्हणतात-की 'राष्ट्रीय म्युझिअम'साठी म्हणून ही जागा वापरावी, परंतु या दोन्ही सूचनामध्ये फारसे तथ्य नाही. कारण या कारणासाठी वापरता येण्याजोग्या अनेक इमारती दिल्लीमध्ये आहेत. राष्ट्रपति-भवनाभोवती जे एक सपन्नतेचे वलय आहे त्यामुळे अनेकांना ही वास्तू गरीब देशावरील जुलमी राजवटीचे प्रतीक वाटते. एक गोष्ट मात्र सगळेच मान्य करतात की, वास्तुशिल्पाच्या कसोटीवर राष्ट्रपतिभवन ही एक अप्रतिम वास्तू आहे आणि जगामधील राष्ट्रप्रमुखाच्या उत्कृष्ट निवासीवास्तूमध्ये या वास्तूचा समावेश होतो.

राष्ट्रपतींच्या निवासस्थानासबधी बरेच काही झाले. आता विद्यमान राष्ट्रपति निलम सजीव रेड्डी यांच्याबद्दल थोडेसे. राष्ट्र-पतिपदी निवड झाल्यापासून ते या नवीन पदाचा शपथविधी होईपर्यंत राष्ट्रपति पत्रकाराशी फारसे बोलले नाहीत. धर्मयुगच्या धीला झुनझुनवाला याच्याबरोबर ऐसपैस गप्पा मारून त्यानी आपल्या आयुष्यामधील काही महत्त्वपूर्ण प्रसंगाचा तपशील त्यांना पुरविला. सर्वसाधारण वाचकाला सजीव रेड्डी हे कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यापैकी एक होते आणि या देशात राष्ट्रपतिपदासाठी जी सर्वांत चुरशीची निवडणूक झाली त्या निवडणुकीमधील ते पडेल उमेदवार होते, एवढ्या दोनच गोष्टी माहीत आहेत. आज राष्ट्रपतिभवना-पर्यंत झेपावलेल्या रेड्डीजीच्या राजकीय कारकीर्दीचा आलेख अनेक लहानमोठ्या घटनांनी भरलेला आहे.

आंध्रप्रदेशमधील अनतपूर जिल्ह्यामधील इल्लरू नावाच्या छोट्या गावात एका शेतकरी कुटुंबामध्ये निलम सजीव रेड्डी याचा जन्म झाला. थिऑसॉफिकल स्कूल या शाळेचे प्राचार्य सी. वी. सुब्बाराव रेड्डी याच्या शिकवणुकीचा आणि आदर्शवादी विचार-सरणीचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला त्यांच्या त्या वेळच्या शिक्षकामध्ये आणखी कोण असावे?-पुढे केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये त्यांच्याबरोबरच मंत्रिपद भूषविणारे व्ही. के. कृष्ण मेनन-त्यांचे रिशिवैलीच्या थियॉसॉफिकल स्कूलमध्ये त्याचे पी. टी. शिक्षक होते. रेड्डीजीनी त्यांना ओळखले नाही; परंतु सरक्षणमंत्री असताना व्ही. के. कृष्ण मेनन यानीच त्या वेळी केंद्रीय मंत्री असलेल्या रेड्डीजींना आपली ही जुनी ओळख देऊन विचारले होते-आठवते का मी तुमचा पी टी. शिक्षक होतो ते? रेड्डीच्या जीवनाला आकार देणाऱ्या आणखी दोन व्यक्ती म्हणजे त्याचे वडील आणि मामा वडील आणि मामा दोघेही कडवे राष्ट्रवादी होते आणि परस्पर सहकार्याने उत्तम काम करीत असत. दुर्दैवाने वयाच्या केवळ १८ व्या वर्षी रेड्डीजीचे वडील वारले. १९३३ मध्ये वडिलांचे निधन झाल्यावर त्यांची जागा मामाने घेतली. राजकीय वाटचालीमध्ये मामानी रेड्डीना सतत प्रोत्साहन दिले, प्रेरणा दिली. मामा ,नेहमी म्हणायचे-घराची काळजी करू नकोस! ते मी सांभाळीन. तू तुझे काम कर!

राजकारणाची पहिली प्रेरणा आपल्याला कशी मिळाली? या प्रश्नाला उत्तर देताना राष्ट्रपति म्हणाले-मी त्या वेळी मॅट्रिक होऊन बंगलोरहून आमच्या जिल्ह्याच्या गावी म्हणजे अनंतपूरला आलो होतो. परीक्षा पास झाल्याने खिसा गरम होता खिशात चागले तीनशे रुपये होते त्याच दिवशी महात्मा गांधी अनतपूरमध्ये येणार होते. सगळ्या गावात उत्साहाचे वातावरण होते. महात्माजी आले, त्याना भेटायला अनेक लोक येत होते प्रत्येकजण काही ना काही भेट देत होता आणि गांधीजी भेट मिळालेल्या वस्तूंचा लगो-लग लिलाव करीत होते. रेड्डीजी तिथे गेले-तेव्हा लिलाव चालू होता. कोणा एकाने शाल व पेंटिंग्ज भेट म्हणून दिले होते. एक चांदीची वस्तूही होती. माझ्याजवळ तीनशे रुपये असले तरी सगळे पैसे खर्च करणे शक्य नव्हते. कारण माझ्या फीची, तसेच मासिक खर्चाची रक्कम त्याचमध्ये होती; पण त्या वेळच्या उत्साहात मला भान राहिले नाही मी खिसे खाली होईपर्यंत बोली बोलत राहिलो आणि ती शाल, पेंटिंग्ज आणि गाधींचे चित्र असलेली चांदीची वस्तू माझी झाली होती. वस्तू घेण्यासाठी माझे मित्र मला ढकलीत होते आणि मी सकोचत होतो विदेशी कपडे घालून राष्ट्रनेत्यासमोर जाण्यास मला धीर होत नव्हता; पण मी बोली बोललो होतो-वस्तू घेण्यासाठी जाणे आवश्यक होते. अखेर मान खाली घालून मी पुढे झालो आणि पैसे देऊन वस्तू घेतल्या राष्ट्रप्रेमाची ऊर्मी तीव्र असतानाच मी खादीभवनात गेलो आणि स्वत.साठी खादी खरेदी केली. १९२९ सालची गोष्ट आहे ही. त्या वेळी मी केवळ १५-१६ वर्षांचा होतो. तेव्हा मी जे खादीचे व्रत स्वीकारले ते आजपर्यंत पाळीत आलो. त्या वेळी गांधीजींकडून लिलावामध्ये विकत घेतलेले ते पेंटिंग्ज आणि चांदीची वस्तू आजही माझ्या सग्रहात आहे.

## तुरुंगातील एक अनुभव

काही राजकीय चळवळीच्या संदर्भात १९४० साली मला सहा महिन्याची शिक्षा झाली वर ५०० रुपये दंडही झाला. दंड भरला नाही म्हणून वडिलार्जित मालमत्तेपैकी काही भागावर टाच आणण्यात आली. सहा महिने सपल्यावर माझी पत्नी पाच-सहाशे मैलांचे अंतर कापून मला जेथे ठेवले होते त्या त्रिचनापल्ली-जेलमध्ये आपल्या वडिलांबरोबर येऊन पोचली. बरोबर तीन वर्षांचा एक आणि दीड वर्षांचा एक अशी माझी दोन मुलेही होती. जेलला

दोन दरवाजे होते सुटकेचा हुकूम हाती असल्याने एक दरवाजा पार करून मी बाहेर आलो दुसऱ्या दरवाजाबाहेर उभे असलेले माझे प्रियजन माझी आतुरतेने वाट पाहत होते. मीही त्याना भेटायला उत्सुक होतो मी पाय उचलला तेवढ्यात जेलचे अधिकारी काही पोलिसअधिकाऱ्याना घेऊन आले. पहिली शिक्षा भोगून मी बाहेरची मोकळी हवा जरा कुठे खातो तोच माझ्या अटकेचा हुकूम पुन्हा बजावण्यात आला आणि मला तसेच आत नेण्यात आले. दूर अतरावर दुसऱ्या गेटाबाहेर उभी असलेली माझी पत्नी, सासरे हा सगळा प्रकार पाहत होते. मला पुन्हा आत नेण्यात आले म्हणजे नेमके काय झाले हे त्याना समजून चुकले. वीस-बावीस वर्षांची माझी पत्नी मनातून पुरती कोमेजून गेली असेल, पण केवळ मला वाईट वाटेल म्हणून काही झालेच नाही असा भाव चेहऱ्यावर ठेवून तिने त्या दूर अतरावरून हात हलवून माझा निरोप घेतला.

### आणीबाणीनंतरची पहिली सभा

१९७१ साली देशामधील जनतेने प्रचड बहुमताने इदिराजीना निवडून दिले त्यानतर सघटना कॉंग्रेसनेत्याच्या बैठकीमध्ये एन. संजीव रेड्डी यानी आपल्या मित्राचा राग पत्करून एक अगदी वेगळी भूमिका स्वीकारली. ती म्हणजे जनतेने इदिराजीवर विश्वास व्यक्त केला आहे. आपण गरिबी दूर करणार असे त्या म्हणत आहेत. तेव्हा काहीही विरोधी चळवळ न करता त्याना आपण एक सधी द्यावी. त्यांच्या सहकाऱ्याना त्याचे मत पटले नाही, परतु आपला निर्णय आपण आपल्यापुरता अमलात आणायचा असे ठरवून आणि कोणत्याही राजकीय चळवळीमध्ये सहभागी व्हायचे नाही असा निर्णय घेऊन एन. सजीव रेड्डी यानी राजकारण-निवृत्ती जाहीर केली आणि ते आपल्या गावी शेती करण्यास गेले. राजकीय प्रसिद्धीची झळाळी असलेल्या नेत्याला हा असा वनवास फारसा सुखावह नसतो, परतु तो त्यानी आपण होऊन पत्करला आणि आणीबाणीचे पर्व सुरू होईपर्यंत त्यानी एकाही सार्वत्रिक सभेमध्ये भाषण केले नाही. त्याचे इल्लरू नावाचे जे गाव आहे तेथपर्यंत पक्की सडक झालेली नाही गावामध्ये कोणत्याच पक्षाचे वर्चस्व नाही अशा वातावरणामध्ये रेड्डीजी पूर्णपणे शेतीच्या कामामध्ये मश्गुल झाले होते. वर्षामागून वर्षे जात होती. वेगळ्या वातावरणामध्ये आणि पूर्ण मानसिक समाधानात हा उभी हयात राजकारणामध्ये घालविलेला नेता कित्येक वर्षांनतर आपल्या घरेलू गोष्टीमध्ये लक्ष घालीत होता. याचा अर्थ असा नाही की, राजकीय क्षेत्रामध्ये त्याची दखलच घेतली जात नव्हती. कारण ते जरी असे आडबाजूला गेले असले तरी अनेक नेते, कॉंग्रेसचे मत्री वगैरेही त्याच्या भेटीला जात असत चहापाणी होई, गप्पाटप्पा होत; परतु राजकारणाचा विषय ते कटाक्षाने टाळीत असत. सर्वांना एकच आश्चर्य वाटत असे की, संजीव रेड्डी गप्प कसे ? माझे हे मौनव्रत ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. माझ्या मर्जीने इदिरासरकारसबधी मी एक निर्णय घेतला होता आणि मी त्याची प्रामाणिकपणे अमलबजावणी करीत होतो, पण आणीबाणी घोषित होण्यापूर्वी दोन–तीन महिने ज्या घटना घडत होत्या त्यामुळे मी अस्वस्थ झालो होतो माझ्या कॉंग्रेसमधील मित्रानाच मी काही प्रश्न विचारण्यास प्रारभ केला. मी विचारीत असे, 'देशामध्ये हे काय चालले आहे ?' परतु कोणीच मोकळेपणे बोलत नसे. आणीबाणी घोषित होण्यापूर्वीच इदिराजी आपले महत्त्व वाढविण्याच्या मागे आहेत आणि त्याचे सारे राजकारण केवळ व्यक्तिगत हित लक्षात घेऊनच चालविले जात आहे असे लक्षात आल्यावर मी विचार केला की, माझ्यासारख्या चाळीस–पचेचाळीस वर्षे राजकारण केलेल्या माणसाने राजकीय परिस्थिती इतकी बिघडल्यावर केवळ शेतीच करीत राहायचे काय ? आणि या प्रश्नाला माझे मीच उत्तर दिले की, आता फार झाले आणि ज्या दिवशी मला असे वाटले त्या दिवसापासून मी मोकळेपणाने बोलू लागलो. तथापि मी जाहीर सभातून फारसा बोलत नव्हतो राजकीय कार्यकर्ते, नेते याच्याबरोबर मात्र मनमोकळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या मौन स्वीकारल्यानतर मी जाहीर सभातून भाषण करणे जवळजवळ सोडूनच दिले होते पुढे *आणीबाणीचे भीषण पर्व सपून वातावरण बदल*णार असे दिसू लागले. निवडणुका घोषित झाल्या सभाना परवानगी मिळू लागली १९७७ च्या मे महिन्यात हैद्राबादला जयप्रकाशजींची सभा होती. सभेला प्रचड जनसमुदाय जमला होता. भव्य मचावरून जयप्रकाशजी धीरगभीरपणे बोलत होते एक लाखाहून जास्त लोक एकाग्र चित्ताने जयप्रकाशजीचे विचार ऐकत होते. मी पण गर्दीत एका बाजूला उभा होतो लोकानी मला ओळखले आणि एकच गलका केला– आणि मी भाषण केलेच पाहिजे असा आग्रह सुरू झाला. जयप्रकाशजीचे भाषण सपले होते आणि जनतेला आता सजीव रेड्डी हवे होते; पण जयप्रकाशजीनतर मी काय आणि कसे बोलणार असे मी विचारले, पण जनता काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीमध्ये नव्हती. स्वत जयप्रकाशजीनीही मी बोलावे असा आग्रह केला आणि सहा वर्षांच्या अज्ञातवासानतर मी वक्ता म्हणून

पृष्ठ ३२ वर


## वर्गणीदारांस सूचना

१ : अंक न मिळाल्याची तक्रार अक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२ : वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमाकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३ : तीन वर्षांची वर्गणी १००।– रुपये आहे.

४ : रु. ३००/–ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

# टिटोंची मॉस्को भेट

## स्वतंत्रता टिकवून मैत्री

वा. दा. रानडे

युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष टिटो यांनी नुकतीच मॉस्कोला भेट दिली आणि रशियाच्या सुप्रीम सोव्हिएटचे अध्यक्ष ब्रेझनेव्ह यांनी 'ऑर्डर ऑफ दि ऑक्टोबर रेव्होल्यूशन' हा किताब देऊन, त्याचा सन्मान केला. गेल्या नोव्हेंबरात बेलग्रेडला ब्रेझनेव्ह यानी भेट दिली होती तिची ही परतफेड होती. दोन्ही भेटी औपचारिक असल्या तरी दोन्ही देशातील वाढत्या सहकार्याच्या संबधाच्या त्या निदर्शक होत्या.

टिटो सध्या ८५ वर्षांचे आहेत. त्याच्यानंतर युगोस्लाव्हियाचे काय होणार ? टिटोंचे वारसदार आपल्या देशाचे स्वतंत्र धोरण टिकवितील की रशियाच्या मदतीने किंवा हस्तक्षेपाने मॉस्कोला अनुकूल अशा नेत्याच्या गटाच्या हाती देशाची सूत्रे जातील ? मॉस्कोच्या उद्देशाबद्दल ही शंका टिटोंना गेली चार–पाच वर्षे वाटत होती; पण ती आता पूर्णपणे नव्हे तरी बरीच दूर झालेली आहे.

आतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ दीर्घ काळ रशियाच्या प्रभावाखाली होती. रशिया जे धोरण ठरवील तेच जगभरच्या कम्युनिस्ट पक्षाना अनुसरावे लागे मग ते त्याना मान्य असो–नसो, त्याच्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार ते योग्य असो–नसो. रशियाच्या या वर्चस्वाविरुद्ध कम्युनिस्ट चळवळीत टिटोनी प्रथम बंड पुकारले. आमच्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार समाजवादी क्रातीचा आमचा स्वतत्र मार्ग आम्ही चोखाळणार अशी भूमिका त्यानी घेतली. स्टॅलिननी आर्थिक नाकेबंदी करून टिटोना नमते घ्यावयास लावण्याचा खूप प्रयत्न केला; पण टिटो नमले नाहीत. त्यानी अमेरिकेची व पाश्चात्य राष्ट्राची मदत काही प्रमाणात घेतली; पण तीही आपल्या स्वतत्र धोरणास कोणत्याही प्रकारे बाध येऊ न देता. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर क्रुश्चोव्ह यानी टिटोशी मिळते घेतले. मध्यंतरी काही काळ सबध बिघडले तरी ते पुन: सुधारले आणि ब्रेझनेव्ह यांनी तेच धोरण पुढे चालू ठेवले आहे.

प्रत्येक देशातील कम्युनिस्ट पक्षास त्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार समाजवादाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारता येईल असे धोरण क्रुश्चोव्ह यानी जाहीर केले होते, पण हगेरीत उठाव झाला तेव्हा तेथील सरकार वाचविण्यासाठी रशियाने फौजा पाठविल्या. पुढे काही वर्षांनी चेकोस्लोव्हाकियात डुबचेकेकडे कम्युनिस्ट पक्षाची सूत्रे गेली. तेव्हा ते सरकार पाडून रशियाच्या बाजूचे सरकार तेथे आणण्यासाठी वॉर्साकरार राष्ट्राच्या फौजा तेथे पाठविण्यात आल्या. कम्युनिस्ट चळवळीवर आपले प्रभुत्व टिकविण्याचे धोरण रशियन-नेत्यानी अजूनही सोडलेले नाही असे या घटनेमुळे टिटोना पुन: वाटू लागले; पण काही वर्षांनी बर्लिन येथे भरलेल्या युरोपातील कम्युनिस्ट पक्षाच्या परिषदेने त्याना दिलासा दिला कम्युनिस्ट पक्षाना स्वत च्या देशातील परिस्थितीनुसार धोरण ठरविण्याची आणि समाजवादी क्रातीचा स्वतःचा मार्ग स्वीकारण्याची पूर्ण मोकळीक असली पाहिजे हे तत्त्व स्पष्टपणे मान्य करण्यात आले. इटली, फ्रान्स, स्पेन या पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट पक्षानी तर कामगारवर्गाची हुकूमशाही या मार्क्सवादाच्या मूलभूत सिद्धान्ताचा त्याग केला असून ससदीय लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणण्यावर विश्वास व्यक्त केला आहे. बर्लिनच्या परिषदेतही त्यानी ही भूमिका स्पष्टपणे मांडली आणि ब्रेझनेव्ह याना ही भूमिका पसत नसली तरी कम्युनिस्ट पक्षाना धोरण ठरविण्याची मोकळीक असली पाहिजे हे त्याना मान्य करावे लागले.

युगोस्लाव्हियाच्या दृष्टीने आणखी एक अनुकूल घटना म्हणजे हेलसिंकी परिषदेच्या निर्णयाचे अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी पस्तीस राष्ट्राची परिषद ४ ऑक्टोबरला बेलग्रेड येथे भरविण्याचे ठरले आहे. हेलसिंकी येथे १९७५ मध्ये युरोप सुरक्षा व सहकार्य परिषद भरली होती. पश्चिम आणि पूर्वयुरोपच्या दरम्यान अधिक खुले दळणवळण व्हावे त्या दृष्टीने प्रवास, वृत्तपत्रे यावरचे निर्बंध कम्युनिस्ट राष्ट्रानी बरच कमी करावे हा या परिषदेतील मुख्य निर्णय. रशियाने त्याबाबत विशेषत: मानवी हक्काबाबत दिलेली आश्वासने पाळली नाहीत अशी अमेरिका व पाश्चात्य राष्ट्राची तक्रार आहे. त्याचाही विचार एक उपसमिती करणार आहे. ही परिषद शक्यतो लाबणीवर टाकावा, त्यात आपणास अप्रिय अशा प्रश्नावर शक्य तो चर्चा होऊ नये असा रशियाचा प्रयत्न होता; पण पाश्चात्य राष्ट्रे आणि तटस्थ राष्ट्रे याच्या सयुक्त दडपणामुळे रशिया व कम्युनिस्ट राष्ट्रगटाला अखेर नमते घ्यावे लागले. या परिषदेत २२ डिसेंबरपर्यंत शक्यतो अतिम पत्रक संमत करण्याचा प्रयत्न केला जाईल. ते न जमल्यास जानेवारीच्या मध्यास पुन परिषद भरून ती फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत चालेल. सभासद राष्ट्रानी इच्छा व्यक्त केल्यास ती आणखीही लाबविता येईल; पण ही परिषद म्हणजे परस्परावर आरोप–प्रत्यारोप करणारा केवळ वादविवादसघ न बनता निश्चित निर्णय घेतले जावेत असा प्रयत्न या वेळी केला जाणार आहे.

मॉस्कोच्या भेटीनतर टिटो पेकिंगलाही भेट देणार आहेत. टिटोच्या धोरणावर फार कडक टीका चिनी नेत्यानी यापूर्वी केलेली आहे. माओत्सेतुग आज असते तर ही भेट झाली असती का हा प्रश्न मनात येतो. माओच्या निधनानतर चीनच्या धोरणात जो बदल झाला आहे त्यामुळेच ही भेट होऊ शकत आहे. टिटोचे धोरणे चानच्या नव्या नेतृत्वास मान्य आहेत असा याचा अर्थ-नाही; पण आतर राष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीतील रशियाचा उरला–सुरला प्रभाव कमी करण्यासाठी टिटोचा उपयोग कसा करून घेता येईल या दृष्टीने चिनी नेते या भेटीकडे पहात आहेत.

चीनला टिटोची भेट दुसऱ्या एका दृष्टीने महत्त्वाची वाटत, ती म्हणजे टिटो हे अलिप्त राष्ट्रसघटनेचे एक प्रमुख नेते आहेत. या सघटनेबद्दलचे आपले पूर्वग्रह सोडून तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न चिनी नेते करीत आहेत. टिटोशी बोलणी या दृष्टीने उपयुक्त ठरतील असे त्याना वाटते.

याच सदर्भात भारताचे परराष्ट्रमत्री अटलबिहारी वाजपेयी याची पुढील महिन्यात व्हावयाची बेलग्रेड–भेट महत्त्वाची ठरणार आहे. टिटो तोपर्यंत मास्को व पेकिंगला जाऊन आलेले असतील. दोन कम्युनिस्ट देशातील अतर्गत विचारप्रवाहाची अधिक जवळून कल्पना येण्यास त्यामुळे मदत होईल. अलिप्त राष्ट्रसघटनेचे सर्वात ज्येष्ठ नेते या दृष्टीने या सघटनेला अधिक बळकटी कशी आणता येईल याबाबतही वाजपेयी टिटो याच्याशी विचारविनिमय करतील. भारतात नवी राजवट आल्यानतर त्याची टिटोशी प्रथमच बोलणी होणार आहेत. या राजवटीच्या धोरणासबधी त्याच्या काही शंका व गैरसमज असल्यास ते दूर करून दोन्ही देशातील सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीनेही वाजपेयीची ही भेट उपयुक्त ठरेल.

□

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर

# सोमाली व इथिओपिया

## रशियाची जुनी दारू नव्या बाटलीत

इथिओपिआ आणि सोमाली या दोन दक्षिण आफ्रिकेतल्या राष्ट्रांमध्ये कुरबूर वाढून आता सरळ युद्धाची परिस्थितीच निर्माण झालेली आहे. आजपर्यंत सामान्यतः अशी परिस्थिती असे की दोन राष्ट्रांच्या युद्धामध्ये प्रत्यक्षात अमेरिका व रशिया हेच प्यादी हलवीत असत. अमेरिकेची पुरेशी मानहानी होऊन तो देश कार्टरच्या अध्यक्षतेखाली ' जगा आणि जगू या ' अशा धोरणाकडे वळत आहे;, पण गंमतीची गोष्ट म्हणजे इथिओपिआ आणि सोमाली या दोन्ही देशांना प्रामुख्याने रशियाचीच मदत आहे.

दक्षिण आफ्रिकेत क्यूबाच्या सहाय्याने अंगोलामध्ये रशियाने मुसंडी मारलेली आहेच; पण साम्राज्यतृष्णा न शमल्याने सध्या रशियाने हवाईदलामार्फत प्रचंड मदत ( अंगोलात केली त्याहून बरीच जास्त ) इथिओपियात ओतली आहे. कारण काय ? • तर इथिओपियामध्ये गत वर्षी झालेल्या राज्यक्रांतीने तेथील हेलेसिलासीची राजवट संपुष्टात आली. त्याची मुलबाळं देशोधडीला लागली. रशियाच्या मते सध्या तेथे कम्युनिस्ट क्रांतीला अत्यंत पोषक वातावरण आहे. म्हणजे सरजामशाहीविरुद्ध असंतोषाची लाट आलेली आहे, ठिकठिकाणी शेतकरी हे जू फेकून देत आहेत, कामगार सशस्त्र पंथ अवलंबीत आहेत. तेव्हा अशा क्रांतीने परिपक्व परिस्थितीत त्या देशाला मदत करणे हे मार्क्सलेनिनचा दैदीप्यमान' वारसा सांगणाऱ्या आमचे कर्तव्यच आहे. म्हणून इथिओपियाकडे हा ओघ चालला आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की इथिओपियात असंतोष आहे; पण त्याला नीट वळण देईल अथवा त्याचे नियंत्रण करील असा vanguard असणारा सुसंघटित कम्युनिस्टपक्ष तेथे अस्तित्वात नाही. अर्थात रशिया याकडे सोइस्कर डोळेझाक करतोच

प्रश्न निर्माण कुठे होतो, तर इथिओपियाच्या आणि सोमालीच्या सीमा लागून आहेत. एका राष्ट्रातल्या अंतर्गत परिस्थितीचा दुसऱ्यावर परिणाम होणे अपरिहार्य आहे. त्यात विरोधाभास असा की सोमाली हे रशियाचे अंकितातच जमा असे राष्ट्र आहे. रशियाच्या मदतीवर ते उभे आहे म्हणजे एक अंकित राष्ट्र व त्याच्या शेजारचे भावी मांडलिक राष्ट्र याच्यात किमर्थ झगडा लावून द्यायचा ? यात रशियाचा डाव केवळ आपली शक्तिकेंद्रे वाढविणे हा तर आहेच; शिवाय पश्चिमेच्या व अमेरिकेच्या सामर्थ्याचा अंदाज घेणे हाही आहे. सोमाली हे अरब नसूनही अरबलीगचे सभासद असलेले एकमेव राष्ट्र आहे. त्याच्या बर्बरा या बंदराबर रशियाचा सशस्त्र तळ आहे. त्यामुळे रशियाला सोमालीची गरज आहे तेवढेच सोमाली याबाबतीत असहाय आहे. रशियनाना सादातने जसे इजिप्तमधून रात्रीत हाकलून दिले , तसे करणे त्यामुळेच सोमालीला शक्य नाही, पण हे जाणूनच अरबलीगमधील इतर राष्ट्रे–सौदीअरेबिया, सुदान आणि इजिप्त ही अमेरिका, फ्रान्स आणि इग्लंडवर दडपण आणण्याचा व त्याद्वारे हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सोमालीचा राष्ट्राध्यक्ष सियाद बार्रे हा अत्यंत धूर्त माणूस आहे. त्याने रशियनाची ताकद जोखली आहे आणि जास्तीत जास्त फायदा उठवून कमीत कमी तोटा कसा होईल हे तो पुरे जाणतो. म्हणूनच गेल्याच पंधरवड्यात रशियाची शस्त्रानी काठोकाठ भरलेली तीन जहाजे मोगादिशू या सोमालीच्या राजधानीत दाखल झाली आणि त्याच सुमारास रशियाची युगांडाला मदत म्हणून चाललेली सशस्त्र विमाने अडविण्यात आली. शेवटी नीट ताकीद देऊनच ही विमाने सोडण्यात आली रशियनांना जास्त सवलती देणे असे आपोआपच कमी झाले

जॉर्ज साम्सोनोव हा रशियाचा सोमालीतील राजदूत याची परवापरवापर्यंत फार गडबड चाले. आता परिस्थिती बदलली. त्याचे लोकांच्यात सारखे वावरणेही कमी झाले आणि ब्रेझनेव्हचे पत्र सोमालीचा अध्यक्ष– सियाद बार्रे याला पोचवायला तब्बल पधरा दिवस घेतले गेले' हा सारा परिणाम इथिओपिअन क्रांती कोणतीही किंमत देऊन आपल्याला यशस्वी करायचीच आहे असा या राजदूतमहाशयाच्या विधानाचा होता.

इथिओपिआत क्रांती म्हणजे सीमेवर तगी. सध्याच प्रतिदिनी १०,००० लोकाचे बळी पडत आहेत हा नरमेध कसा थाबेल 'या चिंतेत सोमाली आहे एरिट्रिया, ओगडेन, अवाश व्हॅली, बेल आणि अरुआचा सखल प्रदेश या विवाद्य विभागावर इथिओपिआशी युद्ध चालू आहेच. दोन्हीकडून रशियाची शस्त्रे वापरली जात आहेत.

रशियाचा तांबड्या समुद्रातला हस्तक्षेप हा सौदीअरेबिया, इजिप्त आणि सुदान याच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तिथे रशिया काय हालचाल करतो त्यावरची त्यांची प्रतिक्रिया पाश्चिमात्य जगावरच्या दडपणात आणि पाश्चिमात्य जगाची युद्ध थांबविण्यात होईल असा एकुण रंग दिसतो. ※

## ☐ अशी पाखरे येती आणिक खून करूनि जाती !

सगळ कसं एखाद्या चागल्या इंग्रजी सिनेमातल्यासारख. एका शहरात ओळीन सहा खून, सात जखमी, आठ प्रयत्न, शेकडो पोलिस राबतायत् अन् हजारो नागरिक घाबरलेत. खून झालेल्यात तरुणी जास्त वर, खूनही सांगूनसवरून, अमुक दिवशी अमुक विभागात खून होणार म्हणजे होणार ! तेही त्या एकाच पिस्तुलान !

तर हे हत्याकांड अखेर थाबलं. ' सन ऑफ सॅन ' या नावान न्यूयॉर्कला गेल्या बारा महिन्यात सळो की पळो करून सोडणारा डेव्हिड बेर्कोव्हिट्झ् एकदाचा गजाआड

गेला. मध्यंतरी पोस्टनमध्ये अशाच एका रामन् राघवन्नं हलकल्लोळ माजविला होता अन् मागच्या २९ जुलैला या चिरंजिवानी पहिला खून केला. त्यानंतर आधी पोलिसाना वृत्तपत्राना ' सन ऑफ सॅम ' या नावानं पत्रं यायची न् खुनांचं सत्र सुरुच.

आतापर्यंत कधी नाही एवढे शंभर पोलिस-ऑफिसर्स या खुन्यासाठी राबत होते. न्यूयॉर्क पोलिसानी वेगळं खातंच उघडायचं बाकी ठेवलं होत. ०·४४ कॅलिबरच्या बुलडॉग पिस्तुलानं सगळे खून झालेले. मागं काहीही धागादोरा नाही. शहरभर दहशत. तरुणाचा रात्री भटकण्याचा रंगेलपणाही या दहशतीनं कमी झाला. डिस्कोथेक्स, नाइटक्लब्ज् कॅफेज्, सगळीकड पोलिसाचा सुळसुळाट झाला. विशेषत. क्वीन्स, ब्रॉक्स या भागात. पोलिसांच्या हातात फक्त पत्र आणि दोनचार साक्षीदाराच्या साक्षी; पण पत्रावरुन पोलिसांनी प्रयत्नाची शर्थ केली. हा माणूस मानसिक वशाचा आहे, कायद्याचा अभ्यास केलेला आहे, ही पुढं अचूक ठरलेली माहिती काढली. अशी २५०० माणसं तपासण्यात आली, पण व्यर्थ ! खून झालेल्यात तपकिरी रंगाचे लांब केस असणाऱ्या तरुणीच जास्त होत्या. खून शहाराच्या विशिष्ट भागात होत होते. मेमध्ये एका वृत्तपत्रसंपादकाला आलेल्या पत्रानुसार २९ जुलैला खूनसत्राच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त 'सन ऑफ सॅम' नवीन खून पाडणार होता. पोलिसानी कडेकोट बंदोबस्त केला न् प्रथमच सांगून खून झाला नाही. खून झाला, पण दोन दिवसानी; तोही शहराच्या चार निराळ्या भागात, पण सुदैवान हा शेवटचाच ठरला. स्टॅसी मास्कविट्झ् ही दुर्दैवी मुलगी तिच्या मित्राबरोबर ब्रुकलीन विभागातल्या पाण्याच्या रिझर्व्हॉयरवरच पूर्णिमेच्या चंद्राचं सौंदर्य मोटारीत बसून पहात होती. तेवढ्यात 'सन ऑफ सॅम' उगवला. त्यानं चार गोळ्या झाडल्या. स्टॅसी तिथच गतप्राण झाली. मित्र जखमी झाला; पण याआधीच दोनतीन मिनिट 'सन ऑफ सॅम'ला त्याच्या फोर्ड गाडीतून उतरताना एका मध्यमवयीन बाईन पाहिला होता. तो तिच्याच रोखान आधी गेला. मग काय डोक्यात आलं कोणास ठाऊक–तिला त्यान जाऊ दिल. तो सरळ पळतच सुटली; पण तेवढ्यात एक पोलिस पार्किंग तिकिट त्याच गाडीच्या विंडस्क्रीनखाली सरकवताना तिन पाहिला. ती आपल्या घराच्या पायऱ्या चढतीय न चढतीय तोच मागं गोळ्याचा आवाज आला. तिन सरळ पोलिसस्टेशन गाठलं आणि माणसाचं वर्णन, पार्किंगतिकिट, सगळं सांगितलं. तावडतोब त्या दिवशीची सगळी पार्किंगतिकिट कसून तपासण्यात आली अन् कॉम्प्युटरच्या मदतीनं गाडीची नावनिशाणी मिळविली गेली आणि पोलिस सर्न ऑफ सॅमच्या घरी हजर झाले. तेव्हा साहेब सगळ्यात क्रूर अशा मोहिमेवर निघाले होते. एक सबमशीनगन घेऊन हॅम्प्टन्समधील प्रचंड पार्टीत जेवढे जमतील तेवढे (म्हणजे मरतील तेवढे) मारून 'ग्रँड फायनल' करण्याचा त्याचा इरादा होता तेही पत्र त्याच्याच गाडीत सापडलं

पण फार गडबड न करता हवाली झालेला हा २४ वर्षांचा तरुण डोक्यान बादच झालेला असावा असा संशय आहे. सॅम हे त्याच्या शेजारी राहणाऱ्या कार आडनावाच्या गृहस्थाचं नाव. त्याचा कुत्रा याने २७ एप्रिलला चार गोळ्या घालून विनाकारण मारला. आणि परत पोलिसांना 'सॅम हा ६००० वर्षांपूर्वीचा इसम असून तो कुत्र्यामार्फत मला संदेश देतो व ते मी पाळतो' असे तो कळवीत असे. एकूण पत्रांच्या एका वाक्याचा संबंध दुसऱ्या वाक्याशी जोडणे हा जिकिरीचाच प्रकार होता. या सॅम कारन तीन आठवड्यापूर्वीच डेव्हिडचा खुनी असल्याचं सांगितलं होतं. तिकडे पोलिसाचं दुर्लक्षच झालं.

याला पकडल्याचं कळताच त्याला बघण्यासाठी लोकाच्या झुंडीच्या झुंडी लागल्या. प्रचंड सुरक्षिततेत सध्या त्याला ठेवण्यात आलं आहे. ब्रुकलीनच्या गुन्हेगारी कोर्टातील 'कलकत्ता ब्लॅक होल' नावाची अंधारकोठडी त्याच्या नशिबी आली आहे. त्यानं गुन्हा कबूल केला आहेच; पण तो बुद्धीनच जर शाबूत नसेल तर सगळाच प्रश्न बिकट आहे.

पण सगळ्यात एक बातमी न्यूयॉर्कवासियांना धक्कादायक वाटली. ती म्हणजे हा मनुष्य १९७० पासून १९७३ पर्यंत ऑक्झिलिअरी पोलिस म्हणून काम करीत होता ! पोलिसाच्या तर्काप्रमाणे त्याचा कायद्याचाही अभ्यास झालेला होता आणि सध्या रात्रपाळीवर पोस्टामध्ये तो झिपकोडप्रमाणे पत्राना भोके पाडण्याचे काम करीत असे.

त्याच्या अर्धवटपणाचे एक उदाहरण म्हणजे शेवटी पोलिसाना 'ग्रँड फायनल'-बद्दल जे पत्र त्यान लिहिलं होतं त्यात पुढील मजकूर होता–' जोपर्यंत फेग हा फ्रेग आहे तोपर्यंत तिच्या डोक्यावर बंदुकीची दारू सांडलीच पाहिजे तोही ती मरेपर्यंत– माजरे रात्री येतातच आणि विमण्याही' वगैरे वगैरे सत्यकथेतील कविता वाटावी असा हा मजकूर ! १९५० च्या मॅड बॉम्बरशी दहशतीच्या बाबतीत बरोबरी करणारा हा मायेफिक पोस्टासारख्या निरुपद्रवी खात्यातला असावा हेही धक्कादायकच ! ☐

## जाता जाता

भारतातून कोकाकोला कंपनी नुकतीच हद्दपार झाली. प्रचंड प्रमाणात परदेशी जाणारा पैसा वाचला. या कोकाकोला कंपनीने १२ ऑगस्टला दिलेल्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे : १९७१ साली ज्या देशांमध्ये संसदेच्या निवडणुका झाल्या, त्या वीस देशाच्या प्रमुख राजकीय पक्षाना मिळून तेरा लाख डॉलर्स बेकायदेशीररीत्या देण्यात आले. त्या देशातील कोकाकोलाची दलाली रहावी म्हणून ही मदत केली गेली. देशाची नावे दिलेली नाहीत; पण १९७१ संसदीय निवडणुका म्हणजे......

आर्थिक टिपणे :

# औद्योगिक अशांतता !

नारायण वैद्य । सभासद, पुणे महानगरपालिका

पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांच्या पुणे-भेटीच्या दिवशी पुण्याजवळच्या पिंपरी–चिंचवड औद्योगिक परिसरात मोठी दंगल उसळली. एका मोठ्या कारखान्यात प्रारंभ होऊन काही तासातच अनेक कारखान्यापर्यंत त्याचे लोण पोचले. स्कूटर–मोटारी पेटविणे, दगडफेक, जबरदस्तीने काम बंद असे प्रकार काही ठिकाणी घडल्याचे व काहींना अटक झाल्याचे वर्तमानपत्रात वाचावयास मिळाले. या प्रकरणात काही लाखाचे प्रत्यक्ष नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. कामगाराच्यात मोठा असंतोष आहे आणि न्याय मिळविण्यासाठी त्यांचा झगडा चालू आहे हे ठीक; परंतु प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या कामगार-चळवळीत मूठभर बाहेरचे गुंड शिरून त्यांनी संबंध कामगारवर्गालाच बदनाम करावे ही गोष्ट देशातल्या कामगारचळवळीच्या दृष्टीने हिताची नाही, नव्हे हानिकारक आहे हे कामगारनेत्यांनी विसरून चालणार नाही.

'या देशात आता यापुढे घेरावोला थारा नाही आणि जो कोणी या शस्त्राचा वापर करील त्याचा योग्य तो समाचार घेतला जाईल' असे पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी नुकतेच लोकसभेत सांगितले. बंगालचे मुख्य मंत्री श्री. ज्योति बसू यांनीही '(प. बंगाल) प्रांतातल्या औद्योगिक उत्पादनात खंड पडू देण्याचे प्रकार सरकार सहन करणार नाही' असे जाहीर केले आहे. कारण गेल्या काही महिन्यात देशभरचे वातावरण पाहता अनेक प्रांतातून संप, हरताळ, मोर्चे इत्यादि मार्गांनी कामगार आपला असंतोष व्यक्त करीत आहेत. कामगारावर जो अन्याय होतो तो दूर करण्यासाठी, तसेच न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी निदर्शने, मोर्चे या मार्गांचा अवलंब करणे हा कामगाराचा हक्क आहे. एक दिवसाचा लाक्षणिक संप, कामबंदनिदर्शन (tool down strike) हाही मार्ग कामगारांनी वापरला तरी फारसे बिघडत नाही; परंतु संप हे कामगारलढ्यातील वापरण्याचे अखेरचे शस्त्र आहे. देशाच्या अर्थनीतीवर तसेच कामगारव्यवस्थापन यांच्या संबंधावर संपाचे वाईट परिणाम होत असतात. (न्यायाचा बळी देऊन आणि कामगारांनी आयुष्यभर हालअपेष्टा सोसून हे संबंध चांगले ठेवावेत असा याचा अर्थ नाही !) कारण संपामुळे उत्पादन थांबते अर्थनीतीचे चक्र मंदावते. तथापि आज देशभर कामगारात जो असंतोष धुमसत आहे त्याची कारणे व त्यावरचे उपाय यावर गंभीर विचार झाला पाहिजे.

खालील कोष्टकावरून असे दिसेल की, जानेवारी ७७ ते एप्रिल ७७ या काळात देशभर एकूण ४०२ संप झाले त्यापैकी २४१ उद्योगामध्ये वरील काळात १३ कोटी १३ लक्ष रुपयाचे नुकसान झाले. या २४१ उद्योगांव्यतिरिक्त बाकीच्या उद्योगातून संपामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज २० कोटी रुपयापर्यंत जाईल. याच काळात देशात ८४ ठिकाणी टाळेबंदी जाहीर करण्यात आली आणि त्यामुळे ११ लक्ष कामगार बेकार झाले.

हे कारखान्यातून काम करणाऱ्या कामगाराचे झाले ! ह्याव्यतिरिक्त बँका, लाइफ इन्शुअरन्स यातील सेवक पी डब्ल्यू. डीचे इंजिनिअर्स, राज्य विद्युतमंडळाचे कामगार, फिल्मउद्योगातील कामगार यांचीही निदर्शने, आंदोलने चालू आहेतच महाराष्ट्रात कामगाराचा असंतोष फार मोठ्या प्रमाणावर धुमसतो आहे हे अनेक ठिकाणच्या वार्तांवरून ध्यानात येत आहे ठाणे–बेलापूर औद्योगिक पट्टा किंवा पिंपरी–चिंचवड औद्यो-

संपस्थिती व आर्थिक नुकसान (जानेवारी ७७ ते एप्रिल ७७)

| राज्याचे नाव | संपसंख्या (एकूण) | नुकसान (लक्ष रु ) | संपसंख्या (नुकसानीत धरलेले) |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १० | २१ ९३ | ८ |
| बिहार | ५२ | २·४२ | २४ |
| गुजराथ | १९ | ८४ ४२ | १९ |
| हरियाणा | १० | ४७ ९७ | १० |
| कर्नाटक | २० | ९४·३५ | १९ |
| केरळ | २१ | १२·०३ | १९ |
| मध्यप्रदेश | २८ | १२ ८१ | २० |
| महाराष्ट्र | ६९ | ५५४ ३९ | ५६ |
| ओरिसा | ३ | १·०८ | ३ |
| राजस्थान | ३९ | २३·७३ | ९ |
| तामिळनाडू | ५० | ४१५·१३ | २८ |
| उत्तरप्रदेश | २९ | १ ५४ | ३ |
| प. बंगाल | ३९ | ३·६१ | १० |
| गोवा, दमण, दीव | ७ | ५·५२ | ७ |
| पांडेचरी | ६ | ३१·५७ | ६ |
| एकूण | ४०२ | १,३१२·५० | २४१ |

गिक परिसर येथील घटना पुरेशा बोलक्या आहेत. माझगाव डॉक्स लिमिटेड या सरकार-प्रणीत जहाजबांधणी उद्योगात ८ जुलै रोजी ३८०० DWT मालवाहू जहाजाची ऑर्डर पूर्ण करावयाची होती. ती दोन युनियनच्या परस्पर संघर्षामुळे पूर्ण होऊ शकली नाही असे म्हणतात. १८ जुलै रोजी फायमसरने टाळेबंदी जाहीर करून १००० कामगारांना घरी बसविले आहे. अनेक लहान-मोठ्या कारखान्यांतून संपजन्य परिस्थिती वा निदर्शने या ना त्या कारणांनी चालू आहेत अधिकृत वृत्ताप्रमाणे महाराष्ट्रातील ६२ कारखाने आज संपात सापडले आहेत. शिवाय १३ कारखान्यांना टाळेबंदी आहे. त्यांत ४००० कामगारांना फटका बसला आहे.

## असंतोषाची कारणे–बोनसच्या निर्णयाचे स्वागत !

कामगाराच्या असंतोषाची अनेक कारणे आहेत. त्यातले बोनस हे एक प्रमुख कारण होय. आणीबाणीपूर्वी एखादा उद्योग किंवा कारखाना फायद्यात असो वा नसो, कामगाराला ८·३३ टक्के बोनस दिला पाहिजे असा कायदा होता; परंतु १९७५ मध्ये बोनसकायद्यात दुरुस्ती करून कामगाराचा हा हक्क हिरावून घेण्यात आला. आणीबाणीमध्ये तुरुंगाच्या भीतीमुळे या अन्यायाविरुद्ध कोणीही आवाज उठविला नाही; परंतु आणीबाणी संपताच पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारने कामगारावर बोनसबाबत केलेल्या या अन्यायाविरुद्ध प्रचंड आंदोलन सुरू झाले. आता जनतापार्टीने आपल्या निवडणूक-जाहीरनाम्यात बोनसबाबत जे आश्वासन दिले होते ते जनतासरकारने पाळले आणि तारीख १८ ऑगस्ट १९७७ रोजी केंद्रीय मजूरमंत्री श्री. रवींद्र वर्मा यांनी 'कमीत कमी ८·३३ टक्के बोनस देण्याचा पूर्वीचा निर्णय–जो कॉंग्रेससरकारने आणीबाणीच्या काळात रद्द केला होता तो–जनतामंत्रिमंडळाने कायम केला आहे' अशी घोषणा केली.

वरील घोषणेचे देशात सर्वत्र अतिशय चांगले स्वागत होताना दिसत आहे. कामगारवर्गातही आनंदाचे वातावरण पसरले आहे. (केरळ सरकारने एक दिवस आधीच स्वतःच्या राज्यापुरती अशीच घोषणा केलेली आहे ) त्यामुळे देशात अनेक ठिकाणी कामगारवर्गात असलेला असंतोष एकदम कमी होईल व काही ठिकाणची आंदोलनेही मागे घेतली जातील अशी जनतेला आशा वाटू लागली आहे.

१९७६ या हिशोबाच्या वर्षामध्ये ( accounting year ) कमीत कमी ८·३३ टक्के व जास्तीत जास्त २० टक्के बोनस दिला जाणार आहे. सदरची रक्कम कशा स्वरूपात कामगारांना द्यावयाची ते जो तो उद्योग आपआपल्या कामगाराशी चर्चा करून ठरवील. एखाद्या उद्योगाला फायदा झालेला नसला तरी त्याने आपल्या कामगारांना बोनस दिला पाहिजे. हे बोनसबाबतचे नवे तत्त्व जनतासरकारने स्वीकारले. यापूर्वी बोनस रिव्ह्यू कमिटीने ते स्वीकारले आहेच –याबद्दल सरकारचे अभिनंदन केले पाहिजे (याबाबतचे अधिक विवेचन स्वतंत्र लेखात करू.) परंतु लोखंड शुद्ध करण्याचे कारखाने, विविध प्रकारच्या भट्ट्या, कोळशाच्या खाणी, खताचे कारखाने, रासायनिक द्रव्याचे कारखाने, सिमेंटचे कारखाने अशा उद्योगातून बोनसचे कमीत कमी प्रमाण 'अधिक' ठवावे लागेल. म्हणजे केवळ नफ्याशी संबंधित न ठेवता हे जादा प्रमाण कष्टाशीही संबधित ठेवावे लागेल. ज्या काही ठिकाणी इन्सेन्टिव्हच्या स्वरूपात बोनस दिला जातो त्या ठिकाणीही बोनसचे कमीतकमी प्रमाण हे पायाभूत मानले पाहिजे.

असंतोषाचे दुसरे कारण असे की, सरकारी, निमसरकारी, खाजगी अशा तऱ्हेच्या अनेक लहानमोठ्या कारखान्यातून अनेक वर्षे व्यवस्थापनाकडून कामगारावर वेगवेगळ्या कारणासाठी सूड उगवला गेला आहे. संपकाळात काढून टाकलेल्या रेल्वेकामगारांना केंद्र सरकारने नुकतेच परत घेतले आहे; परंतु केंद्र सरकार, राज्य सरकारे यांचे कारखाने तसेच इतर अनेक उद्योगांतून राजकीय कारणासाठी किंवा युनियनचे काम केल्याबद्दल काढून टाकलेल्या कामगारांना आणि सेवकांना कित्येक वर्षे कामावर परत घेतले गेले नाही. (पुण्याजवळच्या सरंक्षणखात्यातील कारखान्यातून राजकीय कारणांसाठी १९६० साली काढून टाकलेल्या कामगारांना अजून परत कामावर घेतले गेले नाही ही केवढी शोकांतिका आहे ! )

तिसरे कारण असे सांगितले जाते की आणीबाणीच्या काळात सरकारने दिलेले उत्पादनवाढीचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी (आणि सरकारकडून त्याबद्दल शाबासकी मिळविण्यासाठी) अनेक ठिकाणी कामगाराचे वर्कलोड बेसुमार प्रमाणात वाढविले गेले; परंतु पगार मात्र वाढविले नाहीत की ओव्हरटाइम दिला नाही आणि आणीबाणीच्या शिस्तीच्या नावाखाली कामगारांना 'ओझ्याचे बैल' (Beast of Burden) केले. त्या काळात कामगारांनी ते निमूटपणे सहनही केले खरे; परंतु आता त्याचा स्फोट वेगवेगळ्या ठिकाणी झालेला दिसतो.

### टाळेबंदी व त्यामुळे बेकाम झालेले कामगार ( जाने. ते एप्रिल ७७ )

| राज्य | टाळेबंदी संख्या | बेकाम कामगार |
|---|---|---|
| बिहार | ५ | ५०,९४४ |
| गुजराथ | १ | ३०० |
| कर्नाटक | १ | २,०५६ |
| केरळ | ७ | १०,३६० |
| महाराष्ट्र | ३ | १३,५९२ |
| राजस्थान | ३ | ४,६६० |
| तामीळनाडू | ६ | ८७,८८२ |
| उत्तर प्रदेश | १ | ६,८३६ |
| प. बंगाल | ५७ | ९;३१,२७० |
| एकूण | ८४ | ११,०७,९९० |

गेल्या काही महिन्यात महागाईने जे अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे त्यामुळेही कामगारवर्ग हवालदिल झाला आहे. परिणामी सर्व ठिकाणी कामगाराच्या मागण्याचे प्रमाण वाढले आहे. मिळणारा पगार संसाराला जेव्हा पुरेनासा होतो आणि मुलाबाळाचे हाल महिनोमहिने जेव्हा चालू राहातात तेव्हा अगतिकतेतून निर्माण होणारा असतोष भयानक स्वरूप धारण करतो.

लहान कारखान्यातील कामगारांनी 'मोठया कारखान्यांतून असलेली वेतनश्रेणी' मिळावी म्हणून मागणी केलेली आढळते. तसेच काही ठिकाणी हंगामी कामगारांनी 'कायम' करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे पगार व इतर सवलतीचा फायदा मिळतो. या सदर्भात गांभीर्याने विचार करण्याचा मुद्दा म्हणजे टाळेबंदी. 'कामगाराना वठणीवर आणण्याचा कायद्याने परवानगी दिलेला' हा मार्ग म्हणजे दुष्ट बुद्धीचा सभ्य प्रकार आहे. १९७६ मध्ये एकूण झालेल्या औद्योगिक नुकसानीपैकी ७९ टक्के नुकसान टाळेबंदीमुळे झालेले आहे. (या काळात आणीबाणी होती!) हेच प्रमाण १९७५ मधे २४ टक्के आणि १९७४ मधे १७ टक्के होते!

## कामगारांना संरक्षण द्या

कामगार आपल्या मागण्या युनियनद्वारे व्यवस्थापनाकडे सादर करतात. त्या मान्य झाल्या नाहीत तर प्रकरण संबंधित कोर्टात जाते. कोर्टात जाण्याचे अधिकार व कोर्टाने निर्णय देण्याचे अधिकार याबाबतीत सरकारने कामगारविषयक कायदे केलेले आहेत. कामगारांना अपयश आले तर संप व व्यवस्थापनाला अपयश आले तर टाळेबंदी! आणीबाणीच्या काळात कन्सिलिएशन वगैरे मार्गांनी होणारे कामकाज सरकारी स्तरावर इतके थंड पडले होते की व्यवस्थापन निगरगट्ट बनले; परंतु आणीबाणी दूर होऊन कामगाराना चळवळीचे स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त होताच सर्व असंतोषाचा एकदम स्फोट झालेला आहे. (आणीबाणीच्या काळातही अनेक ठिकाणी संप झाले; परतु त्या वार्ता वृत्तपत्रांत आल्या नाहीत).

औद्योगिक कलहकायद्यात एक मोठी उणीव आहे. ती अशी की, कन्सिलिएशन प्रोसिडिंगचे वेळी व्यवस्थापनाने उपस्थित राहिले पाहिजे किंवा कामकाजात भाग घेतलाच पाहिजे असे बंधन वा सक्ती तेथे नाही हा कायद्यातील दोष दूर करून व्यवस्थापनाला त्यात भाग घेण्याची सक्ती करण्यात आली पाहिजे. कामगार कल्याणविषयक सर्व कायद्यामध्ये ज्या काही पळवाटा असतील त्या काढून टाकून अधिक कल्याणकारी कामगारकायदे कसे करता येतील याचा गांभीर्याने विचार जनता सरकारने करावा असे वाटते.

'एका कारखान्यात एक युनियन हा प्रयोग व्यवहार्य होईल असे वाटत नाही.' असे सांगून लोकसभेत मजूरमंत्री श्री. वर्मा म्हणाले की, 'एखाद्या कारखान्यात अनेक युनियन्स काम करीत असल्या तरी कामगाराच्या वतीने व्यवस्थापनाशी वाटाघाटी करण्यासाठी किंवा कोर्टात दाद लावून घेण्यासाठी एक कामगारमंच कायद्याने प्रस्थापित करता येईल काय यावर सरकार विचार करीत आहे या मंचामध्ये कोणत्याही युनियनच्या व मतप्रणालीच्या कामगाराला सहभागी होता येईल. कामगाराना कायद्याची माहिती देणे, जागृत करणे व न्याय मिळवून देणे ही कामे हा कामगार मंच करील.' □

## □ कोलोनचे प्रदर्शन

२१ ऑगस्ट १९७७ पासून कोलोन येथे बत्तिसावे 'इंटर नॅशनल मेन्स फॅशन वीक' प्रदर्शन भरत आहे. ३६ देशातील ९८४ व्यापारी कंपन्यानी त्यात भाग घेतला आहे. त्यात भारतातल्या ५३ कंपन्या आहेत. भाग घेतलेल्याच्या संख्येचा विचार करता भारताचा क्रमांक तिसरा लागतो. हॉलंडच्या ५७ आणि इटलीच्या ५४ व्यापारी संस्था आहेत. भारताच्या ५३ पैकी ३४ संस्था कॉटन टेक्स्टाइल एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑफ इंडियाने पुरस्कृत केल्या आहेत. हॅन्डलूम प्रमोशन कौन्सिल (मद्रास) ने ११ पुरस्कृत केल्या आहेत. पुरुषांचेसर्व प्रकारचे पेहराव, शर्ट, अंडरवेअर, विणलेले कपडे, नेकटाय, कमरेचे पट्टे, घरात वापरण्याचे (पुरुषांचे) कपडे आदि विविध प्रकारचा माल भारतातर्फे तेथे प्रदर्शित केला जात आहे. □


# अंधारातील एक प्रकाश

## जयप्रकाश नारायण ह्यांचे समग्र चरित्र

लेखक : भारतकुमार राऊत

किंमत : चार रुपये ※ पृष्ठे : ७० : मोठा आकार

चार रुपये मनिऑर्डर / पोस्टल ऑर्डरनें, सुमंगल वितरण, १७२, ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर, मुबई–४०० ०१४. ह्या पत्त्यावर पाठवा व पुस्तक अंडर पोस्टल सर्टिफिकेटने घरपोच मिळवा! आपला पत्ता खालील कुपनात लिहा!

नाव ______________________

पत्ता ______________________

______________________

PIN

# नक्षलवादाच्या शोधात



लेखांक सात

## नक्षलवादाच्या उगमाची पार्श्वभूमी

शिरीष सहस्रबुद्धे । चंद्रशेखर पुरंदरे

मानवी इतिहासाचे डोळे उघडे ठेवून परिशीलन केले तर संपूर्ण कालप्रवाहाला एक विशिष्ट मोजपट्टी लावणे अशक्य आहे असे दिसून येते. एकाच तत्त्वप्रणालीच्या आधारे संपूर्ण भूतकाळाचा खुलासा करणे ही असंभाव्य गोष्ट आहे. तरीसुद्धा आजवरच्या, विशेषत: मध्ययुगीन व अर्वाचीन काळातील युरोपीय तत्त्वज्ञांनी असे प्रयत्न केले. भूतकाळाला विशिष्ट अर्थ देणे, तो एका सुनिश्चित तत्त्वानुसारच चालला आहे हे दाखविणे व त्याच्या अनुषंगाने भविष्याचा वेध घेणे असा हा दुहेरी प्रयत्न होता. अशाच एखाद्या तत्त्वप्रणाली-प्रमाणे आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाचेही प्रयत्न कमी झालेले नाहीत; पण अशा तत्त्वप्रणालीप्रमाणे जेव्हा सामाजिक परिवर्तन केले जाते तेव्हा आजूबाजूच्या परिस्थितीला अनुरूप असा अर्थ लावला जातो. आजूबाजूच्या परिस्थितीला अनुरूप म्हणजे काय? तर पुस्तकी ज्ञान व्यावहारिक पातळीवर आणताना त्यात फेरबदल करावे लागतात. म्हणजेच त्याला स्वत:चे निराळे अर्थ प्रदान करावे लागतात. यातच क्रान्तिकारकाची कल्पकता किती आणि पोथी-निष्ठता किती यांची परीक्षा होत असते; पण इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. परिवर्तनाची जी प्रक्रिया एखादे तत्त्वज्ञान पटल्यावर होते, ती मूळ तत्त्वज्ञानाशी किती प्रामाणिक असते? कारण आताच म्हटल्याप्रमाणे, व्यवहारासाठी तिच्यात जे बदल करावे लागतात, ते मूळ तत्त्वज्ञानाचे स्वरूप किती बदलतात?

म्हणजे दोन प्रश्न कोणत्याही प्रमुख तत्त्वज्ञानाविषयी महत्त्वाचे. एक : संपूर्ण भूतकाळाचा अन्वयार्थ एकाच एका तत्त्वज्ञानाने लावता येतो का? दोन : अशा तत्त्वज्ञानाआधारे केला जाणारा क्रान्तीचा प्रयत्न हा मूळ तत्त्वज्ञानाशी किती प्रामाणिक असतो? या दोनही प्रश्नांची सर्वांना पटतील अशी उत्तरे सापडणे अशक्यप्राय आहे. म्हणूनच आहे त्या वादाचे, तत्त्वज्ञानाचे शक्यतो पूर्वग्रहरहित दृष्टीने परीक्षण करणे आवश्यक ठरते.

नक्षलवाद हा आपले नाते मार्क्सवादाशी सांगतो. मार्क्स, लेनिन आणि माओ त्से-तुंग यांच्या तत्त्वज्ञानावरील विश्वास हा नक्षल-वादाचा गाभा आहे. किंबहुना मार्क्स आणि लेनिन यांनी ज्या तत्त्व-ज्ञानाचा पुरस्कार केला, तो 'याचि देही याचि डोळा' अंमलात आणण्याचा ढोबळ प्रयत्न चेअरमन माओकडून करण्यात आला

आणि त्याच मार्गावर विश्वास ठेवून भारतातील क्रान्ती यशस्वी होऊ शकेल असा कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया ( मार्क्सिस्ट लेनिनिस्ट ) CPI ( ML )चा दावा आहे. हा दावा मूळ कम्युनिस्ट पार्टीच्या (ती उजव्या आणि डाव्या कम्युनिस्टामध्ये फुटण्याआधी) तत्त्वज्ञानापासून कसा निराळा आहे आणि आज या दोनही प्रमुख राष्ट्रीय मान्यताप्राप्त कम्युनिस्ट पक्षांपासून या पक्षाचे वेगळेपण कशात आहे याची सविस्तर चर्चा पुढे येईलच. या ठिकाणी आज मतभिन्नतेमुळे बाहेर पडून निराळया स्थापन झालेल्या ह्या पक्षाची पाळेमुळे शोधणे अप्रस्तुत ठरणार नाही.

## भारतीय क्रान्ती कशी असेल ?
## आंध्र सिद्धान्त

चीनमध्ये जी प्रचंड क्रान्ती माओ त्से–तुगने घडवून आणली तिचा प्रभाव बऱ्याच प्रमाणात सारखी परिस्थिती असणाऱ्या भारतावर होणे अपरिहार्य होते. १९४८ च्या जूनमध्ये 'आंध्र लेटर' या मुखपत्रामध्ये माओ त्से–तुगच्या 'न्यू डेमॉक्रसी' या सिद्धान्तावर आधारित असा पर्याय पुढे मांडण्यात आला. १९१७ सालच्या रशियाच्या क्रान्तिपूर्व परिस्थितीहून भारतीय सद्य:स्थिती गुणात्मकतेने भिन्न आहे हे या अंकामध्ये दाखविण्यात आलेले होते. सार्वजनिक क्षेत्रामध्ये देशव्यापी संप घडवून आणणे आणि संपूर्ण देशात एकाच वेळी उठाव होऊन ग्रामीण विभाग मुक्त होणे हे या देशातील लढ्याचे स्वरूप असणार नाही, तर अत्यंत चिकाटीने दीर्घकाळपर्यंत सरकारला विरोध करणे, 'सिव्हिल वॉर'चा पथ स्वीकारणे, शेतकऱ्याच्या असंतोषाचे खतपाणी घालणे आणि त्यायोगे राजकीय सत्ता हस्तगत करणे, हा भारतातील क्रान्तीचा मार्ग होऊ शकेल असे या अंकात प्रतिपादन करण्यात आले होते. किंवा दुसऱ्या शब्दात, फ्यूडॅलिझम आणि इम्पीरिॲलिझम हे प्रमुख शत्रू मानून प्रोलेटॅरियन क्रान्तीहून निराळी अशी क्रान्ती येथे अस्तित्वात येईल असे प्रतिपादन करण्यात आले. या सिद्धान्तानुसार भारत एक स्वतन्त्र देश नव्हताच, तर भारत हा इंग्रजी वर्चस्वाखालचा देश, अजून वसाहतीच्याच किंवा फार तर अर्धवसाहतीच्याच ( Colony or Semi-colony ) स्वरूपातील देश होता. माओचा 'न्यू डेमॉक्रसी'चा सिद्धान्त हाच अशा देशांना एकमेव आशेचा किरण असल्याचा दावा करण्यात आला.

## क्रान्तीचे शत्रु–मित्र कोण ?

यामन्वये संपूर्ण शेतकरीवर्ग कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली गनिमी युद्धासाठी संघटित करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. इम्पीरिॲलिझम आणि फ्यूडॅलिझम (साम्राज्यवाद व सरंजामशाही) हे प्रमुख शत्रू ठरविल्यावर त्यांच्याशी लढणाऱ्या संयुक्त आघाडीमध्ये श्रीमंत शेतकरीवर्गाचाही समावेश संभाव्य साथी म्हणून करण्यात आला. फक्त प्रचंड भांडवल बाळगणारे आणि मोठे जमीनदार हेच प्रतिक्रियावादी (क्रान्तीला विरोध करतील असे) झालेले होते. याच अंकामध्ये असाही विश्वास प्रकट करण्यात आला की मध्यम शेतकरी हा क्रान्तीचा महत्त्वपूर्ण साथीदार आहे आणि तो स्वत: क्रान्तीमध्ये भाग घेईल. (हा अंदाज पुढे धोकादायक ठरला आणि मागील एका लेखांकात म्हटल्याप्रमाणे 'लोक पाठीशी आहेत' या स्वप्नाचा मोठ्या प्रमाणात निरास झाला ) अशा रीतीने क्रान्ती दोन टप्प्यात विभागली गेली पहिला संघटन, दुसरा प्रत्यक्ष लढा. मध्यमवर्गाचा, माओच्या तत्त्वानुसार क्रान्तिकारी वर्गात समावेश करण्यात आला.

या सिद्धान्तावर त्यावेळचे पक्षाचे प्रमुख नेते रणदिवे यानी जोरदार हल्ला चढविला. एतद्देशीय भांडवलदारापासून सुटका करून घेणे हे ध्येय नसून जागतिक भांडवलशाहीपासूनच मुक्तता मिळविणे हे कम्युनिस्टाचे ध्येय आहे. श्रीमंत शेतकरीवर्ग (आंध्र सिद्धांतात तो क्रान्तीमध्ये सामील करून घेतला होता, तो तसा न करता) क्रान्तीचा प्रमुख शत्रू आहे असे रणदिव्याच्या पत्रकाचे म्हणणे होते. मध्यमवर्गीय शेतकरी महत्त्वपूर्ण व सुनिश्चित साथीदार म्हणून आंध्र सिद्धांतात धरला गेला होता, तो केवळ संभाव्य व अनिश्चित साथीदार आहे असे सप्टेंबर–डिसेंबर १९४८ च्या पॉलिटब्युरोच्या बैठकीत ठरविण्यात आले. अखिल भारतीय कार्यकारिणीची आंध्रसमितीपेक्षा निराळी असणारी भूमिका 'कम्युनिस्ट'च्या जानेवारी १९४९ च्या अंकात स्पष्ट करण्यात आली.

## या कार्यकारिणीची भूमिका काय होती ?

यान्वये शहरी कामगारवर्ग हा क्रान्तीचा सर्वात महत्त्वाचा घटक होता. त्याचा साथीदार ग्रामीण भागातला भूमिहीन मजूर होता. हा मजूर दुसरा महत्त्वाचा घटक मध्यम शेतकरी फार तर संभाव्य साथीदार मानण्यात आला. तसाच शहरी कनिष्ठ मध्यमवर्गही क्रान्तीला मदत करणारा संभाव्य घटक मानण्यात आला या साऱ्या वर्गाची (एकूण चार वर्ग) एक आघाडी बनणार होती. ती श्रीमंत शेतकरी आणि भांडवलदार यांच्याविरुद्ध लढणार होती. म्हणजे आंध्र सिद्धान्तात फ्यूडॅलिझम आणि इम्पीरिॲलिझम हे प्रमुख शत्रू होते ते या भूमिकेन्वये प्रमुख शत्रू नव्हते. त्याऐवजी श्रीमंत शेतकरी अन् भांडवलदार हे प्रमुख शत्रू होते.

तसेच माओ-त्से-तुगचे कम्युनिझमचा प्रवक्ता हे स्थान नाकारण्यात आले. मार्क्स एंगेल्स लेनिन आणि स्टॅलिन यांचा कम्युनिझम तोच खरा कम्युनिझम मानण्यात आला. CPI चे नेतृत्व अजून रशियाकडेच 'त्वमेव माता पिता त्वमेव' या वृत्तीने पाहात असल्याने हे अटळच होते.

आन्ध्रचा सिद्धान्त मूलभूत प्रश्नाला हात घालीत होता. त्याला सैद्धान्तिक पातळीवर उत्तर द्यायची अखिल भारतीय कार्यकारिणीची तयारी नव्हती. मग चीनच्या क्रान्तीनतरच्या विस्कळित परिस्थितीवरच जोर देण्यात आला. ती जी अनियंत्रित आणि ढासळलेली परिस्थिती चीनमध्ये निर्माण झाली तिचे कारण माओ-त्सेतुगचे कमकुवत नेतृत्व होते असे सांगण्यात आले. प्रोलेटॅरिअटचे अधिराज्य स्थापायला या कुचकामी नेतृत्वामुळेच इतका वेळ लागला. डावपेचाच्या आणि व्यूहरचनेच्या युद्धात क्रान्तिवादी संघटनाचे ऐक्य हे नेतृत्व टिकवू शकले नाही म्हणून चिनी जनता सर्वनाशाप्रत आली इत्यादी इत्यादी आक्षेप घेण्यात आले.

हा हल्ला माओवादावर होता. कारण आन्ध्रसिद्धान्ताचा तोच गाभा होता; पण या वेळी लिऊ शाओ च्री रशियाच्याच प्रावदातून काय भूमिका मांडीत होता ?

## लिऊ शाओ-ची ची भूमिका

७-८-९ जून १९४९ च्या प्रावदा या रशियाच्या मुखपत्रातून लिऊ शाओची चे आन्तरराष्ट्रीयता . व राष्ट्रीयता यावरील पत्रक प्रसिद्ध करण्यात आले.

या पत्रकात भारतीय कम्युनिस्ट पक्षासह सर्व आशियाई कम्युनिस्ट पक्षाना एक जोरदार आवाहन करण्यात आले.

प्रतिक्रियावादी क्रान्तिविरोधकाविरुद्ध एक खंबीर आणि संघटित नेतृत्व उभारले पाहिजे असे त्यात म्हटले होते. साम्राज्यवाद बिग बूर्ज्वांवर विजय मिळवू पहात आहे. तेव्हा साम्राज्यवादाने आपल्याला गिळून टाकावे याला काही बिग बूर्ज्वांचा विरोध असणारच. अशा बिग बूर्ज्वांना क्रान्तिकारी गटामध्ये सामील करून घेतल्यास काही एका कालक्रमणेपर्यंत ते क्रान्तिकारी गटाचे साथी बनतील असे म्हटले होते, म्हणून त्यांना यामध्ये सामील करून घेणे हेही धोरण मांडण्यात आले लिऊ शाओ ची नेच १९४९ च्या नोव्हेंबरमध्ये म्हणजे चीनच्या क्रान्तीनंतर महिन्याभरातच पेकिंगमध्ये घेतलेल्या आशियाई आणि ऑस्ट्रेलेशियन देशाच्या ट्रेड युनियन्सच्या संमेलनात, माओच्या या तत्त्वज्ञानाचा पुनरुच्चार करून भारतात या प्रकारचा लढा सुरू झाला आहे असे सांगितले. यामुळे आन्ध्रच्या नेतृत्वाचे नैतिक धैर्य वाढले.

## रशियाचा तृतीय पंथ

याच सुमारास २७ जून १९५० च्या रशियन पत्रकात रणदिवेंच्या धोरणाविषयी अप्रत्यक्ष संशय व्यक्त करण्यात आला. माओचाच मार्ग भारतीय परिस्थितीला साजेसा असल्याचे त्यात सूचित करण्यात आले होते. मध्यंतरी रणदिव्यांनी आपल्या विरुद्ध मत जात आहे असे पाहून चमच्याची खोगीरभरती मुख्य मुख्य अशा केन्द्रीय समित्यांवर केली होती. वरूनच (रशियाकडून) बसलेला हा फटका त्यांना झोंबणे अटळच होते. तरीही चिनी आणि रशियन धोरणातील प्रमुख फरकाकडे दुर्लक्ष.करण्यात आले. वरील २७ जूनच्या पत्रकात रशियाने भारतीय कम्युनिस्टापुढची प्रमुख समस्या कृषिपुनर्रचना ही आहे आणि त्यासाठी कष्टकरी वर्गाची एकजूट ब्रिटिश आणि अमेरिकन साम्राज्यवादाच्या विरुद्ध उभी राहिली पाहिजे असे म्हटले होते.

नक्षलवादाची नंतरची प्रगती ज्या पायावर झाली, त्या पायाची भरणी इथे होत होती. कारण रशियन पत्रकात कोठेही सशस्त्र उठावाची अपरिहार्यता प्रतिपादन करण्यात आली नव्हती. रशियाच्या मते सशस्त्र क्रान्ती आवश्यक नाही. माओचीच युद्धधोरणे वापरून पण सशस्त्र लढ्याशिवाय कम्युनिस्ट क्रान्ती करणे हे भारतीय कम्युनिस्टांचे रशियाच्या मते कार्य होते. याउलट माओने म्हटल्याप्रमाणे– ' In China without armed struggle there will be no place for the communist party & no victory for the revolution. '

किंवा 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ' हे चीनचे धोरण होते. या दोन्ही मूलभूत फरकाचा, माओचीच सर्व युद्धतंत्रे वापरणे ही Common बाब असूनही पुढच्या नक्षलवादी चळवळीवर परिणाम झालेला दिसतो.

## १९५१ मधील पक्षाची भूमिका

१९५१ च्या कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यक्रमात आन्ध्र नेतृत्वाच्याच सिद्धान्ताचा स्वीकार केलेला दिसतो. कारण हा वेळपावेतो बी. टी. रणदिवे यांचे नेतृत्व संपुष्टात येऊन आन्ध्र प्रदेशानेच भारतीय नेतृत्व (राजेश्वर राव यांच्या रूपाने) ताब्यात घेतले होते त्यामुळे माओच्याच चतुर्वर्गाधिष्ठित दोन टप्प्यातील क्रान्तीवर विश्वास ठेवण्यात आला होता. त्याच वेळी चिनी परिस्थितीहून भारतीय परिस्थिती निराळी कशी याचे विश्लेषणही करण्यात आले होते. ८ जून १९५१ च्या 'क्रॉसरोड्स्'मध्ये भारतामध्ये कामगारवर्ग चिनी क्रान्तिपूर्व कामगारवर्गाहून बराच मोठा असल्याचे नमूद करण्यात आले. तो क्रान्तिपथातील निर्णायक प्रवाह ठरू शकण्याची कल्पनाही मांडली होती म्हणून त्या दोघाची संयुक्त आघाडी उभारणे हे प्रमुख कार्य परत एकदा ठासून सांगण्यात आले

या ठिकाणी दोन मुद्दे विसरून चालणार नाही. एक म्हणजे कामगारवर्गाचा समावेश योद्धावर्गात करण्यात आला तेव्हा स्वाभाविकपणे कामगारवर्गावर, संपाचे शस्त्र असल्याने, त्याची राष्ट्रीय उपद्रवशक्ती मोठी असल्याने जास्त जबाबदारी टाकली होती. संख्यात्मक तूट गुणात्मक आधिक्याने भरून येईल याच फायद्याकडे जास्त लक्ष देण्यात आले; पण मूळ भारतीय अर्थव्यवस्थेचा (पोखरलेला) गाभा–शेतकरीवर्ग–त्याच्याकडे परिणामत: जाणता वा अजाणता, दुर्लक्षच झाले.

दुसरा मुद्दा असा, की शेतकरीवर्गाची संघटना बांधायची म्हणजे काय ? किंवा दर दहा–पंधरा मैलावर प्रश्न बदलणाऱ्या व पूर्णत: स्थानिक प्रश्नावर अवलंबून असणाऱ्या शेतकरीवर्गाला राजकीय जागृती देण्यासाठी आवश्यक अशी संघटना उभी करणे आणि धोरणामध्ये जाहीर केलेल्या शेतकरी–कामगार–ऐक्याच्या दृष्टीने प्रत्यक्षात काय पावले टाकायची याचाही स्पष्ट उल्लेख करण्यात आला नाही फक्त सशस्त्र लढ्याच्या मार्गापासून चळवळ परत एकदा दूर गेल्याचे स्पष्ट झाले.

## गुप्त पत्रकातील मतप्रदर्शन

परंतु हे झाले प्रकाशित धोरणाबद्दलचे मत. प्रत्यक्षात जी अप्रकाशित धोरणे सभासदांना सांगण्यात आली होती त्यात पार्टीचे अस्सल धोरण प्रतिबिंबित झालेले आहे. यात म्हटले आहे ' अत्यंत प्राथमिक स्वरूपाच्या संघर्षापासून कायद्याच्या सर्व तरतुदींचा आपल्याला सहभाग घ्यायचा आहे. जनसंघटनाच्या आणि त्यांना जागृत करून पुढे नेण्याच्या प्रयत्नात भारताच्या वसाहतवादी स्वरूपामुळे अडथळे येतील. तथाकथित लोकशाही, समाजवादी स्वातंत्र्ये बहाल झालेली असली तरी ती मर्यादित आहेत, त्यामुळे संसदीय मार्गाने आमूलाग्र परिवर्तन होणे कधीही शक्य नाही व सशस्त्र उठाव हाच एकमेव मार्ग आहे.' जरी हे अप्रकाशित धोरण अधिकृत मानले तरीही वरील दोन आक्षेपांना उत्तर देता येत नाही. (फार तर चळवळ सशस्त्र लढ्याला अनुकूल बनली असे म्हणता येईल.) या अप्रकाशित धोरणाचा उल्लेख करण्याचे प्रयोजन म्हणजे नक्षलवादाचे

बहुताशी मार्ग यात प्राथमिक अवस्थेत सापडतात. किंबहुना भावी नक्षलवादाचे हे बीज मानता यावे. याच वेळी पक्षातील अतिरेकी गटांना सयम पाळण्याचा सल्ला देण्यात आला शक्यतो, सशस्त्र लढा हा एकमेव मार्ग न ठेवता, अंतिम मार्ग ठेवण्याकडेच पक्षाचा कल होता. जेव्हा दुसरा पर्यायच रहाणार नाही तेव्हाच या मार्गाकडे वळावे हे याच पत्रकात पुढीलप्रमाणे स्पष्ट केले होते–' जेव्हा संघर्ष तीव्र होत जाईल, ऐक्य, जागृती आणि संघटन बलवत्तर होत जाईल, जेव्हा पक्षाचा प्रभाव वाढत जाईल आणि वर्गशत्रू अधिकाधिक अमानुष, अनैतिक, कठोर मार्गाकडे वळेल, तो कृषकक्रांती दडपू पाहील, तसातसा सशस्त्र मार्ग केव्हा, कोठे आणि कसा हाताळायचा याकडे लक्ष देता येईल. जेव्हा भारतासारख्या विशाल देशात ठिकठिकाणच्या राजकीय जागृतीत प्रचंड फरक असतो, तेव्हा एका ठिकाणचा सशस्त्र उठाव हा प्रत्येक ठिकाणी स्फूर्ती देईलच किंवा देशभर वणवा उठवीलच याची शाश्वती नाही किंबहुना जागृतीच्या एका विशिष्ट पातळी-पर्यंत आल्याखेरीज असा उठाव होणे असंभाव्यच. याउलट एकमेका-पासून भौगोलिक दृष्टया दूर असणारे विभाग स्फोटकतेच्या दृष्टीने एकमेकांच्या जवळ असू शकतील. एखाद्या मोठ्या व्यूहाच्या दृष्टीने सोईस्कर अशा विभागातील परिस्थिती जेव्हा अत्यंत ज्वलंत बनेल, तेव्हाच प्रश्न कसा हाताळावयाचा ही समस्या येईल. म्हणजे समजा, पूर्वतयारी झाली आणि आता फक्त जमीन बळकावणे शिल्लक राहिले. आता ही जमीन हिंसेने बळकावयाची की अहिंसेने ? पुढचा प्रश्न ती ताब्यात कशी राखायची ? हिंसेने की अहिंसेने ? हे सशस्त्र लढ्याच्या संदर्भातील फार महत्त्वाचे प्रश्न होते कारण जनमत या सशस्त्र मार्गाला पूर्णतः अनुकूल असल्याखेरीज हा मार्ग हाताळणे धोक्याचे होते. तो बूमरँगसारखा उलटणे शक्य होते. शिवाय एकदा तुम्ही सशस्त्रतेकडे वळलात, की सरकारला तुम्ही सशस्त्र प्रतिकाराचा परवानाच दिल्यासारखे होते. सरकारच्या हिंसेला नंतर तुम्ही अनै-तिक ठरवू शकत नाही.

म्हणूनच हिंसेचा वापर केलाच तर नीट आखून कल्पकतेने करा-यला हवा मग या धाडसाचा देशाच्या इतर भागावरही अत्यंत स्फूर्तिदायक परिणाम होऊन संपूर्ण चळवळीचे नीतिधैर्य वाढण्याचा मोठा फायदा असतो.

पण एखादे ठिकाण जबरदस्तीने बळकावण्याचा हा जुगार बऱ्याच वेळा महागातही पडू शकतो. नंतरच्या नक्षलवादी चळवळीच्या दृष्टीने हा एक निर्णायक घटक ठरला.

हे प्रत्यक्ष चळवळीविषयी मत झाले. आंतरराष्ट्रीय परिस्थिती हा कायमचा वादाचा मुद्दा याही ठिकाणी डोकावला.

## आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे स्वरूप

या वेळीच आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेऊन मूळ शत्रू कोण हे निश्चित करण्याचे प्रयत्न झाले. अमेरिकन साम्राज्यवाद आणि ब्रिटिश साम्राज्यवाद याच्यातील प्रमुख शत्रू कोण हे ठर-विण्याच्या प्रश्नावरून परत एकदा आंध्रचा कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष याच्यातील मतभेद स्पष्ट झाले. एका गुप्त पत्रकान्वये (जे Democratic Research Service या मुंबईच्या कम्युनिस्टविरोधी संस्थेने उजेडात आणले) ब्रिटिश साम्राज्यवाद हाच क्रमांक एकचा शत्रू असल्याचे आंध्रगटाचे मत होते तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीचे मत अमेरिकन साम्राज्यवाद हा प्रमुख शत्रू असल्याचे होते.

या ठिकाणी हा केवळ धोरणात्मक प्रश्न नव्हता हे स्पष्ट केले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्याला खरा धोका कोणत्या साम्राज्यवादा-पासून आहे यावरच संपूर्ण कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य बहुताशी अवलंबून होते. अमेरिकेशी रशियाचे शीतयुद्ध नव्या नीचतम तप-मानाला पोचले असल्याने ब्रिटिश साम्राज्यवादाला क्रमांक एकच्या शत्रूचा मान देण्याचा ठराव कम्युनिस्ट पक्षाला अडचणीत टाकणारा होता. म्हणून ' रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ' या न्यायाने पक्षाचे जनरल सेक्रेटरी अजय घोष यानी दोन्ही प्रमुख शत्रू असून दोन्ही-पासून भारतीय स्वातंत्र्याला सारखाच धोका असल्याचे जाहीर केले, पण प्रश्न इतका वरवरचा नव्हता. ब्रिटिश साम्राज्यवादाला अमे-रिकन साम्राज्यवादापेक्षा अधिक महत्त्व का द्यायचे ? आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिका ब्रिटनहून धोकादायक आहे हे आंध्र कार्य-कारिणीला मान्य होतेच. उजव्या प्रतिक्रिया–प्रतिक्रांतिकारक प्रति-गामी शक्तीचे नेतृत्व अमेरिकाच करीत होती, पण जेव्हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर येतो, तेव्हा निराळ्या दृष्टिकोनातून विचार करायला हवा.

ब्रिटिशानी इथे दीडशे वर्षे राज्य केले त्यानी देश सोडल्यावर आर्थिक परिस्थिती काय होती ? जसे ब्रिटिश या देशाचे शोषण करीत होते, तसेच एतद्देशीय भांडवलदार आता करू लागले होते. हे भांडवलदार त्याच मार्गाने जात असल्याने भारताच्या वसाहत या मूळ स्वरूपात काहीच फरक पडला नव्हता. म्हणून ब्रिटिश साम्राज्य-वाद अमेरिकन साम्राज्यवादाहून भयंकर शत्रू होता

## रशियाचा दबाव व त्याचा परिणाम

रशियाला ही भूमिका सोईची नव्हती. अमेरिका जागतिक राज-कारणात त्याचा प्रमुख शत्रू होती. म्हणून भारतानेही तोच शत्रू मानणे त्याला फायद्याचे होते. तसेच या अधिवेशनाला हॅरी पॉलिट हा कम्युनिस्ट पार्टी ऑफ ग्रेट ब्रिटनचा जनरल सेक्रेटरी हजर होता. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यवाद एक क्रमांकाचा शत्रू ठरविणे जड गेले.

म्हणून आंध्रची समिती आणि उपरिनिर्दिष्ट दोन कारणे यामुळे दोघानाही खूष करण्यात आले. सध्या ब्रिटिश साम्राज्यवादापासून सुटका करून घ्यायची आहे. हे मिळविलेले स्वातंत्र्य टिकविण्यापासून सर्वात मोठा शत्रू अमेरिका आहे. तेव्हा नंतर तिच्याशी मुकाबला करायचा आहे. या साऱ्या घोळाचा व्यवहारातला परिणाम नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाला निःसंदिग्ध पाठिंबा एवढाच झाला.

रशियाच्या तालावर नाचण्याच्या सवयीने परत एकदा खड्डयात पडण्याची वेळ कम्युनिस्ट पक्षावर आली. १९५४–५५ मध्ये भारत–रशिया सहकार्य शिगेला पोचले होते. भारत–रशिया सहकार्याने भिलाईचा पोलादकारखाना उभारण्याविषयी १९५५ च्या फेब्रुवारीत करार झाला. बुल्गानिन ख्रुश्चेव्ह भारताला भेटी देऊन गेले. रशियाने नेहरूंचे परराष्ट्रीयच नव्हे तर अंतर्गत धोरणही प्रागतिक असल्याची ग्वाही दिली. इथेच कम्युनिस्ट पक्ष परत उघडा पडला.

## भारतीय कम्युनिस्टांचे कॉंग्रेसचे वर्गविश्लेषण

कम्युनिस्टांच्या मते काँग्रेस जमीनदार आणि एकाधिकाऱ्यांनी बनलेली होती. ब्रिटिश साम्राज्यवादाचे चाहतेही काँग्रेसचे प्रमुख समर्थक होते. म्हणजेच काँग्रेस ज्यांनी बनलेली होती, त्यांचे लागेबांधे या देशाशी असण्यापेक्षा परकीय भांडवलशाही शक्तींशीच जास्त होते. म्हणून स्वयंपूर्ण व कोणाच्याही दबावाला न जुमानता धोरणे आखणे काँग्रेसच्या कुवतीबाहेरचे होते. सुसंगत शांततांधोरण आणि कष्टकरीवर्गाच्या राष्ट्रीय हिताचे धोरण तो आखील ही अपेक्षाच चूक होती.

या साऱ्या विश्लेषणावर रशियाच्या नेहरूंना प्रागतिक म्हणण्याच्या निर्णयाने बोळाच फिरला.

आजचा नक्षलवाद किंवा CPM सुद्धा रशिया आणि अमेरिका या दोघानाही सारख्याच प्रकारचे नाही, तरी सारख्याच तीव्रतेचे शत्रू मानतो, या गोष्टीचे मूळ या घटनेत आहे. तसेच या घटनेआधीही घडलेल्या, रशियाने याना उघडे पाडण्याच्या प्रसंगात आहे. जरी नंतरच्या काही जबरदस्त प्रसंगांनी कम्युनिस्ट पार्टीतच फूट पडण्यापर्यंत वेळ आली तरी एक सुरुवातीची निर्दशिका म्हणून ही घटना पहायला हरकत नाही.

## पालघाटचे अधिवेशन

पालघाटला जे अधिवेशन झाले, त्यात प्रथमच भारतीय सरकारचे वर्गविश्लेषण शास्त्रीयदृष्टया करण्यात आले तोपर्यंत केवळ काँग्रेसपक्षाचे व भारतीय जनतेचे ढोबळ मानाने वर्गविश्लेषण करण्यात आलेले होते. सरकार अजूनही बूर्ज्वाझी–जमीनदारांचे होते त्यामध्ये बूर्ज्वाजी हाच प्रवाह निर्णायक होता. स्वतंत्र भांडवलशाही मार्गाने भारताची प्रगती करणे हा या युतीचा उद्देश होता साम्राज्यवादाच्या आणि सरंजामशाहीच्या हवाली लोकांना करून स्वत:ची तुंबडी भरण्याचा त्यांचा एकमेव हेतू होता. जे बूर्ज्वाजी काँग्रेसची व पर्यायाने देशाची सूत्रे हलवीत होते त्यांच्यावर प्रच्छन्न टीका करण्यात आली या बूर्ज्वाजीवर्गाचा स्वार्थ राबविण्यासाठी जमीनदारी आणि सरंजाम शाही बळकट करणे, सरंजामी जमीनदारांना भांडवलदारी जमीनदार बनविणे आणि श्रीमंत शेतकऱ्यांचा एक असा वर्ग तयार करणे की राजकीय सत्ता स्थिर राहण्यासाठी सामाजिक पाया म्हणून तो उपयोगी पडू शकेल ( जसा बागायतदार हा काँग्रेसचा महाराष्ट्रात होता तसा ) न्यू एजच्या २० मे १९५६ च्या अंकात केलेले हे विश्लेषण अजूनही बऱ्याच प्रमाणात कायम असल्याचे प्रतिपादन केले जाते. याचा परिणाम म्हणून सरकारला, जर ते लोकाचे प्रतिनिधित्व करणार असेल, तर साम्राज्यवाद, सरंजामशाही आणि बूर्ज्वाजीचे काही भाग ( स्वतंत्र पक्षासारखे ) यावर धार धरावी लागेल.

## पक्षातील फुटीची बीजे

अशा रीतीने तेलंगण चळवळीचा शेवट रशियाच्या दडपणाखाली १९५१ साली झाल्यापासून उत्तरोत्तर रशियाने CPI चा वापर व्यवस्थित करून घेतला. शीतयुद्धात सोयीचे म्हणून अमेरिका हाच शत्रू असल्याचे वदवून घेतले नेहरूंना आर्थिक मदत करून भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाचा तरफेसारखा उपयोग करून घेण्याच्या कामात CPI च्या अस्तित्वाचा बराच फायदा रशियाने उठविला त्यामुळे CPI चा एक भाग काँग्रेसबरोबर संयुक्त राजकीय आघाडी उघडावी अशा विचाराप्रत येणे साहजिकच होते सशस्त्र लढ्यापासून सुरुवात झालेली चळवळ आता संसदीय मार्गावर केवळ स्थिर होऊन पाहात नव्हती, तर शांततामय परिवर्तनावरही काही भाग विश्वास ठेवून काँग्रेसशी सख्यासोबत करण्याचे मनसुबेही रचू लागली होती.

परंतु जुलै १९५९ मध्ये केरळमध्ये बहुमताने सत्तेवर आलेले व घटनात्मकतेने सत्तेवर असणारे कम्युनिस्टपक्षाचे भारतातील पहिलेवहिले सरकार २८ महिन्यात नेहरू सरकारने बरखास्त केले व कम्युनिस्ट पक्षातील काँग्रेसच्या विरोधात असणारा डावा गट आक्रमक होऊ लागला प्रथमच रशियालाही उघड विरोध करण्यात आला. कारण भारतीय अंतर्गत धोरणांना रशियाने पाठिंबा दर्शविल्याने ( रशियाची ३ अब्ज रुपयाची दोन कर्जे या केरळ सरकारला उलथून टाकल्यानंतर लगेच सरकारला मिळाली ) कम्युनिस्टांना काहीच voice राहात नसे. याच वेळी चीन–भारत सीमेवर अस्वस्थता पसरली होती नेहरू सरकारवरचा पार्टीचा विश्वास उडाल्यातच जमा होता २० ऑगस्टला चिनी कम्युनिस्ट पार्टीला पत्र पाठविण्यात आले. त्यात या सीमावादाविषयी चिंता व्यक्त केली गेली. ३ सप्टेंबरला CPI च्या सचिवालयाच्या तातडीच्या विनंतीवरून अजय घोषांनी मॉस्कोहून दुसरे पत्र लिहिले त्यात चीनच्या या कृतीमुळे भारत केवळ अमेरिकन साम्राज्यवादाकडे ओढला जाईल असे म्हटले होते, पण पत्रांना केराची टोपली दाखविण्यात आली २३ जून ते २८ ऑगस्ट १९५९ या काळात पेकिंग-दिल्लीमध्ये आठ वेळा पत्रव्यवहार झाला, पण एकाशाठीही CPI ला विश्वासात घेतले गेले नाही इतकी अपमानास्पद वागणूक देऊन चीनने आपण या कम्युनिस्ट पार्टीची काय पत्रास ठेवतो ते दाखवून दिले

एकूण पक्षांतर्गत परिस्थिती मात्र धुमसतच होती. काँग्रेस सरकार व रशियाचे नेहरूंना उचलण्याचे धोरण यावर डावा गट असंतुष्ट होता. तो हळूहळू ताकद वाढवीत होता प्रमुख तीन प्रश्नावर अजय घोषांच्या मध्यममार्गाशी आणि अहमद–भवानी सेन यांच्या उजव्या पक्षाशी बसवपुन्नय्या, ज्योती बसू गटाचे मतभेद होते पहिला प्रश्न. भारताचे जे काही स्वातंत्र्य होते ते प्रचंड प्रमाणात येणाऱ्या परदेशी मदतीने धोक्यात येत होते दुसरा: बूर्ज्वाजीच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र भांडवलशाही प्रगती अशक्य आहे तिसरा: लोकशाहीवादी व प्रागतिक विचारांच्या काँग्रेसजनांबरोबर उजव्या प्रतिगाम्यांशी लढा देणे अशक्यच आहे; पण हा संघर्ष टी. नागी रेड्डी, जो नक्षलवादाच्या संदर्भात महत्वपूर्ण भूमिका पुढे बजाविणार होता, त्याच्या सूचनेवरून टाळला गेला. हा मूलभूत प्रश्नावरचा ठरावच तात्पुरता बाजूला सारला गेला.

## चीन–रशिया विवाद

पण याच वेळी चीन–रशिया आदर्शातील संघर्ष चव्हाट्यावर

आला. एप्रिल १९६० मध्ये रेड फ्लॅगमधून Long Live Leninism या लेखात चीनने ख्रुश्चेव्हची भरपूर रेवडी उडविली. बुखारेस्टमधल्या अधिवेशनात जूनमध्ये रशियाने त्याला उत्तर दिले. हा प्रकार आज्ञाधारक व बाबावाक्य प्रमाणम् मानणाऱ्या कम्युनिस्ट पार्टीला अवाक् करणारा होता. रशिया-चीन मधुचंद्र असा कचकन् संपेल अशी अजिबातच अपेक्षा नसल्याने प्रत्येकाने आपले तारे तोडायला सुरुवात केली. समाजवादाकडे शांततामय परिवर्तन हा सिद्धान्त अजय घोष यानी मान्य करून ख्रुश्चेव्हच्या भूमिकेचे तत्त्वत: समर्थन केले. नंबुद्रिपादाना पेकिंग आणि मॉस्को दोघांच्यातही सत्यांश दिसला तर संख्येने कमी असणाऱ्या डाव्यानी मॉस्को–पेकिंग झुंज मुकाट्याने पाहणेच पत्करले. ख्रुश्चेव्ह पूर्णतया अवलंबून राहावा एवढ्या योग्यतेचा नसल्याचा सुदरय्याना साक्षात्कार झाला.

## चीनच्या आक्रमणानंतरची परिस्थिती

चीनच्या आक्रमणानंतरच्या गदारोळाचाही अभ्यास केला पाहिजे. या संघर्षातील प्रमुख कारण कम्युनिस्ट मध्यवर्ती कार्यकारिणीच्या मते भारतीय सरकारची तिबेटमधील प्रतिक्रांतिवादी उठावांना मदत हे होते आणि दलाई लामाला भारतात चीनविरोधी प्रचार करायला दिलेली परवानगी हेही होते. नंतर चीनवरही भारताच्या बाबतीत विस्तारवादी शब्द वापरल्यावरून टीका करण्यात आली होती.CPIच्या स्वत:च्या दृष्टिकोनांची माहिती न देता चीनचे दृष्टिकोन चूक असल्याचे आग्रही प्रतिपादन केले गेले होते. रशियाचा तटस्थ धोरणाबद्दल,जे वस्तुत: भारतीयाकडे झुकणारे होते–उदोउदो करण्यात आला होता. संपूर्ण समाजवादाला असणारी धमकी रशियामुळे टळली असा गौरव रशियाचा झाला.

प्रसिद्ध झालेल्या पत्रकात (जो संक्षिप्त आवृत्ती होती तिच्यात) वरील खुलासे होते; पण मूळ आवृत्तीत चीनचा स्वच्छ आणि स्पष्ट शब्दात धिक्कार करण्यात येऊन रशियाच्या शांततापूर्ण परिवर्तन, युद्धाची परिहार्यता व राष्ट्रीय मुक्तिचळवळ या तत्त्वावर विश्वास दाखविण्यात आला होता. ही मूळ आवृत्ती प्रकाशात आली नाही. ती निरनिराळ्या राज्यांच्या कार्यकारिणींना ११ सप्टेंबरला पाठविण्यात आली होती. इथेच एक जबरदस्त धक्का CPI ला बसला. पश्चिम बंगालच्या कार्यकारिणीने हा ठराव ' खोटा आणि धोकादायक ' असे वर्णन करून नाकारला. फक्त रशियाच्या प्रचारावर विश्वास ठेवला, चीनची बाजू ऐकूनच घेतली नाही असा आरोप करून हा एकांगी ठराव नाकारण्यात आला. या साऱ्याचे कारण हरेकृष्ण कोनार हा गृहस्थ होता. तो पेकिंगला जाऊन आलेला होता. त्याच्या मते चीनची बाजू ऐकणे हे न्याय्यच होते. ' स्टॅलिनच्या मृत्यूनतर त्याची बेअब्रू रशियात करण्यात आली, ती अशी : शांततापूर्ण सहजीवनाला शीतयुद्ध हा पर्याय आहे, युद्ध नव्हे; पण रशियन्स युद्ध हाच पर्याय असल्याचे सांगत आहेत. साम्राज्यवाद हा आशियाई राष्ट्रात भांडवलशाहीहून अधिक प्रबळ आहे आणि नेहरू सरकार हे अधिकाधिक साम्राज्यवादाकडे झुकत होते... ' इत्यादी समर्थन चीनच्या वतीने या कोनारने केले. त्याची स्वत:ची मॅकमोहन रेषा ओलांडण्याची चीनची इच्छा नसल्याची खात्री पटलेली होती.

हा वाद मिटतो न मिटतो तोच त्यातूनच पार्टीचे पुढचे ध्येयधोरण व रशियाने १९६० साली मांडलेल्या राष्ट्रीय लोकशाहीवर आधारित देशाच्या कल्पनेवर चर्चा सुरू झाली.

## अलिप्त राष्ट्रांमध्ये नॅशनल बूर्ज्वाचे स्थान काय ?

रशियाच्या मते शांततामय परिवर्तनात नॅशनल बूर्ज्वा प्रागतिक भूमिका बजावतात म्हणून त्याना राजकीय आणि आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. चीनचे मत याउलट होते. या नॅशनल बूर्ज्वांना मदत म्हणजे साम्राज्यवादाचे खांब बळकट करणे होय. त्यापेक्षा त्यांना करायची मदत जर कम्युनिस्टांना केली तर समाजवाद लवकर येईल. एक खूप मोठी देशव्यापी साम्राज्यवादविरोधी आघाडी उघडायची आणि कष्टकरीवर्गाला त्याचे नेतृत्व द्यायचे ही चीनची आवडती कल्पना होती.

रशियाला अभिप्रेत असणारे राष्ट्रीय लोकशाहीवादी सरकार बनवायचे तर ठरले त्यासाठी पावले काय टाकायची ? महत्त्वाची गोष्ट म्हणजे अतिउजवे (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जमाते–इस्लामीसारखे), कॉंग्रेसमधील उजवे आणि बिग बूर्ज्वाजी यांच्याशीच लढा देणे, यावरच खरे मतभेद होते. मग कम्युनिस्टांनी परत एकदा आवडत्या शिव्या एकमेकाना देऊन घेतल्या.

पण या अधिवेशनातच भूपेश गुप्त आणि पी. राममूर्ती यानी बुद्धीची चुणूक दाखविली.

## भूपेश गुप्त आणि पी. राममूर्ती यांचे विश्लेषण

भारतीय स्वातंत्र्य अजून पूर्णत्वाला गेलेले नाही. सत्तांतरानंतर इथल्या बूर्ज्वाझीनी इथल्याच प्रतिक्रियावादीशी व साम्राज्यवादाशी तडजोड केली. देश स्वयंपूर्ण कसा होईल ? तर परकीय भांडवलाचा ओघ थांबविला पाहिजे; पण हा ओघ तर थांबविला गेला नाहीच, शिवाय परदेशी एकाधिकाऱ्यांना अधिकाधिक सवलती दिल्या गेल्या. त्यामुळे त्यांच्या देशातील भांडवलदार आणि आपल्या देशातील भांडवलदार यांची अभद्र युती निर्माण झाली. हे दोघेही परस्परांच्या हितसंबंधाचे डोळ्यात तेल घालून रक्षण करायला लागले.(परवाचेच कोकाकोला प्रकरण घ्या).

रशियाने भारताला मदत केली हे खरे; पण शासनाने त्याचा उपयोग काय केला ? तर पाश्चात्त्य देशाकडून अधिक मदत मिळविण्यासाठी एखाद्या तरफेसारखी ही मदत वापरली गेली. म्हणजे परिणामत: फक्त कॉम्प्रादोर बूर्ज्वांचे हात ओले झाले.

मग आता करायचे काय ?

तर अमेरिकन साम्राज्यवादाशी लढा तर द्यायचाच, शिवाय कॉंग्रेसमधले उजवेही हाणून पाडायचे. राष्ट्रीय लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी प्रोलेटॅरिअट हाच क्रांतिदूत असणार; पण ग्रामीण भागातला गरीब, भूमिहीन मजूर, कामगारवर्ग, मध्यमवर्गीय नोकरशाही आणि एकाधिकारी उद्योगव्यवस्थेने संकटात सापडलेला बुद्धिजीवीवर्ग हे क्रांतीचे संभाव्य शिलेदार होणार. परत परकीय हस्तक्षेपाने अस्तित्वावरच घाला आलेले नॅशनल बूर्ज्वाझीही काही प्रमाणात क्रांतिकारी गटांना सहकार्य करतील.

## अजय घोष आणि जी. अधिकारी यांचे प्रतिपादन

भूपेश गुप्त आणि पी. राममूर्ती यांनी डावी विचारसरणी मांडली; पण ती घोष आणि अधिकारींनी नाकारली. भारतीय स्वातंत्र्य कशाच्या आधारे जोखायचे? घोष आणि अधिकारी यांच्या मते ते परराष्ट्रीय धोरणानेच जोखता येईल. भारतीय स्वातंत्र्य ही वस्तुस्थिती होती. भारताचे रशियाशी सहकार्य वाढत आहे. भारत मूलत केवळ साम्राज्यवादविरोधी व वसाहतवादविरोधीच नाही, तर नवस्वतंत्र राष्ट्राचा मित्रही आहे. या परराष्ट्रधोरणात अधूनमधून एखादी चूक होणे अशक्य नाही; पण मूळ धोरण त्या चुकीवरून चूक ठरविणे चुकीचे ठरेल.

दुसरा प्रश्न परकीय मदतीचा. या मदतीचा आवाका मोठा आहे हे कबूल. कारण प्रमाण प्रचंड असले तरी परिणाम कमी होत आहे. एक तर प्रत्येक पंचवार्षिक योजनेबरोबर स्वयपूर्णता वाढत आहे आणि दुसरे रशियाची मदतही वाढत आहे खाजगी क्षेत्रातील परकीय भांडवल हा एक अस्सल धोका आहे, पण त्याला कारण सरकारचे गुळमुळीत अंतर्गत धोरण आहे आणि या गुंतवणुकीचे रहस्य भारतीय बूर्झ्वाजीच्या विभिन्न गुणात्मक रचनेतच आहे.

म्हणजे खरा प्रश्न फक्त लोकांना प्रागतिक ध्येयाने भारणे आणि नॅशनल बूर्झ्वाझीपासून कष्टकरीवर्गापर्यंत, कॉंग्रेसपासून कम्युनिस्टा-पर्यंत सर्वांमधील प्रागतिक लोकांना एकत्र करणे हा आहे हीच आघाडी देशाचे नियंत्रण करील किंवा दुसऱ्या शब्दात आजची बिग डेमॉक्रसी नॅशनल डेमॉक्रसीमध्ये परिवर्तित होईल.

या सर्व कम्युनिस्ट तत्त्वज्ञानात इतक्या खोलवर जाण्याचे कारण म्हणजे नॅशनल बूर्झ्वाजीची क्रांतीतील भूमिका हा पुढे नक्षलवादाच्या निर्मितीचा आणि त्याहीपुढे नक्षलवाद्यांमध्ये फाटाफूट होण्याला कारणीभूत ठरलेला प्रश्न होता. हाच प्रश्न नव्या हिरीरीने एप्रिल १९६१ च्या पार्टीच्या सहाव्या कॉंग्रेससमोर आला. त्यात तीन ठराव आले. त्यातले दोन उजव्या विचारसरणीचे व एक डाव्या विचार-सरणीचा असे वर्णिले गेले तरी प्रमुख प्रश्न नॅशनल बूर्झ्वाजीच्या भूमिकेचाच होता.

यानंतरच्या काळात कम्युनिस्ट पक्षात फूट, डांगेंनी तुरुंगातून लिहिलेली विवाद्य पत्रे 'करंट' या साप्ताहिकाने प्रसिद्ध करून त्याचे खरे स्वरूप उजेडात आणणे इत्यादी घटनात्मक दृष्टया प्रमुख परंतु नक्षलवादाच्या अभ्यासाशी प्रत्यक्ष संबंध नसणाऱ्या घटना घडल्या; परंतु सर्वसाधारण मताविरुद्ध CPI जरी रशियावादी असली तरी CPM चीनवादीच होती असे म्हणता येणार नाही. १९६४ ला चीनने अणुस्फोट केल्यावर नेपाळ, सिलोनमधील कम्युनिस्ट पार्टीजनी चीनला जसा अभिनंदनपर संदेश पाठविला, तसा CPM ने पाठविला नाही हे उदाहरण लक्षणीय आहे.

CPM च्या जन्मानंतर तब्बल तीन वर्षांनी ध्येयधोरणविषयक प्रस्तावाची चर्चा सुरू झाली. एप्रिल १९६८ ला बुर्दवान येथे हा प्रस्ताव मांडण्यात आला संघटनेच्या नियमाचे मात्र प्रस्ताव मांडण्या-मध्येच उल्लंघन झाले प्रस्तावाची चर्चा पक्षात होण्याआधीच तो प्रेसमध्ये गेलेला होता. फक्त आन्ध्रप्रदेश, पंजाब, केरळ, तामिळनाडू, जम्मू आणि काश्मीर आणि बंगालमध्ये राज्यपातळीवर चर्चा झाली. त्यात आन्ध्र व जम्मूकाश्मीरने तो प्रस्ताव संपूर्णपणे फेटाळून लावला.

## आंध्र कमिटीचे मतभेद

या प्रस्तावातील रशियाचे विश्लेषण आणि राष्ट्रीय मुक्तिचळ-वळीची भूमिका यावर आन्ध्रच्या कमिटीचा टीकेचा प्रमुख रोख होता. टीका करणाऱ्यात टी. नागी रेड्डी, चंद्रपुला रेड्डी आणि कोला वेंकय्या हे प्रमुख होते. आन्ध्र कमिटीने १५८ विरुद्ध ५२ मतांनी (आठ तटस्थ) मूळ प्रस्ताव फेटाळला. १४ जून १९६३ ला चिनी कम्युनिस्ट पार्टीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकान्वये, रशियन कम्युनिस्ट पार्टीने प्रसिद्ध केलेल्या 'ओपन लेटर'वरच्या चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या नऊ अभिप्रायान्वये व टी नागी रेड्डी आणि चंद्रपुला रेड्डी, कोला वेंकय्या यानी समितीपुढे ठेवलेल्या दोन ठरावान्वये मूळ प्रस्तावाची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी केली. मूळ प्रस्तावाची चिरफाड चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या सर्वसाधारण ध्येय-धोरणांना अनुसरून करण्यात आली होती केवळ याच प्रस्तावाच्या तत्त्वाविषयी नव्हे, तर भारतीय क्रान्तीच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नाविषयी आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीविषयी CPM ने घेतलेल्या भूमिकेबद्दल साशंकता व्यक्त करण्यात आली होती

CPM ने प्रस्तावात कोणती भूमिका घेतली होती? ज्या प्रश्नावर समितीचा रोख होता, त्या रशियाच्या बाबतीत मूळ ठरावात काहीशी संदिग्ध भूमिका काही मुद्द्यावर होती. रशियावर टीका जरूर करण्यात आली होती, पण अजूनही रशिया 'समाज-वादी' गटात धरलेला होता. 'मोठ्या' (चीन व रशिया) पक्षांनी अमेरिकेविरुद्ध संयुक्त आघाडी उघडावी असेही आवाहन करण्यात आले होते.

या प्रमुख बाबतीत आन्ध्रच्या दोन ठरावांमध्ये खालील भूमिका घेण्यात आली

## रशियाचे स्थान

रशियाच्या प्रतिक्रान्तिवादी व प्रतिक्रियात्मकतेवर मूळ प्रस्तावात प्रकाश पाडण्यात आलेला नाही याच क्रान्तिद्रोही भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य धोक्यात आले आहे. प्रस्तावाने रशियाच्या या द्रोही भूमिकेचे परीक्षण वर्गविरहित तर्कशास्त्राआधारे केले असले तरी रशियन नेतृत्वाच्या वर्गबद्ध मुळा-मध्येच त्याचे उत्तर सापडू शकेल मूळ प्रस्तावामध्ये रशियाची जाग-तिक कष्टकरी वर्गाच्या लढ्यातील फितुरी, समाजवादाचा विनाश करण्याच्या दिशेने करण्यात आलेली वाटचाल याकडे डोळेझाक करण्यात आलेली आहे. रशिया कोणत्याही साध्या बूर्झ्वा राज्यामध्ये आणि रशियन कम्युनिस्ट पार्टी कोणत्याही साध्या बूर्झ्वा पार्टीमध्ये परिवर्तित करण्याच्या रशियाच्या धोरणाचा बुरखा प्रस्तावाने फाडलेला नाही नवीन भांडवलशाही शक्तीचे राजकीय प्रतिनिधित्व करणारी व या लब्धप्रतिष्ठित वर्गाचे हित जपणारी रशियाची नेते-मंडळी आहेत या नवीन भूमिकेमुळे अमेरिकन साम्राज्यवादाशी संधान बांधून चीनमधील आणि इतर राष्ट्रांतील कम्युनिस्ट चळ-वळींना विरोध करून रशिया आपली प्रभावळ वाटून घेण्याच्या मागे लागलेला आहे.

मूळ प्रस्तावामध्ये राष्ट्रीय मुक्तिआंदोलनांचे महत्त्व कमी लेखण्यात आले आहे, लोकयुद्ध एवढा एकच आजचा खरा मार्ग आहे. संयुक्त आघाडीचे आवाहन हे मार्क्सवाद व लेनिनवादाशी काहीही नाते न सांगणारे आहे. साम्राज्यवाद, आधुनिक प्रतिक्रान्तिवाद यामध्ये कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना हीच काय ती आदर्श आहे आणि सांस्कृतिक क्रान्तीद्वारे ते स्थानही तिने स्पष्ट केलेले आहे. चिनी कम्युनिस्ट पार्टी हेच क्रान्तीचे जागतिक केन्द्र आहे आणि प्रस्ताव याचे महत्त्व जाणत नाही.

मूळ प्रस्तावात मांडलेला कॉम्प्रादोर बूर्ज्वा हा अल्पसंख्यवर्ग आहे आणि औद्योगिक बूर्ज्वाशीमुळेच राज्य व सरकार यांचे नियंत्रण होते हा सिद्धांत अशास्त्रीय आहे. वस्तुतः भारतातील बडे उद्योगधंदे कॉम्प्रादोरच होऊ पहात आहेत.

## रशियाचा दांभिकपणा

मूळ प्रस्तावात रशियाने भारताला केलेल्या आर्थिक मदतीचा गौरव करण्यात येऊन त्यामुळे साम्राज्यवाद उलथून टाकणाऱ्या शक्तीचे पुनरुज्जीवन होत आहे असे मत व्यक्त करण्यात आले होते. त्यावरही ठरावात टीका करण्यात येऊन भारतामध्ये तथाकथित पब्लिक सेक्टर या रशियन मदतीने निर्माण झाला तो संपूर्णतः एकाधिकारी भांडवलदारीच्याच हाताखाली राबणारा होता आणि या मदतीने इंडोनेशिया, बोलिव्हिया आणि भारतातील प्रतिक्रियावादी सरकारानाच चैतन्य येऊन त्यामुळे सोव्हिएत प्रभावाखालील राष्ट्रांमध्ये भर पडून चीनविरोधी राष्ट्रे वाढत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय स्वातंत्र्याविषयी आंध्र-समिती निराशच होती. १९५९ नंतर चीनने केलेल्या मतप्रदर्शनाप्रमाणेच प्रतिदिनी अमेरिकन साम्राज्यवादावरील अवलंबित्व वाढत असल्याने ( आर्थिक व परराष्ट्रीय नीतीच्या संदर्भात) भारतीय स्वातंत्र्य नावालाच शिल्लक असल्याचे मत मांडण्यात आले हे मत CPM ला मंजूर नव्हते.

सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अर्थातच बंगालच्या ज्योति बसू गृहमंत्री असणाऱ्या सरकारच्या नक्षलवारी घटनेच्या बाबतीतील प्रतिक्रियेचा होता. पक्षाने संसदीय पद्धतीने जाण्यात व संयुक्त आघाडीची मंत्रिमंडळे स्थापन करण्यात लोकांपासून दूर जाण्याची किंमत मोजली आहे आणि बूर्ज्वांशीच हातमिळवणी करून लोकयुद्धाचा विनाश करण्यास कटिबद्धताच स्वीकारली आहे अशी सार्थ भीती व्यक्त केली होती.

## भावी नक्षल 'वादा'चा आविष्कार

सुस्पष्ट शब्दात भावी नक्षलवाद खालील शब्दात सांगण्यात आला होता :

आज आपण लोकयुद्ध मोठ्या प्रमाणावर पसरविण्यातच केवळ अयशस्वी होत आहोत असे नाही तर भारतीय क्रांतीचा सुस्पष्ट आढावाही न घेता भरकटलेल्या तारूप्रमाणे आपली मार्गक्रमणा चालू आहे.

आमची अशी खात्री आहे की, चीन आणि इतर मागासलेल्या राष्ट्रांच्या समृद्ध अनुभवसंपत्तीवरून या देशाच्या मुक्तिसंग्रामासाठी प्रदीर्घ कृषकक्रांती आणि सशस्त्र उठाव एवढाच मार्ग शिल्लक आहे. संपूर्ण परिस्थितीचे शास्त्रीय अवलोकन करता हा एक आणि एकच मार्ग राहिलेला आहे.

आपल्या प्रेसमध्ये आणि ठरावांमध्ये जहाल क्रांतिवादी, सशस्त्रक्रांतिवादी आणि ज्या लोकांना विचार करण्याआधी पक्षामागे जनसंघटना उभी करण्याचे महत्त्व वाटते ते लोक यांमध्ये प्राधान्य कोणाला द्यायचे हा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. आम्ही असे गांभीर्यपूर्वक प्रतिपादन करू इच्छितो की, या दोन्ही गोष्टी मागासलेल्या देशात अपरिहार्यपणे पूरकच असतात.

तरीसुद्धा चीनच्या कम्युनिस्ट पार्टीने भारताचे 'क्रांतीची ठिणगी पडण्याचा अवकाश, अशा स्थितीप्रत पोचलेला देश' असे वर्णन केले होते त्याच्याशी हे दोघे, नागी रेड्डी आणि चंद्रपुला रेड्डी, असहमत होते.

CPM ने दीर्घ कायदेशीर वा बेकायदेशीर लढ्याचा पुरस्कार केला होता. संसदीय मार्गांच्या साहाय्याने लोकांत असंतोष भडकविणे आणि अमर्यादित प्रमाणात उठाव करण्यास प्रवृत्त करणे हे ध्येय ठरविले होते त्याचप्रमाणे औद्योगिक भागात क्रांतीला सुरुवात होईल असा अंदाज व्यक्त केला होता. या साऱ्याची हेटाळणी यामध्ये करण्यात आली. सामाजिक अर्थशास्त्रीय आमूलाग्र परिवर्तनासाठी अशा दैवी दिनाची जर आपण वाट पहात बसलो, तर इंडोनेशियन कम्युनिस्ट पार्टीसारखीच आपली वासलात लागेल असा इशारा देण्यात आला.

## पार्टीतील मतभिन्नता

यामुळे पार्टीत अंतर्गत तणाव निर्माण झाले. सुंदरय्या व बसवपुन्नय्याना या विरोधकाबद्दल सहानुभूती होती. प्रमोद दासगुप्ता, रणदिवे आणि हरकिसन सिंग सुरजित, यांच्याविषयी कठोर भूमिका घ्यावी या मताचे होते आणि चिनी कम्युनिस्ट पार्टीविषयी अधिक विरोधाची भूमिका घ्यावी असे म्हणत होते. नंबुद्रिपाद, ज्योति बसू आणि राममूर्ती त्याना पक्षातून हाकलून देण्याविरुद्ध होते तर ए. के. गोपालनची भूमिका संदिग्ध होती.

विरोधकांचा प्रमुख आक्षेप अर्थातच संयुक्त मंत्रिमंडळांच्या टिकण्यासाठी दडपण्यात आलेल्या जनसंघर्षांचा आणि १९६७ च्या निवडणुकांत बऱ्याच राज्यात कॉंग्रेसेतर सरकारे येऊनही लोकांच्या असंतोषाचे उद्रेक का होत आहेत याविषयीचे पक्षाचे तात्त्विक असामर्थ्य असा होता. श्रीकाकुलम्, नालगोंडा, वरंगळ आणि खम्ममधल्या जबर दडपशाहीविषयी चिंता व्यक्त करण्यात येऊन एका विशिष्ट पातळीपर्यंत पोचलेल्या संग्रामाचे नेतृत्व पक्ष करू शकला नाही असे बजावण्यात आले.

याचा परिणाम म्हणून टी. नागी रेड्डी, डी. वेंकटेश्वर राव, चंद्रपुल्ला रेड्डी आणि कोला वेंकय्या याना लटपटी करून निसटत्या बहुमताने सार्वजनिक सभा घेण्यापासून व जिल्हासमित्यापुढे त्यांचे म्हणणे मांडण्यापासून बंदी करण्यात आली. त्यानी राज्य-सचिवालयातून राजीनामे देऊन प्रत्युत्तर दिले हा खेळ बराच वेळ चालला होता. या सुमारास बंगालमधील नक्षलवारीच्या उठावाला एक वर्ष लोटत आल्यावर चारू मुझुमदारने नक्षलवादी चळवळीला निराळीच

मती दिली. त्याच्या ' मते जमीन, पीक, सामान्य मागण्या यासाठी सशस्त्र लढा न देता तो सरकारच ताब्यात घेण्यासाठी द्यावा. असा लढा आयोजित करण्यासाठी तरुणवर्ग, कष्टकरीवर्ग, कृषकवर्ग आणि राबणारा मध्यमवर्ग हे मदतनीस असतील. माओची वचने केवळ उच्चारणारेच नव्हेत तर आचरणारे जनसामान्यात ते तत्त्वज्ञान पसरवतील आणि खेडोपाड्यात सशस्त्र क्रांतीचा उठाव करू लागतील अशी संघटना ही केवळ क्रांतिकारीच नसेल, तर ती एकाच वेळी लोकांची सशस्त्र शक्ती आणि सरकारी ताकद असेल. लष्करी, राजकीय, आर्थिक आणि सास्कृतिक अशा प्रत्येक चळवळीत यातल्या प्रत्येक सभासदाने भाग घेतलाच पाहिजे '

### भ्रमनिरास झाला

ही स्वप्ने फार काळ टिकली नाहीत. कारण दो त्रिघा जमिनीसाठी लढणाऱ्या शेतकऱ्याला सरकार स्थापण्यात काहीच रस नव्हता. वस्तुत श्रीकाकुलम्मध्ये १९५९ सालापासून आदिवासीवर बाहेरच्याचे अतिक्रमण होत असल्याने या ना त्या प्रमाणात उद्रेक होत होते नोव्हेंबर १९६७ ला त्याचा मोठ्या प्रमाणावर स्फोट झाला. नंतर सशस्त्र लढ्यालाच तोड फुटले; परतु त्यामानाने पश्चिम बंगालमध्ये कृषकक्रांती जवळजवळ नव्हतीच. त्यामुळे नक्षलबारीतील अगदी लहानशा उद्रेकाला प्रचंड प्रसिद्धी देण्यात आली. पाठोपाठ बिहार, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशात अशाच चकमकी उडाल्याच्या बातम्या येऊ लागल्या आणि All India Coordination Committee of Communist Revolutionaries चे निरनिराळे नेते न केलेल्या कर्तृत्वाचे श्रेय उचलायला तयार झाले

प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या पाठोपाठ आपलीच असणारी एके काळी जमीन सामदामाचे प्रयोग संपल्यावर दडाने ताब्यात घेण्याच्या प्रयोगाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न झाला. कारण अशा प्रकारचा उद्रेक नवीन होता, तितकाच प्रयत्न पोरकट होता.

कनु सन्यालने तराई भागातला लढाही सरकार ताब्यात घेण्यासाठीच होता असे जाहीर केले त्याचप्रमाणे गेली काही दशके चालत आलेला विश्वासघात आता थाबेल असे ठासून सांगितले; पण प्रत्यक्षात घडले होते ते फार साधे होते. जमिनीला भुकेलेल्याचा तो साधा मार्ग होता त्याना नॅशनल–बिग–कॉम्प्रादोर–पेटी बूर्झ्वाही माहीत नव्हते; परतु या नावाखाली जे जे केले गेले किंबहुना जो जो डाव्या विचारसरणीचा जहाल (अतिरेकी असेलच असे नाही) आविष्कार झाला, त्याला अजाणता नाव दिले गेले–नक्षलवाद.

नक्षलवादाचा उगम हा असा झाला.

[ क्रमश ]





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

## पुस्तके

# साहित्यातील प्रीती आणि भक्ती

### एकांगोपणाकडे झुकलेले....

प्रमुख मराठी साहित्यिकांच्या काही साहित्यकृती आणि त्यावर आजपर्यंत झालेले समोक्षात्मक लेखन त्या सर्वांचा एका वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करण्याचा नवा प्रयोग म्हणून जावडेकराच्या 'साहित्यातील प्रीती आणि भक्ती' ह्या पुस्तकाकडे पाहावे लागेल. अलीकडच्या मराठी समोक्षेची समीक्षा करणे हा ह्या पुस्तकाचा एक उद्देश आणि प्रीती अन् भक्ती मूलत: एकच है सूत्र डोळ्यापुढे ठेवून ललितकृतीचे परीक्षण करणे हा दुसरा उद्देश. विज्ञानाच्या विविध शाखाचा वाङमयकृतीवर कळतनकळत होणारा परिणाम तपासणे हा दृष्टिकोनही मराठी समीक्षेत नव्याने आणण्याचं श्रेय ह्या पुस्तकाला द्यायला हवं.

प्रीती आणि भक्ती ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असा एक नवा विचार या पुस्तकातून जावडेकर मांडतात. विशेषत: अकराव्या लेखात ह्याविषयी त्यानी जे विवेचन केले आहे ते विद्वानाना कितपत ग्राह्य वाटेल ही शंका आहे; पण साधुसंताचे दाखले देऊन आणि बेले, टॉयन्बीसारख्या पाश्चात्य लेखकाचे विचार मदतीला घेऊन लेखकाने मांडलेल्या ह्या नव्या दृष्टिकोनाकडे आधुनिक समीक्षकानी लक्ष द्यायला हवे.

ह्या पुस्तकाच नवा प्रयोग म्हणून असाधारं महत्त्व जरी लक्षात घेतलं तरीही हे नमूद करायलाच हवं का प्रायोगिक अवस्थेत अपरिहार्यपणे आढळणारे काहीसे कच्चेपण, काही सैल दुवे, नव्यानं मांडल्या जाणाऱ्या विचारपद्धतीच्या प्रत्यक्ष वापरात नकळत येणारा एकांगीपणा ह्यातून जावडेकरांचे लेखन सुटू शकलेले नाही.

'नवी टोका आकारमीमासेपुरतीच मर्यादित झालेली असून ह्या Formal criticism पेक्षा अधिक महत्त्वाचा म्हणजे तादात्म्य टीकेचा मार्ग जावडेकरानो चोखाळला' असे क्षीरसागरानी प्रस्तावनेत म्हटले आहे.

मूलत: वाङमयाची समीक्षा करताना आकार आणि आशय असा वेगळा विचार करणे इष्ट ठरते का? कलाकृतीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवानेच आपले रूप, आपला आकार निवडलेला असतो कलाकृतीच्या बाह्यागाचा आणि अंतरंगाचा वेगळा विचार करावा लागला तर ती कलाकृती एकजीव, एकसंघ नसते असे म्हणावे लागेल. 'जावडेकरांची टीका ही आकृतीबंध बाहेरून पाचपण्याची टीका नसून ती सहृदय तादात्म्याची टीका आहे, सौदर्याचा आस्वाद घेण्याची टीका आहे' हे खरेच. आपल्याकडे अलीकडेच चर्चेचा विषय बनलेल्या तत्त्वज्ञानाची आठवण व्हावी अशा 'शरीरसुखातूनच प्रेमसमाधी कशी लावावी' त्या शीर्षकाखाली असलेल्या लेखातून बोरकर-तांब्यांच्या कविताचे किंवा इंदिरा संतांच्या काव्याबद्दलचे विवेचन जावडेकराच्या सौदर्यास्वादाची साक्ष देणारे आहे. सहृदय तादात्म्याचे दर्शन घडविणारे आहे.

पण हे तादात्म्य कलाकृतीच्या प्रत्येक घटकाशी हवे, अनुभवाच्या प्रत्येक बाजूशी हवे आणि सर्व घटकाच्या परस्परसंबंधातून साकारणाऱ्या एकरस कलाबंधाशी हवे. जावडेकराचे तादात्म्य त्या कलाबंधातील त्यांच्या सूत्राला आवश्यक तेवढ्याच घटकांशी आहे. कलाकृतीतील तो एकच घटक, मग तो लहान आहे की मोठा आहे, संपूर्ण कलाकृतीच्या संदर्भात त्याचे स्थान कुठे आहे त्याचे दुवे इतर अनुभवघटकाशी कसे आहेत, कलाकृतीच्या रचनाबंधात त्याचे कार्य काय आहे याचा विचार फार कमी करून केवळ त्या घटकाचे स्वविवेचनातले मूल्य मोठे मानून कलाकृतीच फार मोठी आहे असे म्हणणे कितपत योग्य ठरेल? कलाकृती श्रेष्ठ की कनिष्ठ, कितपत सदोष, कितपत निर्दोष हे त्या कलाकृतीत व्यक्त झालेल्या अनुभवाच्या एखाद्याच घटकावरून कसे ठरविता येईल? कलाकृतीची समीक्षा ही कलाकृतीतल्या एका घटकाचे तादात्म्याने विवेचन करणारी समीक्षा असते का?

तादात्म्याबरोबरच जी तटस्थता हवी असते तिचे भान लेखन करणाऱ्याने जरूर ठेवायला हवे. समीक्षक दोषदिग्दर्शकच केवळ नसावा हे जितके खरे; तेवढाच तो त्या कलाकृतीचा केवळ स्तुतिपाठकही नसावा. समीक्षकाची भूमिका कलाकृतीतील सौंदर्यास्वादाची असावी; पण ते आस्वादन समतोल वृत्तीने व्हायला हवे. ह्याचमुळे ह्या पुस्तकातून मराठी समीक्षकावर जावडेकरानी जो हल्ला चढविला आहे त्यातला एकांगीपणा, त्याच्या पायातील दुबळेपणा चटकन लक्षात येतो.

तरीही विज्ञाननिष्ठ विवेचनाचा वाङमयसमीक्षेत होणारा उपयोग आणि प्रीति-भक्तीसबधी जावडेकरानी माडलेला नवा विचार ह्या दोन्ही दृष्टीनी ह्या पुस्तकाचो वाचनीयता विद्वानानी ठरवायला हवी.

—अरुणा ढेरे

*साहित्यातील प्रीती आणि भक्ती*
प्रा. मुरलीधर जावडेकर
नूतन प्रकाशन, पुणे
पृष्ठे २२५, कि. ३० रु

## साभार पोच

१. हिंदोळ्यावर (कादंबरी)
विभावरी शिरूरकर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे १२६, कि. ६ रु.

२. रंगपालवी (कादंबरी)
के. रा. कोळी
अनिल प्रकाशन, नागपूर.
पृष्ठे १९७, कि. १५ रु.

३. माझ्या कविता (काव्यसंग्रह)
दि. वा. फडणवीस, नागपूर.
पृष्ठे ५१, कि. २ रु.

४. जास्वंदी (नाटक)
सई परांजपे
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे ६१.

# आमचे ग्रंथालय

## Powers Of Mind By Adam Smith

Ballantine Books,
pages 419,
Dollars 1 95.

---

ॲडॅम स्मिथची यापूर्वीची दोन पुस्तके (The Money Game व Super-money) बरीच गाजली होती व ती बराच वेळ बेस्टसेलरच्या यादीत होती. वरील पुस्तकात मनाची अतींद्रिय शक्ती या विषयावर काठोकाठ माहिती भरलेली आहे ज्याना या विषयात रस आहे त्यांनी हे पुस्तक अवश्य वाचावे

Powers of The Mind मध्ये ॲडॅम स्मिथ नावाजलेल्या ट्रिपाबद्दल (अर्थात mind trips) बरीच माहिती देतो. त्याशिवाय बायोफीडबॅक, अल्फावेव्हचा चमत्कार (याची माहिती मी माणूसच्या अंकात Brain Revolution या पुस्तकाचा परिचय करून देताना दिली होती ) व इतर विषयांवर बरीच माहिती आहे.

काही काही लोकाचा अतींद्रिय शक्तीवर व तत्सम गोष्टीवर अजिबात विश्वास नसतो. असल्या गोष्टीला ते थातुरमातुर समजतात. 'त्याला काही स्पष्टीकरण आहे का ?' 'त्याला काही शास्त्रीय आधार आहे का ?' असे त्याचे प्रश्न असतात. अर्थात त्याना नकारात्मक उत्तर मिळते. कारण अजून तरी असल्या गोष्टीला शास्त्रीय आधार मिळालेला नाही. नकारात्मक उत्तर मिळाल्यावर ते भुवया (सुंदर स्त्री असली तर 'धनुष्याकृती' भुवया नाचवील.) उडवतील काय, पोटातून श्वास बाहेर काढून अशा तऱ्हेने 'हुं !' म्हणतील काय की त्याना पटवून देता देता आपली त्रेधातिरपिट उडते. असल्या लोकानी शास्त्रीय स्पष्टीकरण मिळेपर्यंत थांबणेच योग्य !

या पुस्तकात सिग्मंड फ्रॉइडला कार्ल युगच्या सान्निध्यात आलेल्या अतींद्रिय शक्तीचा (Psychokinesis) अनुभव दिलेला आहे एकदा मानसशास्त्रातील या दोन विभूती बोलत बसल्या होत्या. ज्या गोष्टी आपल्याला ऐकू येत नाहीत, दिसत नाहीत, ज्याना वजन नसते, आकार नसतो, रूप नसते असल्या गोष्टीविषयी व सुप्त मनाविषयी ते बोलत होते. बोलणे चालू असतानाच युगच्या बरगड्याच्या बाजूला एक विचित्र सेन्सेशन झाले 'खाड !' नेमका याच वेळेला शेजारच्या पुस्तकाच्या कपाटात जोराचा आवाज झाला. त्या दोघाना वाटले की, आता पुस्तकाच कपाट खाली कोसळतंय की काय; पण परत सर्व शांत झाले. 'हा एक सायकोकिनेसिसचा प्रकार आहे बर का !' युग म्हणाला. फ्रॉइडने आपल्या किंचित दाट भुवया उडविल्या व म्हणाला, 'Bosh !' (nonsense !) यावर युंग म्हणाला, 'साहेब, परत बुककेसमध्ये आवाज येईल बघा. सावध !'

'खाऽऽऽड !' जोरात परत आवाज आला अर्थात युगने कपाटाला हातही लावला नव्हता ! त्या वेळच्या सनातनी लोकाच्या तोंडचे पाणी पळविणाऱ्या फ्रॉइडच्याच तोंडचे पाणी पळाले !

कॅप्टन मिचेल (अस्ट्रॉनट) अंतराळवीर यानी युरी गेलरला स्टॅनफोर्ड रीसर्च इन्स्टिट्यूटमध्ये व TV प्रोग्रॅम्सवर आणले होते. त्यामुळे युरी गेलरची विश्वासार्हता (credibility) वाढली होती अस्ट्रॉनट मिचेल स्पेसमध्ये होता तेव्हा त्याला एक चमत्कारिक अनुभव आला होता. अवकाशात त्याच्या भावना घड्याळाच्या लंबकासारख्या उत्कट

---

### नवीन दाखल झालेली काही पुस्तके

१. सन्मान– ( कादंबरी )– सौ कुसुम अभ्यंकर — रु २५/–
२. गृहसजावट– शशिकांत केळकर — रु १५/–

-ENGLISH-

1. **Raise The Titanic !** – ( Bestseller – Adventure Thriller ) – Clive Cussler — Rs 18 90
2. **Acapulco**– ( Bestseller–Novel )– Burt Hirshfeld — Rs 10/–
3. **Washington D. C.** – Bestseller–(The explosive novel of American power politics )– Vidal Gore — Rs 19/–
4. **The Kaufman Snatch** – ( Bestseller–Novel ) Robin Moore — Rs 18 90
5. **An Eye to India** – ( First book by a foreigner on emergency )–David Selbourne — Rs 14 55
6. **Oliver's Story** – ( Bestseller )– Eric Segal — Rs 13/–
7. **Twinkle, Twinkle, Little Spy** – ( Spy Story )– Len Deighton — Rs 15/–
8. **My Country And My Rulers** – V B Kulkarni — Rs 40/–
9. **Mystery of Nagarwala Case** – K L Gauba — Rs. 5/–
10. **Tears of Autumn** – Charles Mc Carry — Rs. 18/–

- नॉन मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ऱ्यांइतक्याच वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचावयास मिळतात.
- Watching Ty will make you a conformist ! But book reeding will make you an individualist !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

आनंद व अति दु:ख याच्यामध्ये हेलकावे खात होत्या. त्याला असेही वाटले की, कसली तरी गूढ यंत्रणा विश्वाचे नियत्रण करीत आहे व ती यंत्रणा बुद्धीने समजण्यासारखी नाही. (बहुतेक ती अतर्ज्ञानाने समजण्यासारखी आहे)

अतराळवीर कॅप्टन मिचेल यांना इंजिनियरिंगची Ph. D डिग्री आहे. त्यांना सहज विचार आला की, 'गेलर-असर' (Geller effect-केवळ नजरेने व विचाराने काटे-चमचे वगैरे वाकविणे) हा प्रकार जर सत्य असला तर इंजिनियरिंग व पदार्थविज्ञानशास्त्र याचे काय? याला कॅप्टन मिचेल या पुस्तकात असे उत्तर देतात की, सायकोकिनेसिस व पदार्थविज्ञान हे परस्परविरोधी होणार नाहीत; पण एकमेकांना पूरक ठरतील. न्यूटनच्या फिजिक्स (पदार्थविज्ञान) ला आइनस्टाइनचे सिद्धान्त पूरक ठरले नाहीत काय?

या पुस्तकातील लेफ्ट साइड, राइट साइड ऑफ द ब्रेन हे प्रकरण फार वाचनीय आहे डावीकडील मेंदू शरीराच्या उजव्या भागावर नियंत्रण ठेवतो, त्याचप्रमाणे उजवीकडील मेंदूचा भाग शरीराच्या डाव्या भागावर नियत्रण ठेवतो, डावीकडील मेंदूचा भाग आपणास व्यावहारिक बनवितो, रॅशनल बनवितो. उजवीकडील मेंदूच्या भागात कलाकाराचे, द्रष्टेपणाचे बीज असते.

या डाव्या-उजव्या मेंदूच्या भागाने शरीराच्या विरुद्ध भागावर नियत्रण ठेवणे यावरून मला एक महत्त्वाची गोष्ट आठवते. काही मुले लहानपणापासूनच डावखोरी असतात. त्याचे पालक व इतर नातेवाईक या मुलांना उजवा हात वापरण्याबद्दल सारखे टुमणे लावतात. काही मानसशास्त्रज्ञांच्या मते पालकांनी जर असे टुमणे लावले तर मुलांच्या बाबतीत त्याची परिणती तोतरेपणात, अडखळत बोलण्यात होते, तर डावखोरा डावखोराच राहू देणे औचित्यपूर्ण होईल. नाही तर डावखोरा डावखोरा तर राहीलच; पण डावखोरा तोतराही होईल!

या डावी-उजवीकडच्या मेंदूचे संशोधन रॉजर स्पॅरी या प्राध्यापकाने केले. त्याने असे सिद्ध केले की मेंदूचे डावीकडचे व उजवीकडचे भाग स्वतत्रपणे व्यवहार करतात आणि कधीकधी तर डावीकडचा भाग काय करतो हे उजवीकडच्या भागाला माहीतसुद्धा नसते! साधारण मुलाच्या दहाव्या वर्षानतर बोलण्याचे केंद्र हे डावीकडच्या भागात स्थिरावते. दुर्दैवाने जर लहान मुलाला डावीकडच्या बाजूला मेंदूवर जखम झाली व मूल वाचले तर त्याची उजवीकडची बाजू बोलण्याचे नियत्रणकेंद्र आपल्याकडे ओढून घेते; पण मोठ्या माणसाला जर मेंदूच्या डावीकडे जखम झाली तर तो कायमचा मुका होतो. मेंदूचा डावा भाग जर फारच कार्यक्षम असेल तर उजवा भाग किंचित कमी कार्यक्षम असेल असे स्पॅरी म्हणतो.

या पुस्तकातील नॉर्मन कझिन्सची कहाणी मनोरजक आहे नॉर्मन कझिन्स हा 'सॅटरडे रिव्ह्यू' या प्रख्यात नियतकालिकाचा सपादक आहे. नेहमीच्या नियतकालिकाच्या समस्यानी तो गाजलेला असे. एकदा मॉस्कोहून परत येताना तो आजारी पडला. ताप १०४° पर्यंत गेला. त्याने थोडे जरी पाय हालविले तरी ते एकदम दुखत असत. डॉक्टराना चाचणीत आढळून आले की त्याचा 'सेंटिमेंटेशन रेट' ८५ वर आला. (नॉर्मल 'सेंटिमेंटेशन रेट' १२ ते २० असतो.) त्याला बेसुमार वेदनाशामक गोळ्या दिल्या गेल्या. त्याशिवाय झोपेच्याही गोळ्या दिल्या गेल्या. या औषधाच्या माऱ्यामुळे त्याची अवस्था आणखीनच बिघडली. हा इतका 'इयाट्रोजिनेसिस' (Iatrogenesis म्हणजे डॉक्टराने पेशंटची केलेली हानी) झाल्यावर एका डॉक्टरने त्याला सुचविले की, 'आता तू तुझ्या कागदपत्राचे व्यवस्थित बघून ठेव. पुढे काय होईल ते सागता येत नाही!' यात कुठे तरी मख्खी आहे असे नॉर्मन कझिन्स याना वाटले. (सपादक असल्यामुळे त्याना 'सिक्स्थ सेन्स' असावे!) कझिन्सना वाटले की आधुनिक जगात बऱ्याच शारीरिक व्यथा तणाव-निर्मित आहेत. त्यानी विचार केला की 'If negative emotions produce negative chemical changes, then positive emotions could produce could produce positive changes'

त्यांनी डॉक्टराना सागितले, 'माझे मी बघून घेईन मला हॉस्पिटलमधून सोडा, माझ्या जबाबदारीवर मला मोकळे करा!' त्यानी पुढे भरपूर विनोदी फिल्मस् पाहिल्या दहा मिनिटे जर तो खदखदून हसला तर त्याला एक तास स्वस्थ झोप लागे व त्याच्या वेदनाही कमी होत असत.

नॉर्मन कझिन्स याने लायनस पॉलिंग याचे vitamin C वरचे वाङमय वाचले होते. (लायनस पॉलिंगच्या व्हिटॅमिन C अॅन्ड द कॉमन कोल्ड या पुस्तकाचा परिचय मी या आधी माणूसमध्ये दिला होता.) व्हिटॅमिन C व collagen रोग याचा सबंध असतो असे पॉलिंगने एकदा लिहिले होते. नॉर्मन कझिन्सनी हळूहळू या व्हिटॅमिनचे डोस वाढविले. आपले शरीर ही एक self-correcting mechanism असते. कधीकधी डॉक्टर्स त्यात ढवळाढवळ करून रोग वाढवून टाकतात. पुष्कळ वेळा मानवी शरीर स्वत चे प्रिस्क्रिप्शन स्वतःच लिहीते.

नॉर्मन कझिन्सला अशा रीतीने संपूर्ण बरे झालेले पाहून डॉक्टराना पुष्कळ आश्चर्य वाटले. 'कधीकधी चमत्कार होणारच' किंवा One of those things' असे म्हणून डॉक्टर्स असली प्रकरणे निकालात काढतात.

एकदरीत पुस्तक वाचनीय आहे.

—जे. एन्. पोंडा,
—फिनिक्स लायब्ररी


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# अवघा आनंदी आनंद

## समाजसेवकाच्या मुलीच्या लग्नाची गोष्ट

विठ्ठल घोंडो पूर्णपात्रे ऊर्फ बाळ कोल्हटकर हे समाजसेवक शाळा काढणे ही त्याची मुख्य, फुलटाइम सेवा; शिवाय मग खाटकाच्या हातून गायी वाचविणे किंवा असलेच काही तरी बाजूचे उद्योगही ते करतात. त्यातून एकीकडे प्रतिष्ठा, पदव्या वगैरे मिळतात दुसरीकडे खाटकाच्या हातचा मार व तत्सम गोष्टी मिळतात एकूण वाण विनोबाच्या वळणावरचा. हे पूर्णपात्रे स्थितप्रज्ञ असल्याने ते सकारण/अकारण पण वारवार 'अवघा आनंदीआनंद' असे पालुपद घोळवीत असतात म्हणून नाटकाचे नाव अवघा आनंदीआनंद. हेच शब्द असलेल्या भीमसेन जोशींनी गाइलेल्या अभंगवजा गाण्यानेच नाटकाची सुरुवात व अखेर होते. ते गाणेही पुन्हा विठ्ठल घोंडो यांनीच लिहिलेले. त्यामुळे सुरुवातीपासूनच या व्यक्तिरेखेच्या उदात्तीकरणाला प्रारंभ होतो तोही दोन मार्गांनी. एक। त्याचा डायरेक्ट गौरव. 'गवत किती वाढलं तरी वडाच्या डोक्यावर जाऊन बसेल का' अशा टाळीच्या वाक्यातून, त्याच्या चाहत्याद्वारे. दुसरा: छुपा गौरव, म्हणजे घरच्या मंडळींनी केलेल्या निंदेच्या आडबुरख्यातला. उदाहरणार्थ सौ. पूर्णपात्रे (शीला गुप्ते) या अखंड 'कुठून ग बाई याच्याशी लग्न करून या घरात आले,' असा ठेका आळवीत असतात अगदी (प्रेक्षकांना) कंटाळा येईपर्यंत. अर्थात ह्याच वेळी दुसरीकडे विठ्ठल घोंडोची दृष्ट काढणे व इतर कौतुकप्रकार जारी असतातच.

नाटकाच्या सुरुवातीलाच विठ्ठल घोंडोच्या समाजसेवेची सविस्तर चर्चा आल्याने व त्यानंतर लगेचच त्याचे संसाराकडे अजिबात लक्ष नाही असा पुराव्यासह जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याने, बाळ कोल्हटकरांनी आपला 'फॅमिली साइज एंटरटेनमेंट ट्रंक' सोडला असावा आणि आता एका समाजसेवकाच्या जीवनातला संघर्ष पाह्यला मिळणार अशी भोळी आशा माझ्यासारख्या काहीजणांना वाटायला लागली होती, पण नाही. महाराष्ट्राचे हे मिनि गडकरी आपली जुनीपुराणी दूर्वांची जुडी सोडायला अजून तयार नाहीत. या नाटकातही अखेर समाजसेवा शोभेच्या पडद्यासारखी पार्श्वभूमीलाच राहिली आणि अवघा आनंदीआनंद ही विठ्ठल घोंडोच्या मुलीच्या विवाहाची कथाच बनली. नाटकातली सगळी पात्र–विशेषत: सर्व पूर्णपात्रे कुटुंबीय–introduce केली गेल्यानंतर घडत काय तर चौघेही एकमेकाच्या प्रेमळ उखाळ्यापाखाळ्या काढीत राहतात त्याही भावाची नोकरी, पिंकीचं लग्न या विषयावर. भाऊ दाढीधारी, काचा मारून धोतर वगैरे नेसणारा. थोडक्यात म्हणजे 'तिकडल्या' शिस्तीतला पिंकी, तशी म्हटलं तर मॉड, म्हटलं तर आईबापाच्या आणि भारतीय संस्कृतीच्या ऐकण्यातली निच एका देखण्या श्रीमंत तरुणावर बारीकं प्रेम वगैरे. आपली दोन्ही पोरं काही तरी भानगडी करणार अशा भीतीनं मातोश्री सतत धास्तावलेल्या मग त्या त्याच्यावर आणि त्यांना वळण न-लावणाऱ्या वडिलांवर अखंड तोंडसुख घेणार. वडील 'चालायचंच, काळ बदलतो आहे' वगैरे तडजोडजमातीमधले, पण मधेच 'पोरी, तुझ्या प्रियकरानं तुला फसविलं तर तुझा हा बाप तुला जिवंत भेटणार नाही!' असे मनाठायी भावविव्हलतेने थबथबलेले इशारे देणारे. तिकडे पिंकीचे भाऊसाहेब त्या प्रियकराला शोधून काढून आनंदानं भगिनीदान करायला निघतात. दरम्यान विठ्ठल घोंडो अपघातात दगावल्याची चुकीची बातमी व पिंकीला तिच्या प्रियकराने फसविल्याची गैरसमजूत एकदमच येऊन थडकतात साहजिक घरी शोकसागर. पिंकी आत्महत्यामोहिमेवर मग घाईघाईने व योगायोगाची मदत घेऊन सगळा घोटाळा उलगडला आहे आणि पिंकी व तिच्या भाऊरायाचे लग्न एकदमच ठरवून टाकून घोंडो विठ्ठल व त्यांच्या सौभाग्यवतींना आपापली पालुपदे घोळवायला मोकळे सोडले आहे

लेखनाच्या दृष्टीने कोल्हटकरांचा तिसरा अंक सगळ्यात निसरडा झाला आहे. पहिले दोन अंक या भावडाबद्दलच्या निष्फळ तत्त्वचर्चेत खर्ची घातलेले असल्याने तिसऱ्या अंकात रात्र थोडी सोंगं फार अशी अवस्था झाली आहे. या एकाच अंकात विठ्ठल घोंडो जिवंत असल्याचे समजते, त्याची व सुखात्मे उद्योगपतींची गळामिठी पडून पिंकीचे लग्न ठरते, पिंकी आत्महत्येला जाऊनही तिचा प्रियकर वाचवायला धावेपर्यंत वाट पाहत थांबते, पिंकीचा भाऊ हा उनाड नसून चक्क सी. ए. वगैरे बडा आदमी असल्याचे अडाणी रहस्य बाहेर पडते, त्याचेही लग्न हास्यास्पद व केविलवाण्या पद्धतीने ठरते आणि घरात लुडबुडणारे ज्योतिषी हे सौ विठ्ठल घोंडोवर वाकडी नजर ठेवून असल्याचे फालतू व अनावश्यक सीक्रेटही फुटते त्यामुळे अंकाचा 'होल्डऑल' झाला आहे एवढी गुंतागुंत निर्माण करण्याचीच गरज मुळात होती का, असा प्रश्न मला पडलेला आहे कोल्हटकरांना या नाटकात साधावयाचे होते तरी काय? पिंकीची लग्नकथा तिच्या कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर रंगविणे असाच आपला उद्देश असल्याचे त्यांनी जाहीर केल्यास माझा तोंड बंद होत. अर्थात जुन्या वळणाच्या मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या पण आधुनिकतेचं वारं लागलेल्या सुंदर, सुस्वभावी वगैरे कॉलेजकन्यकेची प्रेम–लग्नकथा हा नाटकाचा विषय असूच नये असं मला बिलकुल म्हणायचं नाही, पण मग वडिलांच्या समाजसेवेचं अस्तर कशासाठी? त्यांच्या समाजसेवेचा संबंध या नाट्यकथानकात, 'त्यामुळे त्याचे घराकडे दुर्लक्ष होते' एवढ्यापुरताच येतो, याचा खेद होतो घराकडे दुर्लक्ष करणारा प्रत्येकजण हा फक्त समाजसेवकच असला पाहिजे असं थोडंच आहे? तेव्हा समाजकार्यकर्त्यांच्या अंतरंगात शिरून नाटकाला (कौटुंबिक साच्याबाहेर न जाताही) एक निराळी dimension मिळवून

देण्याचा मोका कोल्हटकरांनी हमखास दवडला आहे आणि दाढी, खादी, शबनम वगैरे सर्वोदयी बहिरंगावरच ते संतुष्ट राहिले आहेत.

अर्थात विकीची लग्नकथा हाच कोल्हटकरांना या नाटकाचा केंद्रबिंदू करायचा होता असं गृहीत धरलं (आणि गृहीत तरी कशाला धरायला हवं ? नाट्यसंहिता वरवर चाळली तरी तसंच घडलेलं असल्याचं लक्षात येईल !) तर कोल्हटकरांना लेखक व दिग्दर्शक म्हणून एका गोष्टीचं श्रेय द्यायलाच हवं. मागे उल्लेखिलेले तुरळक अपवाद सोडता उच्च वर्णीय सुसंस्कृत मध्यमवर्गीय मराठी कुटुंबाचं चित्र त्यांनी चांगलं उभं केलेलं आहे. अशा घरातलं वातावरण, तिथं रोजच्या आयुष्यात (वा क्वचित प्रसंगीही) घडू शकणाऱ्या घटना तिथल्या कुटुंबघटकाचे परस्परसबंध, त्यांच्यात होऊ शकणारे वादसंवादविवाद यांच्या चित्रणाच्या बाबतीत कोल्हटकर वास्तवाच्या खूपच जवळ आले आहेत. याचं एक कारण कदाचित असंही असू शकेल की, त्यांच्या पूर्वीच्या काही नाट्यलेखनाच्या तुलनेने अवघा मानंदीआनंदमध्ये सुंदर शब्दांचा, चमकदार सुभाषितांचा आणि कल्पनारम्य काव्यात्मतेचा सोस बराच कमी आहे. आदतसे मजबूर म्हणून अधनमधन त्या वस्तूही डोकावतात, पण नाटकाला खात नाहीत. बहुश: व बहुतेक पात्र माणसासारखीच वागता–बोलतात. याला कलाकाराकडून मन पूर्वक सहकार्य लाभल्याचं जाणवतं. विशेषत: वंदना पंडित (विकी) व गणेश सोळंकी (ज्योतिषी) यांचा खास उल्लेख करायला हवा. सोळंकीच्या अभिनयातला अनुभवी सफाईदारपणा व वंदना पंडितच्या अभिनयातला ताजेपणा ही वैशिष्ट्ये विशीतली स्वप्नील विकी म्हणून वंदना दिसली व शोभलीही छान. तिचा प्रियकर व भाऊ दोघेही ठीक. श्री. सुखात्मे (आ. दे. पाटील) व सौ विठ्ठल धोंडो (शीला गुप्ते) या दोन्ही व्यक्तिरेखा काहीशा कर्कश व एकसुरी वाटतात. अर्थात एकसुरीपणात सगळ्यात आघाडी मारली आहे ती स्वत बाळ कोल्हटकरांनीच अजिबात चढउतार न करता ते वाक्यच्या वाक्य संथपणे म्हणत राहतात, वेद (किंवा अंगाईगीत) म्हटल्यासारखी.

कोल्हटकरांच्या लेखनातलाच कच्चेपणा; अखेर नाटकाला प्रामुख्यानं मारक ठरला आहे असं वाटतं. विठ्ठल धोंडोच्या तथाकथित निधनानंतरची हास्यास्पद शोकस्पर्धा, सुखात्म्यांचे सेक्रेटरी व विठ्ठल धोंडो यांच्यातली फालतू चर्चा, विठ्ठल धोंडोचा भक्त, कार्यकर्ता व ज्योतिषीबुवाना दिलेलं अवाजवी स्वातंत्र्य ही लेखनदोषाची काही उदाहरणे नाटकातील गीत–संगीत फारसे आवश्यक नसले तरी श्रवणीय आहे विशेषत 'टायटल सॉंग.' प्रकाशयोजना–खास करून दुसऱ्या अंकातली–मात्र बरीच चित्तचक्षुचमत्कारिक असली तरी अगदी अनावश्यक व त्रासदायक आहे. ◻

---

## हिंदी चित्रपट

# कोतवालसाब

### मनमोहन देसाईच्या वेषात हृषिकेश मुकर्जी !

---

गुलजार आणि त्याचे गुरुजी हृषिकेश मुकर्जी हे दोघेही दिग्दर्शक म्हणून थोर असले तरी निष्णात कथाचोर आहेत. चित्रपटकथांमध्ये Originality नसणे हे दोघांचेही एक समान ठळक वैशिष्ट्य हृषिदानी तर आजपर्यंत नाना गमतीजमती केलेल्या आहेत. त्यांचा 'आनंद' हा गाजलेला चित्रपट एका जपानी सिनेमावरून काढलेला होता आणि त्याचाच 'मिली' 'आनंद'वरून बेतलेला होता. 'बेकेट'वर आधारलेल्या 'बेइमान' नाटकावरून त्यांनी 'नमकहराम'ची स्टोरी तयार केली नि कहर म्हणजे स्वत च्या नावावर खपवली. 'जिंदगी' हा त्यांचा एक अलीकडचा चित्रपट म्हणजे ऊनपाऊस, नटसम्राट वगैरे दोन–तीन कलाकृतीची डोळ्यातून पाणी काढणारी भेळ होती. कोतवालसाब हे त्यांचे लेटेस्ट पिक्चर असेच एक मुन्ही कॉकटेल आहे असे म्हणायला हरकत नाही एका बेनाम गावात धरम कोहली (उत्पल दत्त) नावाचा एक बडा जमीनदार फार माजलेला असतो–म्हणजे वरून कीर्तन आतून तमाशाच्या चालीवर देशभक्ती, स्मगलिंग, खून-दरोडे, बाईबाटली वगैरे. त्याच्या जुलमी सत्तेला व बेकायदेशीर कारवायाना उजेडात आणणारा डी. एस्. पी. भरतप्रसाद सिन्हा (शत्रुघ्न सिन्हा). प्रथम त्याला तिरस्कारणारी आणि यथावकाश त्याच्या प्रेमात पडून (बायको म्हणून) गळ्यात पडलेली प्रभा (अपर्णा सेन). शिवाय जोडीला बुद्धिबळासारख्या काळ्या–पांढऱ्या प्याद्यांची तटबंदी. काळ्या बाजूला महेश (सुधीर), कोहलीचा चमचा बनलेला असरानी आणि गुडमंडळी पांढऱ्या बाजूला भरत–प्रभाचा प्रेमळ, म्हातारा वगैरे घरमालक डेव्हिडचाचा, एक प्रामाणिक पोलिसइन्स्पेक्टर आणि पोलिस कमिशनरच्या भूमिकेत ओम शिवपुरी आता अशा धर्तीच्या कथा असलेले सिनेमा आजवर काय कमी होऊन गेले आहेत ? हृषिदासारख्या मातब्बर प्रतिभावंत दिग्दर्शकान पुन्हा त्याच त्या शिळ्या कढीला ऊत आणायची काय गरज होती ? पण या वेळी बहुधा 'मनमोहन देसाई, अशोक रॉय, रमेश सिप्पीनडियादवाला–सागरकुटुंबीय प्रभृति दिग्दर्शककपूला जे जमते ते मला येणार नाही को काय !' अशा जिद्दीला पेटून हृषिदानी हा प्रत्येक वळणावर ओळखीचा वाटणारा कोतवालसाब घडविला असावा. चित्राच्या सुरुवातीलाच प्रथेप्रमाणे पो. क. ओम शिवपुरी शॉटगन शत्रुघन याना 'तुलाच हे काम जमू शकेल' अशा आशयाचा मस्का मारून अँटी कोहली' मोहिमेवर धाडून देतात तेव्हापासूनच हृषिकेश मुकर्जी मनमोहन देसाईचा वेश करून आलेले असल्याचा भास प्रेक्षकाना व्हायला लागतो पुढे कोहलीशेटजीच्या रंगविलासाचे सुमगदर्शन घडविण्याच्या निमित्ताने पद्माबाई खन्नाबाईचा मुजरा-डान्स चालू होतो तेव्हा आभासाचे रूपांतर विश्वासात होऊ लागते. बर, हृषिदा हे sex appeal बाबत बरेचसे नरम, काहीसे orthodox दिग्दर्शक (जिज्ञासूनी उदाहरणार्थ त्यांच्या बऱ्याचशा चित्रपटातल्या नायिकाची बावळट केशवेषभूषा आठवावी.) त्यामुळे पद्माचा मुजरा डान्स व प्रभाचा आणखी एक अर्धअशास्त्रीय नाच उगीचच घुसडल्याबद्दल त्यांचे चाहते नाराज, तर हे दोन्ही नाच नखशिखांत वस्त्रधारी अवस्थेतील असल्याने

पद्मा खन्नाचे फॅन्स नाराज अशी दुहेरी नाराजी हृषिदानी ओढवून घेतली आहे. त्यातला प्रभादेवीचा नाच (खरे म्हणजे त्यानी घेतलेली नाचगाण्याची शिकवणी) हा डोळ्याना कमालीचा त्रास देणारा बेताल प्रकार आहे नृत्य. योगासने, अॅथलेटिक्स आणि रबरमॅनच्या कसरती यातल्या सीमारेषा इतक्या पुसट असतील याची मला चारही बाबतीत अडाणी असल्यामुळे अजिबात कल्पना नव्हती या दोन्ही नाचाच्या वेळची गाणीही (जी मी मध्यतरातच विसरून गेलो होतो) अगदीच सामान्य दर्जाची आहेत एकूणच, रवींद्र जैनसारख्या उमद्या सगीतकाराकडे गीत–सगीताचा ताबा असूनही कोतवालसाब· मधल्या सगीताचा दर्जा भलताच कामचलाऊ आणि रेटल्यासारखा आहे याचे विशेष आश्चर्य वाटले. कारण किरकोळ फुटकळ सिनेमातही रवींद्र जैन आठवणीत राहील्स एखाद तरी गाण जरूर देऊन जातो. इथे मात्र 'भूल ना जाना मेरा प्यार' हे आशा भोसलेच्या आवाजातल गाण मोठ्या जिकिरीनच लक्षात ठेवाव लागत.

कोतवालसाबची कथा बिमल दत्त याच्या नावे नोदलेली असून सवादलेखन डॉ. राही मासूम रझा यानी केले आहे राहीसाहेबाच काम त्यानी चागल्यापैकी चोख बजाविलेल आहे अशा सिनेमात सलीम–जावेद जातीचे भडक दीवारी सवाद लिहिले जाण्याची धास्ती मोठी असते. हा टाळ्यामिळव् स्वस्त मोह टाळून जनाब रझा यानी वास्तवाच्या बरेच जवळ येणारे सवाद लिहिले आहेत तीच गोष्ट पटकथालेखनाची शेवटी कथा रटाळ व जुनी असली तरी हृषिदासारखा ताकदीचा दिग्दर्शक भेटल्यानतर थोडा फरक पडतोच प्रसग तेच असले तरी हाताळणी अधिक सफाईदार, अधिक वास्तव होते तर नीटस पटकथा–सवाद–दिग्दर्शन या जमेच्या बाजूतून बाहेर पडलय् ते तथ्य एवढच की नव्या प्रतिभाविलासाचा आनद नाही तर नाही; पण कोतवालसाबमध्ये दोन–चार व्यक्तिरेखा बऱ्या उभ्या राहिलेल्या आहेत. स्वत कोतवालसाब ऊर्फ शत्रुघ्न सिन्हा, अपर्णा सेन, डेव्हिड, उत्पल दत्त, असरानी इतकच काय पण सुधीरच्या वाट्याला आलेली भूमिकासुद्धा चित्रपटात characterization च्या आघाडीवर बाजी मारल्याचीच खूण दर्शविते

या भूमिका सजीव करणारी अभिनेते-मडळी ही कोतवालसाबची जमेची आणखी एक बाजू. या बाबतीत शत्रुघ्न, अपर्णा सेन व उत्पलदा याचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. शत्रुघ्नने या चित्रपटात बऱ्यापैकी मन लावून काम केल्याच जाणवत उग्र-प्रवृत्तीचा हा डी एस् पी आपल्या पत्नीचं पूर्वायुष्य उघड झाल्यानतर भावनिक सघर्षात सापडून एकाच वेळी सारखाच हिंस्र आणि दीन बनतो. भरतप्रसाद सिन्हाची ही दोन्ही रूप शत्रुघ्नने आपल्यातला शॉटगन बाजूला ठेवून चागल्या तोलामोलान रगविली आहेत. त्याची ही भूमिका 'मेरे अपने' मधल्या त्याच्या गाजलेल्या भूमिकेची काहीशी आठवण करून देणारी असली तरी आपल्या पेटट स्टाइल्स फेकायचा उद्योग त्यान इथे केलेला नाही हे सुदैवच. अपर्णा सेनला त्याच्या मानान दुय्यम वाव मिळाला असला तरी तिनेही अभिनयात बिलकुल कसूर केलेली नाही. तिच्या एन्ट्रीनतर लगेच शत्रुघ्नच्या पोलिसी दटावणीला खणखणीत प्रतिटोला म्हणून 'पुलिसवालो और रिश्तेदारो के सिवा किसीको कही आनेजानेकी इजाजत नही है क्या?' असा एक प्रश्न ती टाकते, तिथेच हुकमी मुद्राभिनय आणि रूटीनपेक्षा वेगळी पण अस्सल आणि original अशी सवादफेकीची शैली याची चुणुक दिसते, ती अखेरपर्यंत कायम राहते लेखक–दिग्दर्शकानी या दोन्ही भूमिकाना एकेक rounded personality आणून दिली आहे ती या दोघानी अभिनयाच्या बदलत्या बारकाव्यातून चागली व्यक्त केली आहे उत्पल दत्तच्या व्हिलनमध्ये दोष काढायला जागा नसली तरी एकाच प्रकारच्या भूमिका स्वीकारीत राहिल्यास साचेबद्धपणा येण्याची भीती नाकारता येत नाही

□


## १५ ऑगस्टला प्रकाशित झाले.

### चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

**प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे**

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा नरहर कुरुंदकर । पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

[ टॉलस्टॉय पुस्तक योजनेतील ग्राहकांनी वरील पुस्तक व 'आर् डॉक्युमेंट' ही कादंबरी कार्यालयातून घेऊन जावी. ]

पुण्याच्या थिएटर ॲकॅडमीने सादर केलेल्या 'खेळिया' नाटकाचे आतापर्यंत बरेच प्रयोग होऊन गेले. टीकाकार-रसिकांनी या प्रयोगाचे स्वागत केले श्री. शिरीष सहस्रबुद्धे यांची 'खेळिया'च्या पहिल्या प्रयोगावरची प्रतिक्रिया ३० एप्रिल ७७ माणूसच्या अंकात प्रसिद्ध झाली होती. उशीराने प्रसिद्ध होत असलेली ही दुसरी प्रतिक्रिया....

# खेळिया

## एक फक्त बघण्यासारखा प्रयोग

सत्यजित रथ

थिएटर ॲकॅडमीचा 'खेळिया' बघण्यासारखा आहे, चांगला मात्र नाही. वरील वाक्यातील नकारात्मक विधानाचा प्रथम विचार करू. कारण टीका केव्हाही जास्त महत्त्वाची. रंगभूमीवरील नाटकाकडे पाहताना त्याचे लेखन आणि त्या लेखनाचे रंगभूमीवरील मूर्त स्वरूप या दोन्ही गोष्टी स्वतंत्रपणे विचारात घ्याव्या लागतात. लिखाणाचा हेतू साध्य झाला म्हणजे लिखाण चांगले. आता हेतू कोणता, हे कोण ठरविणार ? तर ती जबाबदारी आपल्या स्वत:पुरती प्रत्येक वाचकाने किंवा प्रेक्षकाने पार पाडायची आहे.

इथे प्रत्येक नाटकाचा हेतू शोधावा का, आणि तसा तो एखाद्याने शोधल्यास कितपत ग्राह्य धरावा या प्रश्नाची माझ्यापुरती उत्तरे देणे जरुरीचे आहे. कोणत्याही कलाकृतीला काही तरी सांगायचे असते किंवा दाखवायचे असते. सांगणाऱ्या कलाकृती बहुधा जीवनाच्या एखाद्या पैलूवर भाष्य करीत असतात. त्या प्रश्न विचारतात आणि अधूनमधून त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचाही प्रयत्न करतात. अशा कलाकृतींनी जर आपल्या माध्यमातील प्रतीकांचा वापर केलाच तर त्यात काही वावगे नाही. कारण त्यांचा प्राण भाष्यात आहे, जीवनाच्या चित्रणात नाही, पण ज्या कलाकृतींना फक्त काही दाखवायचे असते अशांना आपल्या व्यक्तींची बोळवण धूसर आणि प्रतीकात्मक व्यक्तिरेखांवर करता येत नाही. कारण त्या व्यक्तिरेखाच अशा कलाकृतींचा गाभा आहेत. तेव्हा नाटकाचा विचार करताना दाखविणे आणि सांगणे यांपैकी कोणती गोष्ट नाटक करू इच्छिते हे ठरविणे आवश्यक आहे कारण त्या दृष्टिकोनातूनच नाटकातल्या व्यक्तिरेखांकडे बघावे लागते हे झाले पहिल्या प्रश्नाचे उत्तर. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मात्र वैयक्तिक विचारस्वातंत्र्य एवढेच.

आता माझ्या मते या नाटकात दोन भिन्न आणि तरीही सारख्या स्वभावाच्या व्यक्ती एकमेकांच्या प्रकाशात दाखवायच्या असाव्यात. हे अर्थात माझे वैयक्तिक मत आणि याच्याच अनुरोधाने पुढील विवेचन केले आहे.

मी वर म्हटल्याप्रमाणे हे नाटक दाखविणाऱ्याच्या जातीचे आहे त्याप्रमाणे या नाटकाकडे पहाता व्यक्तिरेखा अत्यंत अस्पष्ट आहेत असे लक्षात येते दोन आपआपल्या परीने परिपूर्ण अशा व्यक्ती एकमेकांच्या जिवाशी 'खेळ' करतात, पण एकूण वातावरणात मात्र फक्त स्पर्धेचे तणावच नाहीत, त्याहून वेगळा असा एक ताण भरून राहिला आहे. हा ताण आणि या व्यक्ती एकमेकांशीच खेळ करण्यास का उद्युक्त झाल्या हा प्रश्न, दोन्हीचे मूळ त्यांच्या लैंगिक संबंधात आहे. याचा अर्थ प्रत्यक्ष संबंध असा नव्हे, पण 'आपल्या बायकोने या माणसात काय पौरुष पाहिले ?' आणि 'समसंभोगी समजल्या जाणाऱ्या या म्हाताऱ्यापाशी आपली प्रेयसी इतके दिवस का नांदली ?' हे एकमेकांच्या सान्निध्यात दोघांना अस्वस्थ करणारे प्रश्न त्यांच्या संबंधाला लैंगिक स्वरूप देतात. लैंगिकता ही मनुष्याची सर्वात मूलभूत आसक्ती. या आसक्तीला जेव्हा हात घातला जातो तेव्हा वरचे सारे पापुद्रे हळूहळू सुटायला हवेत, सुटलेले दिसायला हवेत आणि त्यांच्याखाली लपलेल्या कानाकोपऱ्यात प्रकाश पडायला हवा. या नाटकात तसा तो पडलेला नाही.

राकेश सोनावणे हा जीवनाचा बराच अनुभव घेऊनही भाबडा राहिलेला पोर, अशी आबासाहेबांची त्याच्याविषयी समजूत आहे असे वाटते या समजुतीची सत्यासत्यता पटवायला मुभा फक्त पहिल्या अंकात आहे, कारण दुसऱ्या अंकात राकेशचा वरचष्मा आहे, पण अर्ध्याकच्च्या पोरासारखी दिलेली दारू बादल्यांनी पिणे आणि ती चढल्यावर नाकासमोर लटकावलेल्या कुठल्याही ढोबळ गाजरामागे केविलवाण्या उत्साहाने धावणे, हे काही भाबडेपणाचे द्योतक वाटत नाही. दारूची त्याला सवय नाही, एवढेच यातून कळते

आणखी एका गोष्टीतून हा भाबडेपणा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटते. आबासाहेब त्याला सांगतात की, 'लालन ही बाई तुला महाग पडेल' आणि तो मात्र 'खऱ्या प्रेमिकाच्या' आविर्भावात सांगत रहातो की लालनचे आणि त्याचे संबंध प्रेमाचे आहेत, पैशाचे नाहीत. आता जर नाटककाराने लालनच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना दिली तरच ही समजूत भाबडी आहे किंवा कसे हे ठरविता येणार तशी कल्पना न दिल्याने यातूनही त्याचा भावडेपणा प्रेक्षकासाठी प्रकट होत नाही. आता आबासाहेब हुशार आहेत हे स्वत. त्यांनी, राकेशने आणि नाटककाराच्या सावलीने वारंवार सांगितले आहे. तेव्हा राकेशला भाबडा मानण्यास त्यांना काही सबळ कारण अस-

णारच. ते कारण समजले नाही, तर राकेश भाबडा आहे की नाही आणि आबासाहेब हुशार आहेत की नाहीत या दोन्ही प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकाला देता येत नाहीत आणि ही उत्तरे जर देता आली नाहीत तर व्यक्ति-चित्रणात पोकळी निर्माण होते.

बरे, राकेश दुसऱ्या अंकात भाबडा नाही, तेव्हा पहिल्या अंकातही तो भाबडा नव्हता असे म्हणावे, तर पहिल्या अंकात तो तसा होता आणि मृत्यूच्या जाणिवेने त्याचे भाबडेपण संपले असे खुद्द राकेशनेच म्हटले आहे आबासाहेब दुसऱ्या अंकात राकेशपुढे फिके पडतात आणि तसे पाहिले तर राकेशने पहिल्या अंकात त्यांना कोणताच प्रतिकार केलेला नाही तेव्हा नाटकातील पात्रे आणि नाटककार यांच्या मताप्रमाणे खरोखरच ते हुशार आहेतच यालाही आधार सापडत नाही.

तसेच, आबासाहेबांनी 'खेळिया' या शब्दाचा लावलेला अर्थ आणि तो आपणा दोघांना लागू करण्याचा त्यांचा प्रयत्न, पहिल्या अंकातल्या भाबड्या राकेशने दुसऱ्या अंकात मोठ्या चवीने उचललेले 'खेळियेपण' यातून दोघांच्या स्वभावात एक समान धागा दाखवायचा प्रयत्न केला आहे; पण भाबडे-पणा, चातुर्य किंवा खेळियेपण यांपैकी कशाचेही पुरेसे समर्थन न झाल्याने हा प्रयत्न फसला आहे

व्यक्तिरेखा कशा रंगवाव्या, हा नाटककाराचा प्रश्न. पण 'मी व्यक्तिरेखा अशा रंगवल्या आहेत' असे सांगूनही प्रत्यक्षात त्या तशा न दिसणे, हे काही चांगले नाटक नव्हे आणि व्यक्तिरेखा कशा आहेत हे आबासाहेबांनी, राकेशने आणि नाटककाराच्या सावलीने परोपरीने सांगितले आहे.

नाटककाराची सावली नाटकात खटकणाऱ्या जागी येऊन जाते. नाटक सुरू होते, तेव्हा धनेश्वराच्या रहस्यकथेचा उपसंहार आबासाहेब प्रेक्षकांसमोर करतात. ते भाषण अस्थानी वाटते आणि आबासाहेबांचे बुद्धिचातुर्य आणि 'मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या खेळात' त्यांना वाटणारा रस या गोष्टी स्पष्टपणे प्रेक्षकांपुढे मांडण्यासाठीच ते तिथे आले आहेत की काय, असा भास होतो तेव्हा तिथे नाटककाराची सावली बोलते असे म्हणायला हरकत नाही. स्वप्नील डोळ्यांनी राकेशने आपल्या आणि लालनच्या आयुष्याचे केलेले चित्रण हा देखील असाच राकेशचा भाबडेपणा प्रेक्षकांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न वाटतो नाटककाराच्या सावलीचे अगदी स्वतःचे असे भाषण म्हणजे मात्र आबासाहेबांनी 'खेळिया' या शब्दाचा घेतलेला परामर्श.

'खेळिया' म्हणजे आपण खेळणारा, इतरांना खेळविणारा आणि खेळावर संपूर्ण ताबा असलेला असामान्य बुद्धिमत्तेचा एक पूर्णपुरुष अशी या भाषणावरून माझी समजूत झाली भीतिदायक वैचारिक परिपूर्णता असलेल्या पुरुषाचे चित्र या व्याख्येतून डोकावते; पण हे चित्र नाटककाराला रंगवायचे आहे असे म्हणावे, तर उरलेल्या नाटकात त्याचा कुठेच मागमूस नाही तेव्हा आबासाहेबांच्या स्वतःविषयीच्या अनेक कल्पनांपैकी ती एक, आणि इतर सर्व कल्पनांप्रमाणेच तिच्याही सत्यासत्यतेबाबत पुरेसा पुरावा नाही, असे म्हणण्याखेरीज पर्याय उरत नाही. दोन्ही व्यक्तिरेखांचे सर्वच धागे अशा प्रकारे ना सुरुवात ना शेवट अशा अवस्थेत लोंबतात परिणामी दोन्ही व्यक्तिरेखा अगदीच धूसर आणि अपूर्ण राहतात

अपूर्णतेच्या संदर्भात आणखी एक-दोन मुद्दे पुढे येतात आबासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे रात्री शेजेवरदेखील त्यांना आपल्या पत्नीच्या प्रियकराने केलेली आपल्या वैवाहिक संबंधाची मीमांसा ऐकावी लागते. अशा गोष्टी नवऱ्याला सांगणारी बाई निश्चितच तिच्यासारख्या विवाहबाह्य संबंध असणाऱ्या इतर बायकांहून काहीशा विचित्रपणे निराळी आहे अशा विचित्र बाईवर प्रेमाचे आणि हक्काचे नाते मोठ्या हिरीरीने सांगणाऱ्या या दोन्ही पुरुषांत या विचित्रपणाच्या अनुषंगाने काही व्यक्तिवैशिष्ट्य असेलच की नाही ? पण ते नाटकात कुठेच नाही. तसेच समलिंगी आकर्षणाचे. आबासाहेबांना राकेशबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाचा हा धागा मधूनच लुप्त होतो आणि मधूनच प्रेक्षकांना फक्त आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यापुरता डोके वर काढतो व्यक्तिरेखांत आणि त्यांच्या परस्पर तणावात त्याला नीट सामावून घेतलेले नाही

आता अनेकांना मी इथपर्यंत केलेले व्यक्तिरेखांचे चर्वितचर्वण अवाजवी वाटेल, कारण त्यांच्या मते यात व्यक्तिरेखांना महत्त्व नाहीच. महत्त्व आहे ते गोष्टीला. गोष्ट म्हणजे एकापुढे एक घडत जाणाऱ्या घटना. या घटनांतून असामान्य बुद्धिचातुर्याने लढविलेल्या डावपेचांचे दर्शन घडते असे भासवायचा प्रयत्न केला आहे प्रत्यक्षात घटना पाहताना मात्र असे वाटत नाही. पहिल्या अंकात भिगलेल्या राकेशला आबासाहेबांनी खेळविले, त्यात असामान्य चातुर्य कसले ? आणि दुसऱ्या अंकात राकेशने केलेल्या कुरघोड्या बहुतांशी पोलिसांकडून आणि पुरुषगड्याकडून त्याला मिळालेल्या तथाकथित मदतीसारख्या बाह्य गोष्टींवर अवलंबून असल्याने त्यात वैयक्तिक बुद्धिचातुर्याला स्पष्ट उठाव येणे अवघड. शिवाय डबा-ऐसपैस खेळताना एखाद्या मुलाने दुसऱ्याचा शर्ट घालून तो बाहेर काढून दाखवावा या धर्तीवर सगळे डावपेच लढविलेले वाटतात आणि खेळात भांडण झाले की, लहान मुलांत होतो तसा शिव्यांचा गदारोळही नाटकात आहेच. तरीही घडणाऱ्या घटना एकापाठोपाठ एक अत्यंत योग्य त्या वेगाने पुढे येतात आणि त्यामुळे नाटकाची बांधणी स्वच्छ आणि आकर्षक होते, हे मात्र खरे; पण चांगल्या बांधणीचे म्हणून नाटक चांगले म्हणावे ?

रूपांतराविषयी पाहता, एका बऱ्यापैकी उतरलेल्या रूपांतरात 'मी जसे घेतो तसे देतो' ('I give as good as I get !') असे अनैसर्गिक मराठी क्वचित येऊन जाते.

दिग्दर्शकाने दोन्ही पात्रांना नाटकभर रंगभूमीच्या कर्णरेषेवर फिरविले आहे असे वाटले ते का, हे काही मला कळले नाही. संभाषणाचा एक टप्पा संपला की, पुन्हा संभाषणाला तोंड फोडण्यासाठी आसपासच्या वस्तूंचा आधार घ्यावा म्हणून पात्रे उठून धावपळ करतात असे अधूनमधून वाटते त्यामुळे घराची मांडणी अधिक सोयीची करता आली असती असे वाटल्यावाचून राहात नाही. आबासाहेबांचे वैभवदेखील मांडणीत बेताबाताचेच दिसते.

पण अशा किरकोळ बाबी सोडल्या तर नाटकाची बांधणी, दिग्दर्शन आणि दोन्ही कलाकार यांनी केलेली कामे यामुळे प्रयोग बघण्याजोगा होतो, पण बघण्यासारखी सारीच नाटके चांगली असतात असे थोडेच आहे ? □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २७।८।७७ ते २।९।७७

### जनतापक्षाचा राजकीय प्रभाव दिसू लागेल

सिंहराशी या वेळी उदित आहे व तेथेच राशिस्वामी रवी आहे चंद्र कुंभराशीत आहे. या वेळी भारताच्या मूळ लग्नात मंगळ–गुरु सहयोग असून ते ग्रह आपली चुणुक दाखवायला सुरुवात करणार आहेत. रवीसारखा राजकीय धर्माचा ग्रह व मंगळासारखा प्रशासकीय ग्रह असे दोन्ही ग्रह अनुकूल असल्यामुळे जनतापक्षाचा राजकीय प्रभाव जाणवण्याएवढा वाढणार आहे. · अंतर्गत विरोधाचा बाऊ करून व प्रतिगामीपणाचे खोटे शिक्के मारून या पक्षात फूट पाडण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. जनतापक्षाच्या संघटनात्मक कार्यात अधिक कार्यक्षमता येऊ लागेल धोरणात कामगारविषयक सहानुभूती अधिक येईल. इंदिरा गांधींची बेलछीची 'हत्ती मिरवणूक' जनतापक्षाला अधिक कार्यप्रवण करील व काँग्रेसपक्षात चिंतेचे वातावरण निर्माण करील. इंदिरा गांधींना राजकीय ग्रहमान फारसे अनुकूल नाही. त्यामुळे नेतृत्वालादेखील फारसा उठाव मिळेल असे वाटत नाही. महाराष्ट्रात मुख्य मंत्री वसंतदादा पाटील यांना थोडे विरोधातून जावे लागणार असले तरी एकूण महाराष्ट्राच्या धनुराशीला रवी अनुकूल आहे. त्यामुळे सत्तांतर घडण्याची शक्यता नाही.

---

**मेष : योजना आखा**

पुढील आठवड्यात शनी पाचवा होणार आहे तो तुमच्या औद्योगिक योजना प्रत्यक्षात आणायला अनुकूल वातावरण निर्माण करणार आहे. त्याची पूर्वतयारी या वेळी होईल. धनिक व भाडवलदार व्यक्तींबरोबर चर्चा–वाटाघाटी यशस्वी होतील. तिसरा मंगळ कार्यकुशलता वाढविणार आहे. यश जवळ आणणार आहे. नोकरीची परिस्थिती खूपच समाधानकारक राहील. कर्तृत्वाचा गुणगौरव होईल. वरिष्ठांची मर्जी संपादन होईल एखाद्या महिलेकडून आर्थिक मदत होईल. बारावा केतू पैसा पुरा पडू देणार नाही शुभ २८–३१.

**महिलांना :** संसारात मनासारखे सुख मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** नव्या नव्या विषयात रस राहील.

**वृषभ : धंद्यात प्रगती**

दहावा चंद्र असताना हा आठवडा सुरू होत आहे. गुरु–चंद्राचा हा नवपंचमयोग सुरुवातीस होत आहे, ही प्रगतीची नांदी ठरेल यात शंका नको. या वेळी मंगळ, गुरु व शनी असे अनेक मोठे ग्रह अनुकूल आहेत. त्याचा तुम्ही फायदा घेतला तर तुमची सारी उद्दिष्टे सफल होण्यास वेळ लागणार नाही. राजकारणी व धनिक लोकांशी संबंध येणार आहेत. आर्थिक बाजू भक्कम करण्याची नवी तंत्रे सापडतील. नोकरी करणाऱ्यांना अनुकूल काळ आहे वरिष्ठांबरोबर जवळचे संबंध प्रस्थापित होतील. शुभ ३०–३१.

**महिलांना :** अपेक्षापूर्तीचा आनंद मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** कलागुणांना प्रोत्साहन मिळेल.

**मिथुन : नवी क्षितिजे**

आता लवकरच तुम्ही साडेसातीतून मुक्त होणार आहात व त्याची सुखकर जाणीव या वेळी होणार आहे. तिसरा रवी तुमच्या अपेक्षा वाढविणार आहे तर राशीत आलेला मंगळ तुमची कार्यक्षमता व सामर्थ्य वाढवून येणारी जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य देणार आहे. आजवर हुकलेल्या संधी अनपेक्षितपणे पुढे येतील. नोकरीत यापूर्वी जे नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी मार्ग सापडेल. स्वतंत्र धंदा व इतर व्यवसायाची नवी क्षितिजे दृष्टिपथात येतील. शुभ ३१–२.

**महिलांना :** संसारातील अडचणींवर मात कराल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात प्रगतीची चिन्हे दिसतील.

**कर्क : खर्च वाढेल**

व्ययस्थानी मंगळाचे अधिष्ठान म्हणजे अनपेक्षित खर्चाची आपत्ती होय, पण त्या मंगळाला गुरुने नियंत्रण घातले आहे, त्यामुळे तुम्ही घाबरून जाणे व्यर्थ ठरेल. या वेळी तुमची अनेक महत्त्वाची कामे मोठे यश घेऊन पार पडणार आहेत. मोठेपणा सहज येऊन मिळणार आहे. नोकरीत वरिष्ठ जागा मिळणार आहे व अनेक दिवसांत न घडलेली आनंददायक घटना घडणार आहे रेस व लॉटरी यापासून फारसा लाभ होणार नाही. त्याच्या आहारी जाऊ नका. मित्रमंडळींचे उत्तम सहकार्य मिळणार आहे. नवे वाहन खरेदी करता येईल. जागेचा प्रश्न सुटेल. शुभ २९–३१.

**महिलांना :** संसारात जुळवून घेणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना :** मन चंचल राहिले तरी प्रगती होईल.

**सिंह : प्रगतिकारक**

सहाव्या शनीचे त्रासदायक बळ आता संपुष्टात येत आहे त्यामुळे त्याचा तुम्हाला आता त्रास होणार नाही सध्या राशीतच असलेला रवी सर्व आशाअपेक्षा पुऱ्या करण्यास मदत करणार आहे उपेक्षा संपेल. अधिकार वाढतील सर्वांकडून मदत होईल राजकारणात प्रगतीची नवी चिन्हे दिसू लागतील मोठेपणा मानसन्मान मिळेल. आर्थिक बाजू भक्कम होण्यासारख्या घटना घडतील. रेस, लॉटरी वा तत्सम साधनांपासून लाभ होईल. जुने येणे वसूल होईल. नोकरीत अनुकूल स्थित्यंतर घडू लागणार आहे. शुभ २९–३०.

**महिलांना :** अपेक्षापूर्तीचे समाधान मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** प्रसन्न मनाने अभ्यासात प्रगती.

**कन्या : आर्थिक लाभ**

पुढील आठवड्यात शनी बारावा होणार आहे. ज्योतिषशास्त्राच्या रूढ भाषेत साडेसाती सुरू होणार आहे; पण त्याचा कोणताही परिणाम बराच काळपर्यंत तुमच्यावर होणार नसल्यामुळे तुम्ही साडेसातीचा धसका घेण्याचे कारण नाही. उलट या वेळी

शनी, मगळ व गुरू या ग्रहानी तुमची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची प्रतिज्ञा केली आहे त्याची दखल घ्या. रेस, लॉटरीत भाग घ्यायला हरकत नाही. तुम्ही लेखक असाल तर त्या मार्गाने तुमची आर्थिक बाजू भक्कम होण्यास मदत होईल नोकरी-व्यवसाय प्रगतीचा टप्पा गाठील. राजकारणात विशेष रस घेऊ नका. शुभ ३०–३१.

**महिलांना :** धावपळ कमी झाली नाही तरी सफलता मिळेल.

**विद्यार्थ्यांना** · नवे नवे विषय आत्मसात करा ·

## तूळ : चिंता नको

तूळराशीला साथ देणारा शनी आता लवकरच अकरावा होणार आहे रवि-शनीचे तेथे सूत जमणार आहे त्यामुळे तुम्ही चिंता ग्रस्त होत असाल तर तो मनाचा दुबळेपणा होय मिथुन राशीतून गुरू व मगळ तुमचे सारे प्रयत्न-यशस्वी करण्याचे मनसुबे रचीत आहेत. नोकरी-उद्योगाच्या दृष्टीने त्यांच्या हालचाली आगामी काळाला पूरक ठरणार आहेत. धद्याला नवी दिशा देऊ शकाल. चालू धदा अडचणीतून बाहेर काढायला परिस्थितीची अनुकूल साथ आहे नोकरीत एखादी खास योजना वरिष्ठाच्या गळी उतरवायला तुम्ही समर्थ व्हाल रेस-लॉटरीत रस घेतला तरी आहारी जाऊ नका. शुभ २७–३१

**महिलांना :** ससारात प्रेम व वात्सल्य अनुभवता येईल.

**विद्यार्थ्यांना :** अनेक विषयात बुद्धी चालेल.

## वृश्चिक : प्रगतीची चाहूल

सध्या अनेक समर्थ ग्रहाची तुमच्या अवती-भोवती गर्दी होत आहे ती तुमच्या कल्याण-कारी उपक्रमाना कमालीची पूरक ठरेल अनेक क्षेत्रात यश आणि प्रगतीची चाहूल लागेल. या राशीच्या शेतकरीवर्गाला आनद-दायक घटना अनुभवता येतील. व्यापारी-वर्गाला गिऱ्हाईक चांगले राहून स्वस्त माल देण्याचे समाधान त्याना उपभोगता येईल. रासायनिक खते, औषधे, लोखंडी माल, स्टेशनरी व्यावसायिक चार पैसे मिळवूनही लोकांच्या सदिच्छा मिळवू शकतील. नोकरीच्या क्षेत्रात कार्यक्षमता वाढेल. जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य निर्माण येईल आड-मार्गाने पैसे मिळविण्याचा मोह मात्र टाळा. शुभ ३१–२.

**महिलांना :** आशाआकाक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना :** भांडणाची प्रवृत्ति कमी होईल

## धनु : असाधारण यश

भाग्यस्थानी रवि आल्यापासूनच अड-चणीच्या चक्रातून तुम्ही बाहेर पडला आहात आजवर ज्या ज्या क्षेत्रात यशाची उणीव निर्माण होत होती ती ती क्षेत्रे आता तुमच्या कर्तबगारीने उजळून निघणार आहेत. पुढच्या आठवड्यात शनिदेखील भाग्यस्थानी येणार आहे त्यानतर तुमच्या प्रगतीच्या यशाच्या वाटा मोकळ्या होणार आहेत. चांगले ग्रह येतात तेव्हा माणसाच्या जीवनातं महत्त्वाचे बदल घडून येतात तुमच्या प्रति-कूल परिस्थितीला आता कायमचा पूर्ण-विराम मिळणार आहे आरोग्य, उत्साह याचा प्रादुर्भाव होऊ लागणार आहे सधी येत आहे आता तयार राहा असे दैवाचे तुम्हाला आवाहन आहे शुभ ३०–३१

**महिलांना** · ससारातील अडचणी निवारण होऊ लागतील

**विद्यार्थ्यांना :** विशेष ध्येयावर लक्ष केंद्रित होऊ लागेल.

## मकर : विरोधकाचा उठाव

राशिस्वामी शनि तुम्हाला आजवर बरीच साथ देत होता, पण त्याचे ते सहकार्य आता हळूहळू सपुष्टात येणार आहे रवि फारसा अनुकूल नाहीच. शत्रुस्थानी गुरुबरोबर आता मगळ देखील दाखल झाला आहे. तुमची सहनशक्ति व जिद्द मालल्यां प्रतिकूल परिस्थितीबरोबर दोन हात करायला समर्थ असली तरी तुम्हाला दैवाची अनुकूलता फारच कमी आहे. विरोधकाचा कडवा विरोध सहन करावा लागणार आहे नोकरी-व्यापार इतर कोणताही व्यवसाय कोंडीतून बाहेर काढण्यातच सारी शक्ति खर्च होईल. गैरसमज वाढतील. बेफिकीरपणे घेतलेले निर्णय वादळ उठवायला कारण ठरतील. नोकरीत दक्ष राहावे. शुभ ३१–२.

**महिलांना :** धावपळ होईल, पण मनोरथ पूर्ण होतील.

**विद्यार्थ्यांना :** बौद्धिक क्षेत्रात बदल होईल.

## कुंभ : प्रकाश दिसेल

सध्या पाचव्या गुरूने तुमच्या कल्याणाचे कंकण हाती बांधलेले आहे व आता मंगळाने त्याला मदत करण्याचे अभिवचन दिले आहे. तुम्ही आता निराश होण्यात काहीच अर्थ नाही आता तुमच्याभोवती आशा–आकांक्षा बहरत आहेत तुम्ही एखादा उद्योग सुरू करायचे ठरविले असेल तर खूपच अनुकूल परिस्थिती आहे धनिकाची मदत मिळेल. सरकारी कामात यश येईल सोने–चांदीचे व्यवहार यशस्वी व फायदेशीर होतील. आर्थिक बाजू भक्कम होईल कर्जाचा डोंगर कमी होऊ लागेल बचतीची परिस्थिती निर्माण होऊ लागणार, आहे रेस–व लॉटरीपासून फायदा होईल. नोकरीत अपेक्षापूर्ति. शुभ दि –२८–३१

**महिलांना :** नोकरीच्या दृष्टीने शुभ-कारक घटना घडतील

**विद्यार्थ्यांना** · तुमच्या बुद्धीचे अनेक पैलू प्रकाशात येतील.

## मीन : नोकरीत अनुकूलता

राशीत असलेल्या केतूकडे दुर्लक्ष करू नका. कारण आयुष्यात चमत्कारिक घटना घडविण्याचे काम 'केतू' करीत असतो. विशेषेकरून ससारात अडचणी निर्माण होऊ शकतील व त्यामुळे डोके शांत राहणे जरा कठीण होईल. म्हणूनच आपल्या इष्ट देवतेचे स्मरण सतत ठेवणे आवश्यक आहे. अजून तुम्हाला शनीचे पाठबळ आहे त्यामुळे नोकरीच्या दृष्टीने बरीच अनुकूलता राहणार आहे अनेकांचे सहकार्य मिळून तुमच्या कर्तबगारीला सधी मिळणार आहे प्रवासाला अनुकूलता आहे राजकारण, साहित्य व सामाजिक कार्य यात काम करणाऱ्या उच्च पदस्थ व्यक्तीशी जिव्हाळ्याचे सबध जुळून येतील. बेकारांच्या स्थितीत सुधारणा. शुभ दि.–२९–३१.

**महिलांना .** ससारात संमिश्र अनुभव येतील.

**विद्यार्थ्यांना :-** मानसिक ताण कमी होऊ लागेल.

□

# अवती-भवती : पृष्ठ ६ वरून

जनतेसमोर उभा राहिलो. सभेमध्ये ते मोजकंच बोलले. साठ रुपयाचा चेक वटवून घ्यायचा असेल तर बँकवाले १७ प्रश्न विचारतात आणि कुठचा कोण नगरवाला येतो आणि एका रकमेने साठ लक्ष रुपये घेऊन जातो, हे तुम्हाला पटते काय ? असा प्रश्नही त्यांनी विचारला. ते पुढे म्हणाले, हाच प्रश्न मी अनेक राजकीय नेत्यांना विचारला; परंतु कुणाजवळही या प्रश्नाचे उत्तर नाही. आपल्या छोटया भाषणामध्ये त्यांनी आणीबाणीमुळे निर्माण झालेल्या विशिष्ट परिस्थितीमध्ये शासनाने केलेल्या अत्याचाराचेही विश्लेषण केले आणि सभा संपवली त्यांच्या राजकीय पुनरागमनाची मुहूर्तमेढ याच सभेमध्ये रोवली गेली.

निवडणुका झाल्या सत्ता जनतापक्षाच्या हाती आली आणि संजीव रेड्डी नवीन लोकसभेचे सभापति झाले. पुढे ज्या वेळी एकमताने त्यांची राष्ट्रपतिपदासाठी शिफारस करण्यात आली त्या वेळी आजही हयात असलेल्या त्यांच्या वृद्ध मातोश्रींनी विचारले– जागा मानाची आहे ना ? त्यांनी उत्तर दिले, होय ! पगार इंदिरा गांधी यांना मिळत होता त्यापेक्षा जास्त मिळेल ना ? या प्रश्नालाही त्यांनी होकारार्थी उत्तर दिले. मग त्या माउलीने आपल्या मुलाला देशामधील ही सर्वोच्च बहुमानाची जागा स्वीकारण्यास परवानगी दिली आणि आईचा आशीर्वाद घेऊन– पाचसात वर्षे विजनवनवासात गेलेले निकम संजीव रेड्डी भारताचे राष्ट्रपति झाले ! □

## □ जयप्रकाशजी–इंदिरा बातचीत

इंदिराजींनी अलीकडेच पाटण्यामध्ये जी जयप्रकाशजींची भेट घेतली त्याला प्रसिद्ध झालेल्या वृत्तपत्रीय मजकुरापेक्षा विशेष अर्थ होता. अमृतबझारपत्रिकेने या संदर्भात आणखी तपशील पुरविताना असे म्हटले आहे की, जयप्रकाशजींची भेट घ्यावी असे बाईंच्या मनात अनेक दिवस होते; परंतु केवळ तेवढ्यासाठी पाटण्याला जाणे त्यांना कमीपणाचे वाटत होते. म्हणून त्या काही तरी निमित्ताचीच वाट पहात होत्या आणि बेलाचीला भेट देण्याचे निमित्त करून पाटण्याला जाऊन जयप्रकाशजींना भेटणे अनेक अर्थांनी सोइस्कर होते. हरिजनांबद्दल स्वतःला वाटणाऱ्या कळवळ्याची तीव्रता पटवून देणे, संसदीय काँग्रेसचे नेते यशवंतराव चव्हाण बेलाचीला जाण्यापूर्वीच आपण जाऊन त्यांच्या दौऱ्यामधील हवा काढून घेणे आणि सहजगत्या आपण जेपींना भेटतो आहोत असे दाखविणे अशी सगळी उद्दिष्टे सफल होण्यासारखी आहेत याची खात्री पटल्यावर रायबरेलीचा दौरा रद्द करून हा दौरा आयोजित करण्यात आला. पंचेचाळीस मिनिटांची जी बातचीत झाली त्यामध्ये नेमके काय बोलणे झाले हे कोठेही प्रसिद्ध होऊ शकलेले नाही; परंतु आपल्या संदर्भात आणि संजय सदर्भात जनतासरकारने जी चौकशीमडळे नेमली आहेत त्यांचे काम पुढे चालविले जाऊ नये यासाठी जेपींनी मध्यस्थी करावी असे बाईंनी सुचविले. त्यांनी जेपींना असेही आश्वासन दिले की, क्रियाशील राजकारणामध्ये लगोलग उतरण्याची त्यांची इच्छा नाही. तथापि सार्वजनिक कामाला पूर्ण फाटा दिला तर आपण कायमचे उखडले जाऊ अशी भीती वाटत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले. आणीबाणीमधील अतिरेकी प्रकाराबाबत त्यांनी मनापासून दिलगिरी व्यक्त केली, तथापि त्या पुढे असेही म्हणाल्या की आणीबाणीमधील प्रत्येक निर्णय हा त्यांच्याच इच्छेनुसार घेण्यात आला होता आणि अशा परिस्थितीमध्ये आता काही काँग्रेसनेत्यांनाही वाटते त्याप्रमाणे आणीबाणीसबंधी मी काही नकारात्मक बोलले तर माझी परिस्थिती हास्यात्मक होईल, इतकेच नव्हे तर भरपूर उपहासही माझ्या वाट्याला येईल. ४५ मिनिटे चाललेल्या या चर्चेमध्ये इंदिराजींना काही वेळा भावनावेगामुळे बोलणे अशक्य झाले होते. या भेटीच्या वेळी या दोन नेत्याखेरीज कोणीही प्रत्यक्ष उपस्थित नसले तरी इंदिराजी गेल्यावर जेपींनी आपल्या विश्वासामधील मंडळीबरोबर थोडीफार चर्चा केली. इंदिराजींच्या विविध मुद्द्यांवर जेपींनी कमीत कमी शब्दामध्ये आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या भेटीचा जो वृत्तांत दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाला त्याबाबत जे. पी. फारसे समाधानी दिसले नाहीत. त्यांच्या निवेदनाचे अर्थ चुकीचे लावले गेले अशी त्यांची तक्रार दिसली. या भेटीच्या वेळी इंदिराजींच्या भवितव्याबद्दल जेपींनी जे आशादायी उद्गार काढले त्यांचे इंदिराजींना मानणाऱ्या काँग्रेस वर्तुळामध्ये स्वागत करण्यात आले. असेही सांगतात की, सर्वसाधारण जनतेकडून विशेषतः अल्पसंख्याकाकडून इंदिराजींचे मनमोकळे स्वागत करण्यात आले आणि बेलची येथील हरिजन त्यांच्याशी अतिशय आपुलकीने व विश्वासाने बोलले याची नोंद खुद्द जेपींनीही घेतली आहे. □